# विवाह पुर्व दक्षता



लग्न करण्यापुर्वी घ्यावयाची दक्षता
आणि लग्नानंतर निर्माण होणा-या
समस्या यावर मार्गदर्शन करणारे पुस्तक...


लेखक

**डॉ. विजोद मुजे**

(वैद्यकिय संमोहन तज्ञ व मानसशास्त्रज्ञ)

# विवाह पुर्व दक्षता

आपल्या पाल्याचे लग्न करतांना लग्नापुर्वी काय दक्षता घेतली पाहिजे तसेच, लग्नानंतर निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय योजना सुचविणारे पुस्तक

लेखक
## डॉ. विनोद मुने
संमोहन तज्ञ आणि समुपदेशक
एक्यूपंक्चर थेरपिस्ट आणि इलेक्ट्रो होमिओपॅथी सल्लागार

**Ph.D (psy), MA (psy), BEMS ,MSc (phy),
LLB , ND (Diploma in Naturopathy),
DCH ( USA),**

☞ विवाह पुर्व दक्षता

© सर्व हक्क लेखकाधिन

**प्रकाशन**

विजयपथ प्रकाशन

बाळकृष्ण नगर नागपूर

No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means elctronic , mechanical, photocopy, recording, or otherwise or stored In a database or retrieval system without the prior written permission of Author. This edition can be exported from India only by the Author.

# ॥ लेखकाचे मनोगत ॥

२१वे शतक हे आधुनिकता आणि प्रगतीशील स्वप्नाला आकार देणारे शतक आहे. त्याच बरोबर भारतीयांनी पाश्चिमात्य राहणीमानाचा स्विकार केल्यामुळे मुलांमुलींच्या  जीवनात वैचारिक क्राँतीने बदल केला आहे. सोबतच सोशल मिडीयाच्या माध्यमातून मुला-मुलींना विचारशक्तीला स्तब्ध करणारी अफाट माहिती मिळत आहे. या माहितीच्या माध्यमातून आपण आपल्याला प्रगत समाजाचे प्रतिनिधी मानत असलो. तर, आपण आपल्या भारतीय परंपरेपासून दूर जात आहे, हे मात्र सत्य आहे. शिक्षण आणि आईवडिलांच्या पाठबळामुळे प्रत्येकाच्या अपेक्षा फार वाढत आहेत. त्यातच मुलां-मुलींमध्ये  भावनात्मक प्रौढता कमी होवून,  कल्पनेच्या जगात निर्णय घेत आहे. त्याचा परिणाम म्हणजे कमी वयात प्रेम करणे, शारीरिक संबंध प्रस्तापित होणे किंवा पळून  जावून लग्न करणे इत्यादी अनेक प्रकार घडून येत आहे. आपल्या पालकांना विश्वासात न घेता लग्न केल्याचा परिणाम म्हणजे. कमी वयात घटस्फोट, आत्महत्या व हत्या यासारख्या बाबी समाजात घडतांना दिसत आहे. यामुळे कुटूंब व्यवस्थाच उध्वस्त होत आहे.

माझ्या बारा वर्षाच्या वैद्यकीय समुदेशनाच्या अनुभवावरून असे दिसून येते की, बहुतांशी पेशंटच्या जीवनातील घटना आणि त्यांचे मानसिक आजार उदा. भिती, निराशा, चिंता, नकारात्मक विचार, बेचैनी, निद्रानाश, आत्मविश्वास नसणे, भ्रम, शैक्षणिक प्रगती न होणे, एकाग्रतेचा अभाव आणि आत्महत्ता करण्याचा प्रयत्न करणे या सर्व घटनामागे, त्यांच्या आईवडीलांमध्ये होणारी भांडणे, आईला होणारी मारहाण व आईला मिळणारी वाईट वागणूक, आईवडीलांचा घटस्फोट आणि वडीलास असलेले दारुचे व्यसन इत्यादी घटनाचा समावेश आहे. या सर्व घटनांमागे मनासारखा जोडीदार न मिळणे, दोघांच्या विचारामध्ये समानता नसणे, दोघांच्या वयामध्ये फरक असणे आणि आर्थिक अंतर असणे इत्यादी घटना कारणीभूत आहे.  सर्व समस्यांचे एकच समाधान म्हणजे विवाह करतांना जर मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये वैचारिक, शैक्षणिक, आर्थिक, भावनात्मक समानता असेल तर विवाहानंतर सहसा वाद होत नाही आणि प्रत्येक कुटूंब चांगले जीवन जगू शकतात.

हे पुस्तक लिहीण्याचे एकमेव कारण म्हणजे विवाहानंतर पती-पत्नी व त्यांच्या मुलांचे जीवन आनंदाने जावे यासाठी विवाह करण्यापूर्वी कोणत्या बाबींची दक्षता घेतली पाहिजे जेणेकरून लग्नानंतर होणारे वाद, फसवेगीरी, आणि यानंतर येणारे मानसिक नैराश्य इत्यादी घटना टाळता येतील.

मित्रहो, या पुस्तकामध्ये सांगीतलेल्या बाबी जास्तपणे स्त्रीच्या हित जपणाऱ्या आहेत. कारण विवाहानंतर कुटूंबामध्ये ज्या कांही समस्या उद्भवतात त्यात महिलांना खुप मानसिक व शारिरीक त्रास सहन करावा लागतो. त्यांची हत्या केली जाते, त्यांना फसवून चुकीच्या व्यवसायात ढकलले जाते. जर आईवडिलांच्या संमतीशिवाय प्रेमविवाह केला तर, जर कोणत्याही कारणांमुळे त्यांच्या संसारात वितुष्ट आले तर, मुलींना पुढील आयुष्यामध्ये नरक यातना भोगाव्या लागतात. कारण अशा मुलींना ना माहेरचा आधार असतो ना सासरचा अशा अवस्थेमध्ये काही स्त्रिया मुकूटपणे सर्वच त्रास सहन करतात तर, काही मुली आत्महत्या करण्यासही मागेपुढे पाहत नाही. ज्या मुली आई-वडीलांच्या निर्णयानुसार लग्न करतात आणि लग्नाकरिता निवडलेल्या मुलांची योग्य चौकशी न केल्यामुळे मुलींची फसवणूक होते. अशा मुलींना सुध्दा पुढील आयुष्यामध्ये अनेक यातना भोगाव्या लागतात. जर जोडीदार चांगला मिळाला नाही तर संपूर्ण 'आयुष्य दु:ख भोगावे लागते. माझ्या माता-बहिणी मुलींचे व मुलांचे आयुष्य विवाहानंतर आनंदी जावे त्यासाठी आईवडीलांनी काय दक्षता घेतल्या पाहिजेत, तसेच प्रेमविवाह करतांना मुलींनी कोणता विचार केला पाहिजे, या सर्व बाबी मी सविस्तरपणे या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की, आपणा सर्वांचे या पुस्तकाच्या माध्यमातून कल्याण होवो हिच सदिच्छा मला शेवटी इतकेच म्हणावयाचे आहे की, ! ''स्त्रीला जर आनंदी ठेवाल, सन्मान द्याल तरच तुमचे घर आनंदी राहील, समाजव्यवस्था टिकुन राहील व देश सुध्दा प्रगती करेल''

धन्यवाद

लेखक

डॉ. विनोद मुने

# अनुक्रमणिका

**प्रकरणे**


| | | |
|---|---|---|
| १. | लग्न का करावे | १ |
| २. | लग्न एक करार की संस्कार | ६ |
| ३. | लग्नाचे योग्य वय कोणते | १५ |
| ४. | लग्न जुळवितांना कुंडली ऐवजी आरोग्य प्रत्रिका तपासा | २५ |
| ५. | अल्पवयात होणारे प्रेम एक समस्या | ३० |
| ६. | प्रेम विवाह योग्य आहे का? | ३७ |
| ७. | परंपरागत विवाह व सामाजिक महत्व | ४४ |
| ८. | लग्न जुळवतांना पालकांनी घ्यावयाची काळजी | ५२ |
| ९. | कायद्याच्या दृष्टीने विवाहाचे महत्व व महिलांचे अधिकार | ६२ |
| १०. | लग्नानंतरची नाती व जबाबदारी | ७० |
| ११. | लिव्ह अँड रिलेशिनशिप नव्या युगातील नाते | ७८ |
| १२. | विवाहबाह्य संबंध व विवाहित जीवनावरील परीणाम | ८५ |
| १३. | घटस्फोट आधुनिक काळातील समस्या | ९१ |
| १४. | सुखी जीवनाचा कानमंत्र | १०० |
| १५ | शेवटी अत्यंत महत्वाचे | १०७ |



हे पुस्तक

।। माझे आईवडील

आणि

माझे वडिल बंधू

स्व. चंद्रशेखर मुने

यांना समर्पित ।।

प्रकरण १ ले

# लग्न का करावे ?

*लग्न म्हणजे मानव समाजामध्ये स्त्री आणि पुरुषांमध्ये वैध सबंध बनविण्याकरिता तयार केलेली समाजमान्य व्यवस्था आहे. ज्या समाजाची, कायद्याची मान्यता असते. लग्न हा प्रत्येक व्यक्तीच्या जिवनातील असा निर्णय आहे की, ज्यामुळे दोन व्यक्ती, दोन कुटूंबाचे जीवन पूर्णपणे बदलून जाते आणि नवीन नाती तयार होतात. स्वप्नाळू व्यक्तीप्रमाणे लग्न एक केवळ रोमान्स करण्याचा परवाना नाही तर, दोन व्यक्तीकरिता आयुष्यभऱ्याकरिता अनेक जबाबदाऱ्या आणि इतर नात्यासोबतची बांधिलकी असते. लग्न म्हणजे जीवनभर एकेकांच्या सुखदू:खात, अडीअडचणीत एकमेकांसोबत राहून जीवनातील कोणत्याही परिस्थितीवर मात करुन जिवन सुखद करण्याची सर्वमान्य व्यवस्था होय. जर तुम्हाला पूर्ण प्रामाणिकपणे गाठ बांधायची असेल तर काही गोष्टींचा आधीच विचार करणे फार गरजेचे आहे आणि सावधगिरीने निर्णय घेणे आवश्यक आहे.*

## लग्न म्हणजे काय?

लग्न म्हणजे काय असते ? लग्न म्हणजे हे दोन जीवांचे दोन आत्म्याचे मिलन असते. लग्न म्हणजे प्रेम, आकर्षण, एकमेकांची ती अनामिक ओढ, ती काळजी, ते लाजून बोलणे या सगळ्या आणि बऱ्याच भावनिक नात्यातल्या पैलूंची एकाच ठिकाणी बांधलेली सुंदर अशी गुंफण आहे लग्न म्हणजे हे केवळ एक मुलगा आणि एक मुलगी यांच्यातील नातेसंबंध नसून लग्न म्हणजे हे एका हृदयाचे दुसऱ्या हृदयाशी जोडली जाणारी नाळ आहे. लग्न म्हणजे केवळ तीन अक्षरांचे बंध नसून आयुष्यभराची साथ देण्याकरिता अग्नीच्या साक्षीने स्विकारण्यात आलेले जन्मोजन्मीचे ऋणानुबंध आहे. ज्यामध्ये प्रेमाचा गोडवा, स्नेहाचा आणि घरच्या घरपणाचा स्विकार असून वंशसातत्य टिकविण्याकरिता एक कर्तव्य आहे. आपली कर्तव्य पार पाडण्याकरिता साक्षात देवालाही संसार करावा लागला. थोडक्यात लग्न म्हणजे काय हे समाजावून घेण्याचा प्रयत्न करु या?

- लग्न म्हणजे, जे दोन जीव एकमेकांना प्रेमाचे बंधन घालते आणि घराला घरपण देते अशा दोन मनांचे एकत्र येणे किंवा जुळणे आहे.
- लग्न म्हणजे चांगल्या जीवनभर चालणाऱ्या एका मैत्रीच्या सुंदर प्रवासाची सुरवात असून आयुष्यभऱ्यासाठी स्वत:च करुन दिलेली तडजोड (Adjustment) आहे.

- लग्न म्हणजे नवीन आत्म्याला या पृथ्वीतलावर वैध मार्गाने जन्म घालण्याची दैवी व्यवस्था आहे. जेणे करुन त्या आत्म्याला मागील जन्माचे भोग पूर्ण करीत मोक्ष प्राप्तीची संधी मिळते.

- लग्न फक्त दोन माणसांचे मिलन नसून तर, ते दोन आत्म्याचे, दोन कुटुंबांचे मिलन आहे. लग्नामुळे दोघांच्याही जीवनात नवीन घर, नवी माणसे, नव्या जबाबदाऱ्या आणि नवीन नात्यांची निर्माण झालेली एक गुंफण आहे.

- लग्न म्हणजे आयुष्यातल्या सुखद प्रवासाची सुरुवात. कितीही अडचणी, ताण तणाव असला, तरी घरी कुणीतरी आपली वाट बघतेय आणि आपण कुणासाठी खूप महत्त्वाचे आहोत याची मनाला जाणीव करुन देणारी सुंदर संकल्पना आहे.

- लग्न म्हणजे घरकामाकरिता एक बाई आणली असा समज करुन घेवून तिला कसेही वागविले तरी चालते असा त्यांचा अर्थ करून घेवू नका तर, आपल्या वंश विस्ताराकरिता आवश्यक असलेला संसार आहे. घरात आलेल्या व्यक्तीला मारहाण करुन किंवा नौकरासारखी वागणूक देण्याचे मनातही आणू नका.

- प्राचीन काळापासून, धार्मिक सणांप्रमाणेच, विवाह समारंभ म्हणून साजरे केले जात आहेत, ज्यामध्ये अनेक विधी आणि प्रथा पाळल्या जातात. लग्नाआधी, दरम्यान आणि लग्नानंतर अनेक समारंभ पाळले जातात.

### लग्न करणे आवश्यक आहे का?

मुलगी किंवा मुलगा वयात आला की, प्रत्येक पालकांना आपल्या पाल्याच्या लग्नाची चिंता लागून राहते. आपल्या मुलामुलीचे लग्न करुन आपल्या जिवनातील कर्तव्यातून मुक्त व्हावे अशी प्रत्येक पालकाची ईच्छा असते. विशेषतः मुलगी असेल तर, पालकांना ही चिंता खूपच जास्त असते. अशावेळी तरुणांना प्रश्न पडतो की, लग्न करणे आवश्यक आहे का? सध्याच्या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या काळात कित्येक तरुण आणि तरुणींना हा प्रश्न पडतो. वैवाहिक जीवनात दोन व्यक्ती एकमेकांच्या बंधनात अडकतात. प्रत्येक सुख-दुःखात सोबत उभे राहतील या वचनाने. एकमेकांच्या उणीवा बाजूला ठेवून एकमेकांसोबत आयुष्य जगतात. तर हिंदू धर्मात विवाहाचा संबंध केवळ एका जन्माचा नाही तर सात जन्मांचा मानला जातो.

श्री श्री रविशंकर म्हणतात की लग्न करून कुटुंब सुरू करण्यापेक्षा आनंदी राहणे महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही लग्न करून आनंदी होऊ शकता, तर नक्कीच लग्न करा. पण जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही अविवाहित जास्त आनंदी राहू शकता, तर तुम्ही लग्नाशिवाय आयुष्य जगू शकता.

येशू ख्रिस्ताने अविवाहितपणा एक देणगी आहे असे म्हटले व जे अविवाहित राहू शकतात त्यांना त्याने तसे राहण्यास हरकत नाही असे म्हटले आहे. येशूंनी कोणी लग्न

करू नये असा नियम बनवला नाही. पुढे असे म्हटले आहे की, विवाह आपल्याला देवाकडून मिळालेली एक देणगी आहे. उत्तम विवाह कौटुंबिक जीवनाचा भक्कम पाया असून मुलांना वाढण्यासाठी स्थिर कुटूंबाची गरज असून ज्यामध्ये पालकाद्वारे मुलांना प्रेम, शिस्त व मार्गदर्शन देऊ शकतात. विवाहसुद्धा दोन व्यक्तींमधील घनिष्ठ मैत्रीच असून या मैत्रीमध्ये जोडप्याला आयुष्य जगण्यास मदत, सांत्वन व संरक्षण मिळते.

## लग्नाची गरज का?

प्रत्येक व्यक्ती आपणास विश्वासू असा जोडीदार मिळवा आणि कधीही प्रेमाची कमतरता भासू नये या सर्वसाधारण उद्देशाने लग्न करतो. मुलीसुध्दा आपल्यावर मनापासून प्रेम करणारा व आपली काळजी घेणारा जोडीदार असावा म्हणून लग्नाला तयार होता. लग्न ही अशी एकमेव गोष्ट आहे की, जी दोन व्यक्तींना प्रेमाने एकत्र राहण्याची औपचारिक, सामाजिक आणि कायदेशीर बांधिलकी प्रदान करते. या सर्व बाबींचा विचार करुन प्रत्येकाने लग्न केले पाहीजे.

- **घरातील मंडळींच्या सुखासाठीः** अनेकदा मुलगा असो किंवा मुलगी त्यांना लग्न करायचे नसते. पण, सतत घरातील मंडळीचे प्रेशर आणि त्यांच्या इच्छेकरता लग्न करावे लागते. लग्न हे मानवी आयुष्य सुखाने व्यतित करण्याकरिता ईश्वरीय व्यवस्था आहे.
- **स्वतःचे कुटुंब तयार करण्यासाठीः** मूल दत्तक घेणे किंवा सिंगल पॅरेंट बनणे खूप सोपे आहे. पण, पुरुष मात्र हे करु शकत नाही. त्यांना जर स्वतःचे कुटुंब तयार करायचे असेल तर त्यांना लग्न करणे फार गरजेचे आहे. त्यामुळे स्वतःचे कुटुंब तयार करण्यासाठी कायदेशीर लग्न करतात.
- **उत्पन्न वाढविण्याकरिता :** तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटले असेल ना पण, हे खरे आहे. डिबंकिंग द बॉल अँड चेन मिथ ऑफ मॅरेज फॉर मेन या अभ्यासानुसार, विवाहित पुरुष अविवाहित पुरुषांपेक्षा अधिक कमवतात आणि अधिक बचत करतात.असे या अहवालात दिसून आले आहे.
- **समाजात स्थान मिळविण्याकरिता :** अविवाहित पुरुषापेक्षा समाजामध्ये लग्न झालेल्या व्यक्तील विशेष मान असतो. हा मान मिळावा म्हणून पुरुष वर्ग विवाहास तयार होतो. लग्न झालेला व्यक्ती अधिक जबाबदारीने वागू लागतो. यामुळे पालक मुलाचे विवाह करण्यास आतूर असतात. आपल्या मुलाने आपल्या कुटुंबाच्या जीवनशैलीनुसार समाजामध्ये आपला दर्जा वाढवावा याकरिता पालक वर्ग मुलांच्या विवाहाबाबत विशेष आग्रही असतात.
- **सुखाने जीवन जगण्याकरिता :** लग्न झाल्यानंतर आणि मुल जन्माला आल्यानंतर आपल्याला जीवन जगण्याचा उद्देश मिळतो. ज्या व्यक्तीचे लग्न

होत नाही किंवा ज्यांचा घटस्फोट होतो. अशा व्यक्तीच्या जीवनात अनेक मानसिक आजारांचा प्रवेश होता. आत्महत्या करण्यापर्यतचा विचार करतात किंवा अशा व्यक्ती गुन्हेगारीकडे वळतात.

**लग्नाचा निर्णय घेण्यापूर्वी स्वतःला विचारा**

विवाह हा मानवाच्या आयुष्यातील असा एक निर्णय आहे की, ज्यामुळे आपले संपूर्ण आयुष्य बदलू शकते. जर तुम्हाला एक चांगला जोडीदार मिळाला तर तुमच्यासाठी जीवनातील सर्व आव्हानांवर मात करणे सोपे होते. पण, जर जोडीदार योग्य नसेल तर संपूर्ण आयुष्य एक आव्हान बनते. म्हणून, कोणत्याही व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी, त्याची कसून तपासणी करणे अत्यंत महत्वाचे आहे. लग्न म्हणजे केवळ रोमान्स करण्याचा परवाना नाहीतर, लग्न जुळणाऱ्या दोन्हीकुटूंबाच्या अपेक्षा, अनेक जबाबदाऱ्या आणि आयुष्यभर बांधिलकी असते. सुरुवातीला परिपूर्ण वाटणारा विवाह हनिमूनचा कालावधी संपल्यानंतर आयुष्यभऱ्याचे ओझे वाटू लागते. तुम्हाला जर प्रामाणिकपणे लग्नगाठ बांधायची असेल तर काही गोष्टींचा आधीच विचार करणे फार गरजेचे आहे. आयुष्यभर जोडीदाराची आणि मुलाबाळाची जबाबदारी पार पाडण्याची आपली तयारी असेल, तरच लग्न करावे अन्यथा कोणाचेही आयुष्य बरबाद करु नये.

- लग्नासारखा मोठा निर्णय घेण्यापूर्वी, तुम्ही स्वतःला लग्नाकरिता तयार करणे आवश्यक आहे. बरेच लोक त्यांच्या अविवाहित जीवनात खूप आनंदी असतात आणि ते स्वतःच्या स्वातंत्र्याशी तडजोड करू इच्छित नाहीत. जर तुम्ही स्वतः मानसिक दृष्ट्या लग्नाकरिता तयार असाल तर,लग्नाकरिता पुढे जाण्यास हरकत नाही.
- लग्न ही जीवनातली खूप महत्वाची आणि एकदम आवश्यक गरज नाही. साधारण भाषेत लग्न म्हणजे काय तर दोन व्यक्ति आवडीने आयुष्याचा प्रवास सोबत करायला होकार देतात.
- लग्न म्हणजे जबाबदारी असून लग्नाच्या वेदीवर जोडीदाराचा स्विकार केल्यापासून तुमच्यावर नवीन व्यक्तीची जबाबदारी येवून पडते. आणि त्या क्षणापासून ही जबाबदारी तुम्हाला पार पाडण्यास तयार व्हावे लागते. जोडीदाराला प्रत्येक प्रकारे आनंदी ठेवणे, दोन्ही कुटुंबात सुसंवाद राखणे तसेच नव्याने निर्माण झालेली अनेक नाती जपण्याकरिता आपण तयार असणे आवश्यक आहे.
- लग्नासारखा महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी एकमेकांना समजून घेणं खूप गरजेचे आहे. अशा परिस्थितीत केवळ एकमेकांच्या आवडीनिवडी जाणून घेणे पुरेसे नाही. म्हणूनच जोडीदाराच्या सवयी, जीवनशैली, करिअर आणि वागणूक समजून घेण्यासाठी पुरेसा

वेळ दिल्यानंतर लग्नाचा निर्णय घेणे चांगले आहे. यामुळे लग्नाचा निर्णय घेतल्यानंतर तुमच्या नात्यात कोणतीही नकारात्मकता येणार नाही.

- लग्नानंतर माणसांच्या जबाबदाऱ्या दुहेरी होतात. अशा परिस्थितीत तुम्हाला तुमच्यासोबतच तुमच्या जोडीदाराचीही काळजी घ्यावी लागते. दुसरीकडे, जोडीदाराच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष केल्याने तुमच्या नात्यात वितुष्ट निर्माण होते. त्यामुळे लग्नाचा निर्णय घेताना जबाबदारीसाठी स्वतःला तयार करा. यामुळे लग्नानंतर तुम्हाला जास्त त्रास सहन करावा लागणार नाही.

## विवाहित जीवन यशस्वी करण्याची दोघांचीही जबाबदारी

या जगामध्ये गरीब व श्रीमंत घराण्यामध्ये कितीतरी आनंदी विवाहित जोडपी आहेत. जे पती पत्नी एकमेकाचा विचाराचा आदर करतात. एकमेकांना समजावून घेतात. मग, ती सर्व जोडपी कोणत्याही गटातील असोत. जन्मजन्मातरित एकेमेकाशिवाय राहू शकत नाहीत असे मानतात आणि असे विवाह यशस्वी झाल्याचे दिसून येतात. जे पती पत्नी एकमेकांवर जिवापाड प्रेम करतात आणि एकमेकाच्या इच्छेला प्रथम प्राधान्य देतात असे विवाह यशस्वी होतात. त्याकरिता दोघांनीही ठरविलेल्या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

- संसारात पती-पत्नीपेक्षाही चांगले मित्र म्हणून राहणे जास्त गरजेचे आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये एकमेकांना मानसिक आधार दिला तर हे नाते जन्मभर टिकू शकते. तेव्हा एकमेकांवर टिका करण्याऐवजी एकमेकांचा आदर करा.

- यशस्वी विवाहाची गुरुकिल्ली म्हणजे प्रेम, समज, परस्पर आदर, विश्वास, बांधिलकी आणि एकत्रता होय. ज्यांच्यांमध्ये या घटकांचा अभाव आढळतो. अशा व्यक्तीमध्ये कौटूंबिक कलहास सुरवात होते. अशा जोडप्यांना घटस्फोटासारखे प्रतिकूल परिणाम भोगावे लागतात. विश्वासाचा अभाव, परस्पर आदर, प्रेम आणि समजूतदारपणा असे संबंध बिघडण्यास कारणीभूत ठरतात.

- पतीपत्नीने एकमेकांबद्दल योग्य दृष्टिकोन बाळगला पाहिजे. प्रत्येकाने जर एकमेकांच्या चांगल्या गुणांवर व एकेकांच्या आपला संसार सुखी करण्याच्या प्रयत्नांवर आपले लक्ष केंद्रित केले तर त्यांचे वैवाहिक जीवन आनंददायक होते.

- लग्न केले म्हणजे जोडीदाराने तुमच्या सर्व अपेक्षा पूर्ण केल्या पाहीजे असा त्याचा अर्थ नाही तर, दोघांनीही आपल्या ईच्छा पूर्ण करण्याकरिता तडजोडी करणे आवश्यक आहे. जेणे करुन दोघेही आपल्या आयुष्यात आनंदी होतील.

*******

**प्रकरण २ रे**

# लग्न करार की संस्कार

*मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे, त्याला समूहाने राहायला आवडते. एकांतवासात मनुष्य अधिक कालावधीत राहू शकत नाही. अगदी अश्व युगापासूनही मनुष्य हा समूहानेच राहत आला आहे. यामधूनच कुटुंब व्यवस्था ही संकल्पना उदयास आली.  हिंदू धर्मात लग्न म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील नाते नसून दोन कुटुंबांचे मिलन असते. हिंदू धर्मात लग्नाचे नाते अत्यंत पवित्र मानले जाते. हिंदू धर्माच्या पौराणिक कथेनुसार, जेव्हा ब्रह्मांडाची निर्मिती झाली तेव्हा भगवान ब्रह्मदेवाने आपल्या शरीरातून दोन तुकडे निर्माण केले, त्यापैकी एका तुकड्याचे नाव का आणि दुसऱ्या तुकड्याचे नाव या ठेवले. या दोघांनी मिळून शरीराची काया निर्मिती केली आणि या कायेतून स्त्री-पुरुष घटकांचा जन्म झाला असे मानले जाते. यामध्ये पुरुष तत्वाला स्वयंभू मनु असे नाव देण्यात आले आणि स्त्री तत्वामध्ये जन्मलेल्या पहिल्या स्त्रीचे नाव शतरूपा ठेवण्यात आले. स्वयंभू मनू आणि शतरूपा हे पहिले जोडपे मानले जाते. जेव्हा हे दोघेही पृथ्वीवर प्रथम आमनेसामने आले, तेव्हा त्यांना ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या विधी आणि कौटुंबिक ज्ञानातून वैवाहिक जीवनात प्रवेश करण्याची दिशा मिळाली. धार्मिक पुराणांमध्ये असे म्हटले जाते की, विवाहाची सुरुवात श्वेत ऋषींनी केली होती. श्वेत ऋषींनीच लग्नासाठी परंपरा, नियम, प्रतिष्ठा, लग्नाचे महत्त्व, सिंदूर, मंगळसूत्र आणि सप्तपदीसह सर्व प्रकारच्या प्रथा प्रस्थापित केल्या. यामध्ये हिंदू धर्मामध्ये लग्न हा सोळावा संस्कार मानल्या गेला आहे. ज्यामध्ये पतीपत्नी आयुष्यभर सुखदुखःमध्ये सोबत राहण्याची प्रतिज्ञा घेते.*

## संस्काराचे महत्व

कुटुंब ही सर्व समाजातील एक प्रमुख सामाजिक संस्था असून, ज्यामुळे पत्नी, पती, जोडीदार, आई, बाबा, भाऊ, बहीण इत्यादी नाती तयार होतात. ती सर्वमान्य होऊन स्वीकारलीही गेली आहेत. विवाह हा हिंदू धर्मातील सोळा संस्कारापैकी एक गोड संस्कार आहे. त्यामध्ये दोन कुटुंबे जोडली जातात. दोन मने एकत्र येतात. या सोहळ्यात वधू-वरांची सलगी वाढण्यासाठी उष्टी हळद लावणे, सुवर्णाभिषेक अशा कार्यपध्दतीचा वापर केला जातो. या संस्कारामध्ये वडिलधाऱ्या मंडळींचा योग्य सन्मान केला जातो. वधू व वरपक्ष एकमेकांचे आदरसत्कार करतात. या संस्कारामध्ये वधू व वर दोघेही देव अग्नी, पुरोहित यांच्यासमोर एकमेकांशी कायम एकनिष्ठ राहण्याचे वचन देतात. सप्तपदीवेळी दोघेही एकत्र सात पावले चालून नाते आणखी दृढ करतात. वधूचे गोड नाव ठेवले जाते. उंबरठ्याचे माप ओलांडून प्रवेश

करणाऱ्या या गृहलक्ष्मीच्या आगमनाने सर्व कुटुंब आनंदी होते. या संस्कारामध्ये त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते.

## विवाह हा 'संस्कार', करार नाही...

भारतात विवाह पध्दती  वेदकाळापासून चालत आली आहे. प्रत्येक व्यक्तीवर १६ संस्कार केले जावेत, असे म्हटले आहे. त्यातील विवाह हा १५ वा संस्कार आहे. शास्त्राने संस्कारांची परिभाषा अगदी समर्पकपणे अशी केली आहे, 'माणसाचे अंगी असलेले दुर्गुणादी दोष काढून टाकून त्या जागी सद्गुण निर्माण करणे व एखादे हिनांग असेल तर ते भरून काढणे म्हणजे संस्कार' होय .

विवाह या शब्दाची उत्पत्ती वि+वहब अशी आहे. विशिष्ट मार्गाचे जीवन, कूळ, समाज वाहून नेणे असा याचा अर्थ आहे.  विवाह म्हणजे ठराविक मार्गाचे जीवन, कुळ, समाज, वाहून नेणे हा त्याचा अर्थ आहे.  संस्कार म्हणजे कोणत्याही वस्तूचे आपल्या इच्छेप्रमाणे रुपांतर करून घेणे होय. ज्याप्रमाणे हि-याला पैलू पाडून त्यास मौल्यवान करतात त्याप्रमाणे विवाह संस्काराच्या माध्यमातून वधु वराच्या मनावर संस्कार घडवणे हा या संस्काराचा उद्देश आहे. विवाह हा हिंदूंचा 'संस्कार' आहे 'करार' नाही. त्यामुळे विवाहाला सामाजिक संदर्भाबरोबरच भावनिक व श्रद्धेच्या बरेच वरचे स्थान आहे. सांस्कृतिक पातळीवर विवाहबंधन अत्यंत पवित्र संस्कार मानला जातो.

## लग्नविधीची परंपरा

भारतीय विवाह परंपरेत 'वसुधैव कुटुम्बकम'ची अनुभूती येते. प्रामुख्याने देव, ऋषी आणि लोक अशा प्रमुख उपस्थितीत विवाह संस्कार केला जातो. इस्लामी परंपरेत विवाह एक अनुबंध (करार) आहे. भारतीय परंपरेत समाजाच्या सामूहिक उपस्थितीचा संस्कार आहे. विवाह पवित्र बंधन आहे. विवाह समाज संघटनाचा आधार आहे. विवाहामुळे कुटुंबसंस्था निर्माण होते. कुटुंबांच्या योगाने समाज बनतो. कुटुंब ही प्रेमपूर्ण संस्था आहे. विवाह  हा मानवाच्या आयुष्यातील महत्वाचा संस्कार असून लग्नविधीचा हा संस्कार पुढील विधीच्या माध्यमातून पुर्ण केला जातो.

१. **लग्नाचा बेडियर :**हिंदू परंपरेनुसार या विधीमध्ये वधू-वरांच्या कुंडली किंवा 'पत्रिका' जुळविण्यात येतात. हा एक अतिशय महत्वाचा विधी असून मुलगा आणि मुलगी यांच्या कुंडली किंवा पत्रिका कुटुंबातील पुजारी जुळवतात आणि जोडप्याच्या लग्नासाठी एक शुभ वेळ आणि तारीख निश्चित केली जाते.

२. **साखर पुडा :** साखरपुडा हा मराठी लग्नसमारंभात होणारा पहिला प्री-वेडिंग फंक्शन आहे. हा दोन्ही पक्षात लग्न होत असल्याची अधिकृत प्रतिबद्धता म्हणून हा समारंभ आयोजित केला जातो. या समारंभात वराची आई  आशीर्वाद म्हणून

वधूच्या कपाळावर  हळदी-कुमकुम लावते आणि तिला साडी, दागिने आणि साखरपुडा  किंवा मिठाई भेट देते. यानंतर, जोडपे अधिकृतपणे एंगेजमेंट रिंग्जची देवाणघेवाण करतात. साखरपुडाचा अर्थ दोन्ही कुटूंब आपल्या मुलामुलीचे लग्न लावण्यास तयार झाले असा होतो.

३. **मुहूर्त काढणे:** एकदा साखरपुडा झाला की, दोन्ही कुटूंबाद्वारे लग्नाची एक तिथी निश्चीत केली जाते.

४. **केळवण:** लग्नाच्या काही दिवस आधी केळवण केली जाते. यावेळी दोन्ही कुटुंबे त्यांच्या कुलदेवतेची पूजा करतात. पूजा समारंभ साधारणपणे कुटुंब आणि जवळच्या नातेवाईकांसोबत जेवणानंतर केला जातो.

५. **हळद चढविणे:** ' हळद चढविणे ' हा सभारंभ लग्नाच्या एक दिवस अगोदर केला जातो. यावेळी पाच  सुहासिनी  प्रथम  वराच्या कपाळावर, खांद्यावर, हातावर व पायावर आंब्याच्या पानांसह हळदीची पेस्ट लावतात. त्यानंतर ते तीच पेस्ट वधूला घेऊन जातात आणि तोच विधी करतात.

६. **चुडा समारंभ:** चुडा समारंभाच्या वेळी वधूला सोन्याच्या किंवा मोत्यांसह हिरव्या काचेच्या बांगड्यांचा संच दिला जातो किंवा हिरव्या बांगड्या हातात घातल्या जातात. हिंदू संस्कृतीत हिरवा हा जीवन, सृष्टी आणि प्रजनन यांचे प्रतीक म्हणून पाहिले जाते.

७. **गणपती पूजन:** देवदेवक आणि पुण्यवचन: गणपतीच्या पूजेने लग्नाच्या दिवसाची सुरुवात होते. गणपतीची पूजा जोडप्याला उज्वल, अडथळ्याशिवाय भविष्यासाठी आशीर्वाद देण्यासाठी केली जाते. यावेळी कौटुंबिक देवता किंवा कुलदेवता, जोडप्याला आशीर्वाद देण्यासाठी पुन्हा एकदा मंडपात आमंत्रित केले जाते. त्यानंतर वधूचे पालक तिला लग्नाच्या ठिकाणी घेऊन जातात आणि उपस्थित नातेवाईकांना पुण्यवचनाच्या (मंगलाष्टके) वेळी वधू वराला आशीर्वाद देण्याची विनंती करातात. यालाच देवाब्राम्हणाच्या साक्षीने लग्न लावण्यात आले असे म्हटले जाते.

८. **सीमापूजा आणि गौरीहर पूजा :** सीमापूजेमध्ये लग्न स्थळी वराच्या आगमनानंतर, वधूची आई वराला ओवाळणी घालते आणि मिठाई देऊन स्वागत करते. यानंतर गौरिहर पूजेमध्ये वधू  देवी पार्वतीची पूजा करते आणि पार्वतीकडून समृद्ध जीवनासाठी आशीर्वाद घेते.

९. **अंतरपट :** जेव्हा लग्नस्थळी वधूवरामध्ये एक कापड धरले जाते याला अंतरपाट म्हणतात. वधू आणि वरांना पाटावर उभे करुन ते एकमेकांना दिसू नयेत म्हणून अंतरपट धरला जातो आणि नंतर पुण्यश्लोक (मंगलाष्टके) म्हटली जातात. लग्नाला जमलेली मंडळी त्यांच्यावर अक्षदांचा वर्षाव करतात.

१०. **संकल्पः** या विधीमध्ये वधूवरांसमोरील अंतरपट काढला जातो. वधूवर एकेमेकांना जयमालाची देवाणघेवाण करतात आणि लग्नाला जमलेले वऱ्हाडी वधूवरांच्या डोक्यावर अक्षता किंवा संपूर्ण तांदूळ घालून त्यांना पुढील जीवनाच्या वाटचालीकरिता आशिर्वाद देतात.

११. **कन्यादानः** भारतातील सर्व विवाहांमध्ये सामान्य असलेल्या विधीमध्ये कन्यादान हा महत्वाचा विधी मानला जातो. यामध्ये वधूचे वडील वराला आशीर्वाद देऊन त्याच्या हातात आपली मुलगी सुपूर्द करतात. वर वधूचा स्वीकार करुन आयुष्यभर तिचे संरक्षण करण्याचे, आपल्या पत्नीवर कायम प्रेम आणि आदर करण्याचे वचन वधू पित्याला यावेळी देतो.

१२. **लाजाहोमाः** लाजाहोमा दरम्यान, वधू हवन किंवा पवित्र अग्नीला धान्य अर्पण करते, तर वराने पुनरावृत्ती केलेल्या तीन मंत्रांचा उच्चार केला जातो. चौथा मंत्र फक्त वधूनेच शांतपणे उच्चारला आहे. यानंतर, वधूचे पालक विष्णू आणि लक्ष्मीचे अवतार म्हणून या जोडप्याची पूजा करतात. वधू आणि वर एकमेकांच्या हातावर हळदीचा दोरा बांधतात आणि नंतर वर वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो. शेवटी, तो तिच्या कपाळावर कुंकू (सिंदूर) लावतो.

१३. **सप्तपदीः** त्यानंतर हे जोडपे ' सप्तपदी ' करतात. सप्तपदी दरम्यान, ते पवित्र अग्नीभोवती सात वेळा प्रदक्षिणा घालताना मोठ्याने सात लग्नाच्या प्रतिज्ञा करतात.

१४. **कर्मसमप्तीः** 'कर्मसमाप्ती'मध्ये नवविहाहित जोडपे लक्ष्मीपूजन करतात. काही भागात यावेळी वर वधूला नवीन नाव देतात. या विधीमध्ये वधूचा भाऊ चिडवून वराच्या कानाला मुरडतो आणि त्याला त्याच्या वैवाहिक कर्तव्याची आठवण करून देतो. शेवटी हे जोडपे सर्वांचे आशीर्वाद घेतात.

१५. **वरातः** लग्नात वरात म्हणजे मुळात वधूला तिच्या पालकांच्या घरातून तिच्या पतीच्या घरी जाण्याकरिता निरोप दिला जातो. वधूचा निरोप घेत असताना, वर गौरीहर पूजेपासून पार्वतीची मूर्ती घेऊन जातो . सहसा, एक मोठी मिरवणूक वधूच्या मागे तिच्या सासरच्या घरी जाते.

१६. **गृहप्रवेश :** गृहप्रवेश दरम्यान नवविवाहित जोडप्याचे वराच्या कुटुंबाच्या घरी स्वागत केले जाते. वराची आई दुधाने आणि पाण्याने जोडप्याचे पाय धुते आणि ओवाळणी करते. मग, घरात प्रवेश करताना, वधूला तांदूळाचा कलश खाली ढकलण्यास सांगितले जाते. मग उजवा पाय पुढे करून वधू तिच्या नवऱ्यासोबत तिच्या नवीन घरात प्रवेश करते.

१७. **रिसेप्शन** :लग्नाच्या सर्व विधींचे पालन करून, अंतिम उत्सव पार्टी आयोजित केली जाते. रिसेप्शन दरम्यान, वधू वराच्या कुटुंबाने तिला भेटवस्तू दिलेली साडी घालते आणि वर वधूच्या पालकांनी भेट दिलेला पोशाख परिधान करतो.

या पार्टीत जमलेल्या सर्व पाहुण्यांना वधू आणि वरांचा अधिकृतपणे जोडपे म्हणून परिचय करुन दिला जातो.

## लग्नातील महत्वाचा विधी सप्तपदी

संस्कृतमध्ये सत्तपदी या शब्दाचा अर्थ सप्त म्हणजे 'सात' आणि पदी म्हणजे 'पायऱ्या' असा ओळखला जातो. या विधीमध्ये वधूवर पवित्र अग्नीच्या साक्षीने सात प्रतिज्ञां करतात. या विधीमध्ये वधू-वरांसमोर तांदळाच्या ७ राशी ठेवल्या जातात. सात मंत्रांच्या जपाने वराने वधूला चालवत त्या बाजूला सारल्या जातात. एकेका राशीवर उजवे पाऊल ठेवत प्रत्येक पाऊल ठेवल्यावर मंत्र म्हणतात. या सात फेरीमध्ये खालीलप्रमाणे वधु आणि वर एकमेकांना वचने देतात.

- **पहिले पाऊल :** तू एक पाऊल चाललीस, तुझे माझे सख्य झाले. सुंदर अन्न तयार करणारी अन्नपूर्णा हो. माझ्याशी एकनिष्ठ वाग. आपल्या कुटुंबाचे आपण कल्याण करु. यात वर-वधू शुद्ध आणि पौष्टिक अन्नासाठी देवाकडे प्रार्थना करतात. यात जोडपे जीवनाच्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करून त्यांचे जीवन सदैव समृद्ध करण्याचे वचन घेऊन पाऊल उचलतात.

- **दुसरे पाऊल** : तू माझ्यासोबत दोन पाऊले चाललीस, माझे बळ वाढवणारी हो, आपण धैर्य आणि सामर्थ्य ठेवून कुटुंबातील आनंद संरक्षित ठेऊ. निरोगी आणि समृद्ध आयुष्यासाठी देवाकडे प्रार्थना करतात. निरोगी जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक सामर्थ्याने नेहमी एकमेकांना आधार देण्याचे वचन घेऊन पाऊल उचलतात.

- **तिसरे पाऊल :** तू माझ्यासोबत तीन पाऊले चाललीस, धनप्राप्त करुन देणारी हो. आपण दोघे संपत्ती व ज्ञानाची समृद्धी करु. यात जोडपे संपत्तीसाठी देवाकडे प्रार्थना करतात. एकमेकांशी विश्वासू राहणे आणि स्वतः साठी आणि कुटुंबासाठी श्रीमंत आणि समृद्ध जीवन जगण्याचे वचन घेऊन पाऊल उचलतात.

- **चवथे पाऊल :** तू माझ्यासोबत चार पाऊले चाललीस, तू सुख वाढवणारी हो. आपण दोघेही सुख, आनंद वाढवू. सुखासाठी तसेच एकमेकांबद्दल आणि त्यांच्या संबंधित कुटुंबांबद्दल प्रेम आणि आदर वाढवण्यासाठी देवाकडे प्रार्थना करतात आणि पाऊल उचलतात..

- **पाचवे पाऊल :** तू माझ्याबरोबर पाच पाऊले चाललीस, तू संतती वाढवणारी हो. आपण दोघे सद्गुणी संतती निर्माण करु. संततीसाठी देवाकडे प्रार्थना करतात आणि पाऊल उचलतात.

- **सहावे पाऊल :** तू माझ्याबरोबर सहा पाऊले चाललीस, तू सर्व ऋतुमध्ये सुख देणारी हो. शांतीपूर्ण दीर्घायुष्यासाठी देवाकडे प्रार्थना करतात आणि पाऊल उचलतात.

- **सातवे पाऊल :** तू माझ्यासोबत सात पाऊले चाललीस तुझे माझ्याशी सख्य दृढ होवो. आपल्या कुटुंबाचे सुख-दुःख आपण आपल्या हृदयात जतन करु. वर-वधू सहवास, एकत्रता, निष्ठा आणि समंजसपणासाठी देवाला प्रार्थना करतात. एकमेकांचे मित्र बनवण्याची आणि आयुष्यभर मैत्री निभावण्याची परिपक्वता देण्याची प्रार्थना करतात. यात नवरा वधूला म्हणतो की तू आता सात पावले माझ्यासोबत चालली आहेस यास्तव माझी दृढ सखी हो. शेवटच्या फेऱ्यात जोडपे विश्वाच्या शांतीसाठी देखील समंजस जीवन, निष्ठा, एकता आणि सहवासासाठी प्रार्थना करतात आणि पाऊल उचलतात.

ही सात वचने एक वधूवरांना जिवनाचा पाया प्रदान करतात असे मानले जाते ज्याभोवती मजबूत आणि शाश्वत नातेसंबंध बांधले जातात. जरी आपण वैदिक काळापासून खूप दूर आलो आहोत. हिंदू परंरपेरनुसार लग्नातील सप्तपदीचे महत्व सर्वोच्च न्यायालयानेसुध्दा मान्य केले आहे. १ मे २०२४ रोजी बुधवारी एका प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती बी. नागरत्ना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला की, हिंदू विवाह हा एक संस्कार असून हा नाचगाण्याचा, जेवणाचा किंवा दारु पिण्याचा कार्यक्रम नाही. सप्तपदी आणि इतर विधींशिवाय हिंदू विवाह मान्य नाही. हिंदू विवाहादरम्यान जर आवश्यक ते विधी झाले नाही, तर तो विवाह मान्य होणार नाही. असे विवाह निरर्थक समजले जातील. नोंदणी केली, तरी हे विवाह वैध राहणार नाहीत. कारण हिंदू विवाहदरम्यान सप्तपदीसारखे विधी अतिशय महत्त्वाचे आहेत. तसेच वादविवादांच्या प्रकरणात असे विधी पुरावा म्हणून ग्राह्य धरले जातात.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती बी. नागरत्ना यांच्या खंडपीठाने आपल्य ानिर्णयात स्पष्ट केले की, हिंदू विवाह हा एक संस्कार असून विवाहाला भारतीय समाजात एक महत्त्वाची संस्था म्हणून दर्जा मिळायला हवा. तसेच तरुणांनी विवाहाचा विचार करताना भारतीय समाजात विवाह संस्था ही किती पवित्र आहे, याचा विचार करायला हवा, असेही न्यायालयाने म्हटले आहे. लग्न म्हणजे नाच-गाणे, जेवणे, दारु पिणे किंवा हुंड्यासह अनावश्यक वस्तूंची देवाण घेवाण करण्याचा कार्यक्रम नाही. हा भारतीय समाजातील एक महत्त्वाचा समारंभ आहे. या समारंभाद्वारे स्त्री आणि पुरुष यांच्यात एक विशिष्ट नाते तयार होते ज्यामुळे त्यांना पती-पत्नीचा दर्जा दिला जातो.

## लग्नातील दुसरा महत्वाचा विधी 'कन्यादान'

घरात मुलगी जन्माला आली की, सर्वांनाच आनंद होतो पण सर्वात जास्त आनंद होतो तो वडिलांना असे नेहमीच म्हटलं जाते. मुलीच्या जन्मापासून ते तिचे लग्न होईपर्यंत तिला प्रत्येक घरात जपले जाते. वडील - मुलीचे नाते अधिक घट्ट करणारा आणि अधिक भावनिक असा जर कोणता विधी असेल तर तो म्हणजे

कन्यादान. पुण्यवचनाच्या विधीपासून सुरू झालेला विवाहसोहळा कन्यादानाच्या विधीपर्यंत प्रचंड भावनिक होतो. लग्नातील सर्वात महत्त्वपूर्ण संस्कारांपैकी हा एक संस्कार महत्वाचा मानला जातो. कन्यादान अर्थात दुसऱ्या मुलाच्या हाती आपल्या मुलीला सोपवणे असा अर्थ सहसा मानला जातो. या संस्कारामध्ये मुलीचे वडील केवळ आपली मुलगी दान करत नाहीत, तर अग्निला साक्षी ठेऊन आपल्या मुलीचे गोत्र दान करतात. या विधीनंतर मुलगी आपल्या माहेरचे अर्थात वडिलांच्या कुळाचे गोत्र सोडून आपल्या पतीच्या म्हणजेच नवऱ्याच्या वंशाचे गोत्र धारण करते. इतकेच नाही तर परंपरेनुसार या विधीमध्ये होत असलेल्या मंत्रोच्चारणा दरम्यान वडिल मुलाकडून आपल्या मुलीची सुरक्षा, आनंद याची जबाबदारी आपल्याप्रमाणेच मुलाने सांभाळावी असे सांगून मुलीला त्याच्याकडे सुपूर्द करतात.

## गोत्र म्हणजे काय?

ज्योतिषशास्त्रानुसार गौतम, कश्यप, वशिष्ठ, भारद्वाज, अत्री, अंगिरस, मृगु. या सात सप्तर्षींच्या वंशजांच्या रुपात गोत्र संकल्पना मानली गेली आहेत. गोत्रांची मान्यता वैदिक काळापासून सुरू झाली होती. सोप्या शब्दात गोत्र म्हणजे एकाच रक्ताच्या व्यक्तींनी एकत्र येऊन लग्न करू नये यासाठी तयार करण्यात आलेली लग्न व्यवस्था बनवली गेली आहे आणि आजही या पद्धतीचे पालन केलं जाते.

गोत्र परंपरेनुसार एकाच गोत्रात जन्माला आलेला मुलगा आणि मुलगी यांच्यात भाऊबहिणीचे नाते मानले जाते. याचे कारण असे की, एकाच गोत्रात जन्मलेला मुलांमुलींचा रक्तगट सारखा असतो. जर मुलगा आणि मुलगी यांनी एकाच गोत्रात लग्न केल्यास तर, मूल होण्यात अडथळे येतात आणि गर्भात जनुकीय विकृती निर्माण होते. म्हणजे मुलामध्ये मानसिक किंवा शारीरिक किंवा दोन्ही प्रकारची विकृती असू शकते. आज ही संकल्पना मान्य केली आहे आणि आपल्या पूर्वजांची ४००० वर्षापासून या संकल्पनेचे पालन केले आहे. हिंदू धर्मात किमान तीन गोत्र सोडून लग्न करायची अनुमती दिली गेली आहे. पहिले वडीलांचे गोत्र, दुसरे आईचे गोत्र आणि तिसरे आजी म्हणजेच वडीलांच्या आईचे गोत्र. हिंदू परंपरेनुसार ही गोत्र सोडून इतर कोणत्याही गोत्रात लग्न करायला अनुमती दिली गेली आहे.

## लग्नाकरिता पत्रिका पाहणे किंवा गुण जुळविणे आवश्यक आहे का?

योग्य ठिकाणी लग जुळविण्याकरिता वधूवरांच्या पालकांचा एकच उद्देश असतो, तो म्हणजे दोघांचेही सांसारिक जीवन सुखात जावे आणि आयुष्याचा शेवट सुखात व्हावा. लग्न जूळविण्याच्या अनेक प्रक्रियेपैकी एक प्रक्रिया म्हणजे वधू वरांचे गुण जुळतात का किंवा किती गुण जुळते हे पाहणे. पती-पत्नीमध्ये जुळणारे गुण असणे यामध्ये खूप महत्वाचे मानले जाते. हे गुण जन्मकुंडलीद्वारे जुळविले जाते.

कोणत्याही व्यक्तीची जन्मतारीख, वेळ आणि जन्मस्थान आणि जन्माच्या वेळी ग्रहांची स्थिती लक्षात घेऊन ही जन्मकुंडली बनवली जाते. मग लग्नाच्या वेळी मुलगा आणि मुलगी यांची जन्मकुंडली जुळविले जाते.

- ज्योतिष शास्त्रानुसार वैवाहिक दृष्टिकोनातून कुंडली जुळवतांना भाव जुळणी, अष्टकूट जुळणी, मंगल दोष विचार, दशा आचिणि विचार या पाच महत्त्वाच्या आधारे कुंडली जुळवली जाते. उत्तर भारतात गुण जुळण्यासाठी अष्टकूट जुळणी प्रचलित आहे, तर दक्षिण भारतात दशकूट जुळणीची पद्धत अवलंबली जाते. वरील पाच महत्त्वाच्या पैलूंपैकी अष्टकूट जुळणीच्या महत्त्वाच्या आठ गुणांचा विचार करणे ही महत्त्वाची बाब आहे. अष्टकूट जुळणी म्हणजे आठ प्रकारे वधू-वर यांचे गुण जुळविले जातात.
- लग्नाच्या बाबतीत कुंडली जुळवणे खूप खास मानले जाते. ज्योतिष शास्त्रानुसार जेव्हा लग्नाचा प्रश्न येतो तेव्हा सर्वप्रथम कुंडली जुळवण्याच्या प्रक्रियेमध्ये मुला-मुली दोघांचीही गुण मिसळलेली आहेत हे तपासले जाते. यावरुन वधू वर हे दोघे एकमेकांसाठी लग्नाकरिता बनलेले आहेत की नाही हे शोधून काढले जाते.
- ज्योतिषशास्त्रानुसार गुणांची जुळवाजुळव करताना एकूण ८ गुणांचा विचार केला जातो. प्रत्येक गुणवत्तेची स्वतःची संख्या असते. याच्या आधारे एकूण किती गुण आहेत हे ठरवले जाते. सर्वप्रथम हे ८ गुण कोणते आहेत आणि त्यांची संख्या काय आहे हे जाणून घेतले जाते.
- यामध्ये वर्ण ज्याची संख्या १, वश्य जिची संख्या २, तारा जिची संख्या ३, योनी जिची संख्या ४ आहे. तसेच ग्रह मैत्री ५ गुण, गण ६ गुण, भकूट ७ गुण, नाडी ८ गुण मिळून एकूण ३६ गुण होतात. जर यामध्ये

१. १८ पेक्षा कमी गुण जुळ्यास तर, विवाहासाठी पात्र नाही किंवा अयशस्वी विवाह ठरतो.

२. १८ ते २५ गुण जळल्यास तर लग्नासाठी चांगली जुळणी मानली जाते.

३. २५ ते ३२ गुण जुळल्यास तर, विवाहासाठी सर्वोत्तम जुळणी, विवाह यशस्वी मानला जातो.

४. ३२ ते ३६ गुण जुळल्यास तर, हे एक उत्कृष्ट गुण मिलन मानले जाते आणि हा लग्न यशस्वी होईल असे गृहीत धरले जाते.

- ज्योतिषशास्त्रानुसार जेव्हा जेव्हा लग्नासाठी कुंडली जुळतात तेव्हा सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मंगल दोष तपासणे. जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत मंगळ लग्नाच्या पहिल्या, दुसऱ्या, चौथ्या, सातव्या, आठव्या आणि बाराव्या घरात असेल तर अशा स्थितीत त्या व्यक्तीला मांगलिक म्हणतात. जर अशा

व्यक्तीचे मांगलिक नसलेल्या व्यक्तीशी लग्न केल्यास असे लग्न मोडण्याची शक्यता जास्त असते.

■ ज्योतिषशास्त्रानुसार लग्नासाठी वधू आणि वरामध्ये किमान १८ गुण जुळणे चांगले मानले जाते. एकूण ३६ गुणांपैकी १८ ते २१ गुण आढळल्यास जुळणी मध्यम मानली जाते. अधिक गुण आढळल्यास त्याला शुभ विवाह जुळवणी म्हणतात. कोणत्याही वधू-वरामध्ये ३६ गुण असणे अत्यंत दुर्मिळ मानले जाते. धार्मिक श्रद्धेनुसार भगवान श्रीराम आणि सीतामाता यांचे ३६ गुण जुळले होते. जर कुंडलीत १८ गुणांपेक्षा कमी म्हणजेच १७ गुण जुळले तर तुम्ही लग्न करू नये. असा विवाह आनंदी असू शकत नाही त्यामुळे लग्न करणे टाळले पाहिजे.

हिंदू विवाहपद्धतीत लग्न हा करार नसून एक संस्कार आहे. पण माणूस संस्कार मानत नाही तेव्हा त्याला दुसरा मार्ग दाखवावा लागतो तो म्हणजे कायदा; एकंदर माणसाची प्रवृत्ती धार्मिक असते. तो परमेश्वराला घाबरतो पण तो जेव्हा परमेश्वराला घाबरत नाही तेव्हा त्याला कायद्याचा बडगा दाखवावा लागतो . धर्मसंस्कार ही एक शिकवण आहे, तर कायदा हा बडगा आहे. विवाह हा सामाजिक बंधन म्हणून स्वीकारायचा आणि तडजोडीने सांगड घालण्यासाठी विवाह विधी करायचे. पूर्वी आजी-आजोबांचा विवाह रजिस्टर न होताही त्याला मान्यता होती . आजही त्यांना आपण आजी-आजोबा म्हणूनच ओळखतो. पण जेव्हा संस्काराच्या माध्यमातून निर्माण केलेल्या गोष्टींचा वाईट स्वार्थासाठी उपयोग होऊ लागला तेव्हा त्याला कायदेशीर बंधन घालावे लागले. या मुळेच आज प्रत्येक विवाह रजिस्टर करणे कायद्याने बंधनकारक आहे.

*******

प्रकरण ३ रे

# लग्नाचे योग्य वय कोणते

*लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक असा टप्पा आहे की, जेथे दोन लोक एकत्र येऊन नव्या आयुष्याची सुरुवात करतात. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात लग्नाचा प्रश्न कधी ना कधी उभा राहतोच. आजच्या धावपळीच्या आयुष्यात आणि करियर मध्ये असलेली स्पर्धा पाहता लग्नाचा प्रश्न आणखीच महत्वाचा बनला आहे. की, मुलींचे लग्न करण्यासाठी योग्य वय नक्की किती असावेत हा महतात्वा प्रश्न आहे.*

*वर्षानुवर्ष परंपरागत चालत आलेल्या रितीनुसार मुलींचे लग्न करण्याचे योग्य वय २० ते २५ वर्ष असल्याचे मानले जाते. परंतु बदलत्या विचारसरणीमुळे काही लोक हेच वय २५ ते ३० वर्ष असावे असे म्हणतात. या व्यतिरिक्त काही लोक आता ३२ ते ३५ व्या वयात ही लग्न करतात. खरंतर २० ते ३० वर्षाच्या वयात प्रत्येकजण आपल्या करियरमध्ये यश मिळवण्यामागे धावत असतात. त्यामुळे लग्नाबद्दल विचार करणे दूरच राहते. लग्न न करणे हा सुद्धा एखाद्याचा व्यक्तीगत निर्णय असू शकतो. मात्र भारतात १८ वर्षाची मुलगी आणि २१ वर्षाच्या मुलाचे लग्न कायदेशीर मानले जाते. त्यांना लग्न करण्याचा अधिकार असतो. पण आजकाल प्रत्येकजण लग्नापूर्वी आपले आयुष्य स्थिर करण्यास पाहत असतो. त्यामुळेच लग्न करण्याचे वय ही वाढत जाते आणि लग्न करण्याची वेळ निघून जाते. अशा लोकांच्या जीवनामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे योग्य वयात लग्न होणे आवश्यक असते.*

लग्र ही आयुष्यातील खूप महत्त्वाची गोष्टी आहे. मुलीची वयाची साधारण बावीशी उलटली की, प्रत्येक घरात मुलींच्या मागे लग्राचे टुमणे सुरू होते. तर मुलांचे २६ वय होऊन गेले की घरचे लग्र कर म्हणून मागे लागतात. पण लग्रासाठी नेमके योग्य वय काय हा प्रश्न सगळ्यांनाच भेडसावतो. याचे उत्तर तसे तर मिळणे कठीण आहे. कारण लग्र करणे किंवा न करणे ही प्रत्येकाची खासगी बाब आहे. पण आपल्याकडे लग्र करण्यापूर्वी प्रत्येकाला आपल्या आयुष्यात व्यवस्थित सेटल व्हायचे असते. त्यामुळे बऱ्याचदा लग्राचे वय निघून गेलेले असते. त्यामुळेच लग्र कोणत्या वयात केले पाहीजे असा प्रश्न आपणासमोर निर्माण होतो. लग्रासाठी दोघांमध्ये असणाऱ्या वयाचा फरक हा शारीरिक, भावनिक आणि आर्थिक या तिन्ही पातळीवर असतो. त्यामुळे वय वाढण्याचे तोटे पुरुषांपेक्षा महिलांना अधिक जाणवते त्यामुळे बऱ्याचदा मुलांचे लग्राचे वय २८ आणि मुलीचे लग्राचे योग्य वय हे २५ असावे असे म्हटले जाते. हा केवळ संसार करण्यासाठी बायोलॉजिकल तर्क करण्यात आला आहे. पण व्यक्तिपरत्वे आणि परिस्थितीनुसार या प्रत्येकाच्या आयुष्यात लग्र करण्याची योग्य वेळ कोणती याचा अर्थ मात्र वेगवेगळा असतो. पण त्याकरिता खालील बाबींचा विचार करणे महत्वाचे ठरते.

## पालकांनी पाल्याचे लग्न केव्हा करावे

- तुमच्या घरची आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक परीस्थिती कशी आहे यावर सुद्धा तुमचा लग्नाचा निर्णय अवलंबून आहे. अशा वेळी घराची परिस्थिती बघून वयाच्या २३-२४ नंतर लग्नाचा निर्णय घ्यावा.
- सर्वात महत्वाचा मुद्दा तुम्ही तुमचे घर / कुटुंब चांगल्या प्रकारे सांभाळू शकाल का? तुम्ही कुटुंबाची जबाबदारी उचलू शकता का? इतके कार्यक्षम आहात का? तुम्ही तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत बनवली आहे का ? हे सर्व प्रश्न पुढील आयुष्याकरिता आणि येणाऱ्या जोडीदाराला आधार देण्याकरिता महत्वाचे ठरतात.
- नवा जीव धारण करुन त्याचे नऊ महिने पोषण करण्याइतके तुमचे शरीर सक्षम असेल तर, विवाह करणे योग्य आहे. शरीरशास्त्रानुसार वयाची २२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पण ३० वर्षे वयाच्या आत विवाह करणे योग्य ठरते. पूर्वीचे बालविवाह जसे चुकीचे होते तसेच आताचे वयाच्या ३०-३५ नंतर विवाह करणेसुद्धा योग्य नाहीत.
- पुरुषाने लग्न हे वयाच्या २५ नंतर करावे याचे वैज्ञानिक कारण आहे. पुरुषाचे वय १३ वर्षाचे होते त्यानंतर त्याच्या शरीरामध्ये वीर्य बनण्यास किंवा तयार होण्यास सुरवात होते. पुरुषाच्या मेंदूचा पुढचा भाग (prefrontal cortex) विकसित होण्यास सुरवात होते आणि २५ वर्षा पर्यत पूर्णपणे विकसित होतो.

## सामाजिकदृष्ट्या लग्नाचे वय

- नव्या पीढीचा विचार केल्यास भारतात सध्याच्या मुलींना लग्न करण्याबद्दल विचारले तर ते आपल्या करिअरमध्ये स्थिर झाल्यानंतर वयाच्या पंचवीसीनंतर किंवा तिशीत लग्न करु इच्छितात. परंतु भारतात असे ही आहे की, योग्य वेळी आणि योग्य वयात मुलीचे लग्न न झाल्यास लोक तिच्याबद्दल काही गोष्टी बोलू लागतात.
- मुलींना आपले लग्न आणि करियर या दोन गोष्टींचा योग्य निर्णय घेणे फार महत्वाचे वाटते. त्यामुळे भारतात जरी मुलींचे लग्न करण्याचे वय १८ असले, तरीही आपली मुलगी किंवा मुलगा संसाराच्या जबाबदाऱ्या स्विकारण्यास सक्षम झाला किंवा नाही हे सुद्धा त्याच्या आई वडीलांनी पाहिले पाहिजे.
- त्याचसोबत आपली मुलगी किंवा मुलगा शारिरीक, मानसिक स्वरुपात लग्न करण्यास सक्षम झाला आहे का? किंवा संसारात येणाऱ्या जबाबदारी साभांळण्यास तो तयार आहे का? याबद्दलही पालकांनी जाणून घेतले पाहिजे. अन्यथा लग्न करण्याचे योग्य वय जरी असले तरी, त्यांचे लग्न करू नये. अन्यथा त्यांच्या संसारात वाद निर्माण होवू शकते.

## वैद्यकीयदृष्ट्या लग्नाचे वय

- भारतीय कायद्यानुसार, भारतात मुली १८ वर्षांनंतर आणि मुले २१ वर्षांनंतर लग्न करू शकतात.  कायद्याचा विचार सोडला तर, जेव्हा व्यक्ती शारीरिक, मानसिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम होतो तेव्हा तो लग्न करण्यास योग्य मानला जातो.
- यूटा विद्यापीठाचे निक वोल्फिंगर यांनी केलेल्या अभ्यासातून असे समोर आलेय की, ज्या लोकांचे लग्न २८ ते ३२ वयादरम्यान झाले असते. अशा लोकांचे घटस्फ्फोट होण्याची शक्यता कमी असते.
- वोल्फिंगर यांनी २००६ ते २०१० आणि २०११ ते २०१३ या  दरम्यान केलेल्या 'नॅशनल सर्व्हे ऑफ फॅमिली ग्रोथ'च्या आकडेवारीवरुन केलेल्या विश्लेषणावरुन त्यांना असे दिसून आले की, जसजसे वय वाढत जाते, तसतशी घटस्फोटाची शक्यता कमी होऊ शकते; पण वयाच्या ३२ व्या वर्षानंतर लग्न केले, तर घटस्फोटाची शक्यता आणखी पाच टक्क्यांनी वाढू शकते.
- २८ ते ३२ या वयात लग्न करण्याचे अनेक फायदे आहेत. लग्न करण्याची ही चांगली वेळ असते. कारण- या वयात लोक स्वत:च्या जबाबदाऱ्या उचलू शकतात आणि त्यांना आपल्या गरजा समजू शकतात.
- त्यांनी आपल्या संशोधनात म्हटले आहे. या वयोगटातले तरूण तरूणी अधिक समजूतदार असतात. या वयात एकमेकांना समजून घेण्याची क्षमता या दोघांमध्येही पुरेशी विकसित झाली असते, म्हणूनच जी जोडपी २८ ते ३२ या वयादरम्यान विवाहबंधनात अडकतात त्यांच्यात भांडणाचे किंवा घटस्फोट होण्याची शक्यता कमी असते.
- इन्सटिट्यूट ऑफ फॅमिली स्टडीज प्रकाशित केलेल्या संशोधनानुसार जे जोडपे ३० व्या वर्षी विवाहबंधनात अडकतात अशी जोडपी संसार करण्यास आणि टिकविण्यात जास्त प्रगल्भ असतात आणि या वयापर्यंत त्यांची आर्थिक स्थितीही चांगली सुधारलेली असते.

## आई-बाबा होण्याचे योग्य वय कोणते

प्रत्येक गोष्टी करण्याचे एक योग्य वय असते असे म्हणतात. भविष्यात पश्चाताप करण्याची वेळ येऊ नये म्हणून योग्य वेळी लग्न करा योग्य वेळी मुले जन्माला घाला असा सल्ला वडीलधाऱ्या व्यक्तींकडून नेहमी दिला जातो. परंतू सध्याची पिढी करिअर सेट करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याकरिता या गोष्टींकडे दुर्लक्ष करते. अनेकवेळा लग्नाचे वय होण्याच्या आधीच विवाह केला जातो आणि नकळत्या वयातच मुल देखील जन्माला घातले जातात. यामुळे मुले होण्यासाठी

योग्य वय काय आहे? हा असा एक प्रश्न आहे जो बहुतेकदा निर्माण होतो. काही जोडपी विविध कारणांमुळे बाळाचे नियोजन पुढे ढकलतात आणि नंतर गर्भधारणा करणे खूप कठीण होते. तेव्हा आई वडिलांनी कोणत्या वयात मुलाला जन्माला घालावे याविषयी जाणून घेऊयात.

- प्रत्येक स्त्रीसाठी आईपण ही निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. योग्य वयात आई होणे हे आईवडीलांच्या व मुलांच्या भविष्यासाठी खूप महत्त्वाचे मानले जाते.
- पूर्वी लग्न झाल्यावर एक-दोन वर्षांतच घरात पाळणा हलायचा आता अनेक स्त्रिया करिअर आणि शिक्षणाच्या नावाखाली मूलाला जन्म देणे लांबवतात आणि जेव्हा त्यांना खरेच मूल हवे असते, तेव्हा त्यांना निरनिराळे उपाय करावे लागतात.
- नव्याने लग्न झालेले नवरा-बायको दोघांनाही आपली प्रायव्हसी एन्जॉय करण्याकरिता फॅमिली प्लॅनिंगचा निर्णय घेतात आणि काही वर्षाकरिता वेगवेगळ्या उपायोजनेच्या माध्यमातून घरातील पाळणा लांबविण्याचा प्रयत्न करतात.
- अमेरिकन सोसायटी फॉर रिप्रॉडक्टिव्ह मेडिसिनच्या मते, पुरुष आणि स्त्रिया दोघांसाठी मूल होण्याचे सर्वोत्तम वय २० ते ३० वर्षे आहे. हा कालावधी प्रजननासाठी उत्तम मानला जातो. महिलांमध्ये वयाच्या ३० वर्षानंतर प्रजनन क्षमता कमी होऊ लागते. तसेच, गर्भधारणा करणे खूप धोकादायक बनते. ३५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान प्रजनन क्षमता आणखी कमी होते.
- पुरुषांबद्दल बोलायचे झाले तर पुरुषांमध्ये ३० वर्षांनंतर शुक्राणूंची गुणवत्ता कमी होऊ लागते. वयाच्या ३५ वर्षानंतर वडील बनणे अधिक कठीण होते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, काही पुरुष वयाच्या ६० व्या वर्षीही वडील बनू शकतात. परंतु हे आवश्यक नाही की त्यांचे शुक्राणू ३० वर्षांच्या युवकांप्रमाणे जनुकीयदृष्ट्या निरोगी असतील.
- तज्ज्ञांच्या मते या लांबलेल्या पाळण्यामुळे पुढील गरोदरपणात अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात. स्त्रियांच्या आरोग्यावरदेखील त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. यावरुन हा प्रश्न निर्माण होतो की, आई होण्यासाठी योग्य वय नक्की कोणते असावेत?
- आयव्हीएफ वर्ल्डच्या संस्थापक डॉ. गुंजन गुप्ता यांच्या मतानुसार २१ ते ३० वर्ष हे वय आई होण्यासाठी योग्य असते. करिअर करण्यासाठी स्त्रिया फॅमिली प्लॅनिंग लांबवत असतील, तर ते चुकीचे आहे.

- वयाच्या ३० वर्षानतर स्त्रियांच्या शरीरातील एएमएच  नावाचे  हॉर्मोन कमी होते यावरून स्त्रियांच्या शरीरातील बीजांड निर्मितीची क्षमता कमी होते.  हे हॉर्मोन्स कमी झाले की,  बीजांडनिर्मितीही कमी होते. त्यामुळे मुलांना जन्माला घालण्यास अडचण होते.
- जर ३५ वयानंतर आई होण्यासाठी प्रयत्न केला, तर मुलांमध्ये ॲबनॉर्मल आनुवंशिक गुण येऊ शकतात. त्याचवेळी लहान वयात आई होणेही खूप जास्त धोकादायक असून जर २० व्या वर्षी आई झाल्यामुळे गरोदरपणात अडचणी येऊ शकतात. यात बाळाची वाढ पुरेशी न होणे ही मुख्य अडचण असू शकते. अशा परिस्थितीत वेळेआधीच मूल जन्माला येऊ शकते. अशा प्रसूतींमध्ये पोस्टपार्टम हॅमरेजचा  धोका असतो आणि ही गोष्ट आईच्या जिवावरसुध्दा बेतू शकते.
- तिशीनंतर मधुमेह किंवा उच्च रक्तदाबासारखे आजार मागे लागण्याची भीती असते. अशा परिस्थितीत गरोदर राहण्यासाठी अडचणी येऊ शकतात. काही वेळा गर्भपात होऊ शकतो. तर कधी वेळेआधी मूल जन्माला येण्याचा धोका असतो.
- एक मुलगी जन्माला आल्यावर तिच्या शरीरात लाखो बीजांड असतात. तिशीपर्यंत आल्यावर त्यातील काही लाखच शिल्लक राहतात. चाळीशीत तर बहुसंख्य बीजांड कमी झालेली असतात किंवा नसतातच.
- स्त्रियांच्या व पुढच्या पिढीच्या आरोग्याचा विचार केल्यास योग्य वयातच आई होणं गरजेचे आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनीही हेच मत व्यक्त केलं आहे. त्यामुळे स्त्रियांनी फार काळ न थांबता २१ ते ३० वयातच गरोदर राहण्याचा विचार करावा.
- हीच गोष्ट स्त्रियांनाही लागू होते. वयाच्या स्त्रीमध्ये बिजांडे निर्माण होण्याची उत्तम क्षमता २० ते ३० वर्षांच्या दरम्यान होते. त्यांनंतर ही क्षमता घटत जाते. रजोनिवृत्तीनंतर स्त्रिया माता होऊ शकत नाहीत. रजोनिवृत्तीचे सरासरी वय ५१ वर्षे आहे.
- बहुतेक स्त्रियांमध्ये, रजोनिवृत्तीच्या आधीच्या वर्षांत हार्मोन्समध्ये लक्षणीय घट होते, ज्यामुळे आई होण्याची शक्यता कमी होते.
- हंगेरीतील सेमेलवेइस विद्यापीठातील संशोधकांच्या मते, मूल होण्याचे सर्वात सुरक्षित वय २३ ते ३२ वर्षे असते, कारण या वयात काही जन्मजात आजार होण्याची शक्यता कमी असते. जर एखाद्या जोडप्याने ३२ वर्षांपेक्षा जास्त वय झाल्यावर मूल जन्माला घालण्याची योजना आखली, तर बाळाला अनेक आजार होण्याचा धोका १५ टक्क्यांनी वाढतो. तसेच या प्रक्रियेत आईच्या जीवाला देखील १५ टक्के धोका असू शकतो.

## पती-पत्नीच्या वयामध्ये किती अंतर असावेत

पती पत्नीमध्ये किती वर्षे वयाचे अंतर असायला हवे याबद्दल अनेकांचे वेगवेगळे मत असू शकतात. काळानुसार आता लोकांची विचारसरणी देखील खूप बदलली आहे. त्यामुळे पती पत्नीमधील कमी-अधिक वयाचे अंतर यामुळे त्यांना फारसा फरक पडत नाही. पण, जशा नाण्याच्या दोन बाजू असतात, तसेच दुसरे सत्य हे देखील आहे की, आजही लग्नापूर्वी या गोष्टींकडे खूप लक्ष दिले जाते. आजही आपल्या घरातील वडीलधारी मंडळी लग्नासाठी मुलगी शोधताना तिच्या वयाकडे लक्ष देतात. मुलाचे वय मुलीपेक्षा जास्त असावे असे आपल्या वडीलधाऱ्यांचे मत असते. पण यामागचे नेमके कारण काय असावे याचा कधी विचार केला आहे का? एखाद्याला आयुष्यभराचा जोडीदार बनवण्यापूर्वी अनेक गोष्टी पाहील्या जातात. कुटुंबापासून ते शिक्षणापर्यंत. परंतू, दोघांमध्ये किती वर्षे वयाचे अंतर असावे याबाबत अजूनही अनेकांच्या मनात संभ्रम आहे. वरिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ आणि वैद्यकीय संमोहन तज्ञ यांच्यामते ज्याप्रमाणे गाडीच्या दोन्ही चाकांमध्ये समन्वय आवश्यक असतो त्याचप्रमाणे संसार करतांना पती-पत्नीमध्येही सामंजस्य असायला हवे. त्यामुळे वैवाहिक जीवन सुखी होते. पण दोघांच्या वयातील फरकाचा विचार केला तर पती पत्नीपेक्षा मोठा असावा. आणि पती-पत्नीच्या वयातील अंतर ४ ते ६ वर्षांपेक्षा कमी किंवा अधिक असू नयेत. याकरिता खालील कारणांद्वारे त्यांनी स्पष्ट केले आहेत.

- **वयाची परिपक्वता :** लेखकाचे मते, मुलगा आणि मुलगी यांच्या मॅच्युरिटी लेव्हलमध्ये फरक असतो. मुली १२ ते १४ वर्षांच्या वयातच यौवनात येतात. तर मुले १४ ते १७ वर्षे वयात या अवस्थेला पोहोचतात.
- **हार्मोन्समधील बदल :** एका विशिष्ट वयानंतर, हार्मोन्समधील बदलांमुळे मुली लवकर वयस्क दिसू लागतात. नवरा-बायको एकाच वयाचे असतील तर बायको नवऱ्यापेक्षा मोठी दिसेल. त्यामुळे सुद्धा दोघांच्या वयात फरक असावा.
- **जबाबदारीची भावना :** एका अहवालानुसार, मुलांमध्ये जबाबदारीची भावना वयाच्या २६ व्या वर्षी येते. हीच भावना मुलींमध्ये त्याआधीच म्हणजे ५ वर्षांपूर्वीच आलेली असते. मुलांना भावनिकदृष्ट्या परिपक्व होण्यासाठी जास्त वेळ लागतो. मुलगा वयाने मोठा असेल तर त्याला त्याच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे समजू शकेल. यासोबतच तो त्याच्या जोडीदारालाही मदत करेल. पण सारख्याच वयाचे असल्याने त्यांच्यात जबाबदारीच्या भावनेचा अभाव दिसून येतो. अशावेळी दोघांनाही आलेल्या परिस्थितीला तोंड देताना अनेक अडचणी येतात. त्याचा परिणाम म्हणजे दोघांमध्ये वाद निर्माण होतो आणि शेवटी हा वाद घटस्फोटापर्यत पोहचतो.

- **आदराची भावना :** सारख्या वयाच्या पती-पत्नीमध्ये एकमेकांबद्दल आदराची भावना कमी असते. नवरा वयाने मोठा असेल तर पत्नी त्याच्या निर्णयाचा आदर करेल आणि दोघांमध्ये प्रेम आणि आदर वाढेल. परंतु सारख्या वयाच्या पती पत्नीमध्ये सहसा या भावनेचा अभाव दिसून येतो.
- **भिन्न विचार आणि परस्पर समज :** सारख्या वयाच्या पती-पत्नीमध्ये मतभेद असू शकतात. त्यांची विचारसरणी क्वचितच एकमेकांशी जुळते. त्यामुळे दोघांमधील परस्पर समंजसपणा फारसा फुलत नाही आणि छोट्या-छोट्या गोष्टींवरून भांडणे सुरु होतात. हा संघर्ष नंतर विभक्त होण्याचे कारणही ठरू शकतो. तेच दोघांच्या वयामध्ये अंतर असेल तर, ते दोघेही एकमेकांना समजून घेऊ शकतात.
- **एकमेकांचे आकर्षण :** आपली पत्नी आकर्षक, सुंदर आणि तरुण असावी ही पतीची इच्छा असते, तर पत्नीसाठी केवळ पतीचे प्रेम महत्त्वाचे असते. दोघांमध्ये प्रेम असेल तर, ते नातेही दिर्घकाळ टिकते. मुलीचे वय मुलापेक्षा कमी असेल तेव्हाच हे शक्य होते. अशा परिस्थितीत दोघांनाही एकमेकांबद्दल आकर्षण आणि आदर टिकून राहतो.

## जोडीदाराच्या वयातील आदर्श वय कोणते

लग्न हे एक असे बंधन आहे जे प्रत्येक मुलामुलींना स्वीकारावे लागते. भारतीय समाजात पतीचे वय पत्नीच्या वयापेक्षा जास्त असावे असे अनेकांचे मत आहे. पण हा फरक का आणि किती असावा, याबाबत कोणताही असा आराखडा नाही परंतु, लग्नाच्या वयाबद्दल काही जैविक तर्क आहेत. ज्यानुसार पुरुषांचे वय महिलांपेक्षा जास्त असणे योग्य आहे. प्रत्येक कपल्ससाठी वयातले अंतर हे वेगवेगळ्या प्रकारे कार्य करते. काहींना २ वर्षांचे अंतर योग्य वाटते. तर काहींना १० वर्षांचेही अंतर चालते. पण बऱ्याच लोकांना त्यांच्यापेक्षा वयाने मोठा असलेला जोडीदार आवडतो. हे ज्याला जसे आवडते त्यावर अवलंबून आहे. पण, अनुरूपतेसह प्राधान्याला महत्व देत बहुतेक यशस्वी विवाहांमध्ये वयाचे अंतर असते. त्यामुळेच लग्न करण्याआधी जोडप्यांसाठी वयाचे किती अंतर असावेत आणि काय प्रश्न निर्माण होतात हे जाणून घेणे महत्वाचे आहे.

- **५ ते ७ वर्षांचे अंतर :** या वयातील अंतर असलेल्या जोडप्यांमध्ये कमी भांडणे, गैरसमज आणि वाद होतील, जोडप्यांमधील एक जण अधिक समंजस असल्याने टोकाचे वाद झाले तरी लग्न तुटण्यापासून वाचतात. ५ ते ७ वर्षातील अंतर हे खूपच आदर्श आहे. कारण ते जोडप्यांना स्थैर्य आणि एकमेंकाचा दृष्टीकोन जवळून समजून घेण्यास मदत करते.

- **१० वर्षांचे अंतरः** जोडीदारामध्ये १० वर्षांचे अंतर असेल तर, दोघांमध्ये विचार भिन्नता मोठ्या प्रमाणात असते. त्यांचे विचार जुळत नसल्यामुळे त्यांच्यात सतत वाद होत असलेले दिसतात. अशा जोडप्यामध्ये त्यांची ध्येये, महत्वाकांक्षा आणि दृष्टीकोन याबद्दल फरक असतो. तेव्हा या १० वर्षांच्या वयाच्या फरक काही जोडीदारांसाठी त्रासदायक असू शकतो. या वयात काही जणांचे नाते काहीं ताणलेले असते. काहीवेळा वयाने मोठा असलेला जोडीदार अधिक परिपक्व असल्याने त्याच्याशी जुळवून घेण्यात दुसऱ्या जोडीदाराला अनेक अडचणी येऊन समस्या येऊ शकतात.
- **२० वर्षांचे अंतर :** लग्न झालेल्या जोडप्यांसाठी हे अंतर योग्य नाहीच; पण अशी अनेक जोडपी आहेत की, त्यांच्यात २० वर्षांचे अंतर आहे. त्यांच्यातील ध्येय, महत्त्वाकांक्षा आणि मतांमध्ये खूपच मोठ्ठ फरक असतो. या जोडप्यात मुले होण्याची गरज सर्वात महत्वाची असू शकते. कारण वय जास्त असलेल्या जोडीदाराला लवकरात लवकर मुल व्हावे असे वाटते ; पण दुसरा पार्टनर त्यासाठी फारसा उत्सुक नसल्याची शक्यता असते. सर्वात मोठी समस्या म्हणजे अशा जोडप्यांच्या विचारसरणीतही खूप मोठा फरक असल्याचे दिसून येते.

**दोघांच्या वयामध्ये अधिक फरक असल्यास होणारे परिणाम**

प्रत्येकाचे वैवाहिक जीवन पूर्णपणे वेगळे असते यात शंकाच नाही. प्रत्येकाचे लग्न चित्रपटामध्ये दाखवले जाते इतके सुंदर नसते. वास्तविक आयुष्यात नाते निभावताना जोडप्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. अशा काळात काही जोडपी या समस्यांपुढे हार मानतात तर काही या समस्यांमधून वाट काढून सुखाचा संसार करतात आणि दिवसेंदिवस तो अधिकच फुलवतात. वैवाहिक आयुष्यात समस्या येणे ही सामान्य गोष्ट आहे. जर दोघेही समजंस असेल तर, कोणत्याही वयातील जोडपे यातून एकमेकाच्या सहकार्याने मार्ग काढतात. परंतु, काही जोडप्यांना मात्र अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यातून मार्ग काढण्याची जबाबदारी दोन्ही जोडप्याची असते आणि हेच यशस्वी संसाराचे कौशल्य आहे.

- **सेक्शुअल डिफरंसः** हेल्दी रिलेशनशिपसाठी फिजिकल इंटिमसी देखील तितकीच गरजेची असते. पण पती-पत्नीमध्ये जर सेक्शुअल डिफरेंस असतील तर त्यामुळे अनेक समस्या निर्माण होऊ लागतात. विशेषतः स्त्रिया मुल झाल्यानंतर फिजिकल इंटिमसीमध्ये कमी रस घेतात, ज्यामुळे पती-पत्नीमध्ये समस्या सुरू होतात. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारच्या सेक्शुअल डिफरेंसचा सामना करण्यापूर्वी जोडप्यांनी एकमेकांशी मोकळेपणाने बोलले पाहिजे. यामुळे जोडप्यांमधील शारीरिक आणि भावनिक बंध पुन्हा प्रस्थापित होऊ शकतात.

- **श्रद्धा आणि मुल्ये:** भारतात नवऱ्याला देव म्हणून मानण्याची परंपरा आहे.  पती जर वयाने मोठा असेल आणि कट्टर परंपरा पाळणारा असेल तर, तेव्हा पतीचा हा आग्रह असधिक असते.  जर नवरा वयाने लहान किंवा सारख्याच वयाचा असेल तर, कोणत्याही मुलीसाठी ही परंपरा पाळणे  आव्हानात्मक असते. दुसरीकडे नवरा जर वयाने थोडा मोठा असेल तर पत्नीला त्याचा आदर करण्यात आणि त्याचे शब्द पाळण्यात फारशी अडचण येत नाही. त्यामुळे नात्यात दुरावा येत नाही. प्रत्येकाची विचारसरणी पूर्णपणे वेगळी असते. अशा परिस्थितीत नात्यात मतभेद होणे अगदी सामान्य गोष्ट आहे. विशेषत: जर पती वेगळ्या धर्माचा असेल आणि पत्नी वेगळ्या धर्माची असेल, तर दोघांमधील श्रद्धा आणि मूल्यांमध्ये फरक अपरिहार्यपणे येतो. या समस्येवर एकच उपाय आहे, तुम्ही दोघेही परस्पर समंजसपणाने या नात्यात पुढे जा. दोघांनी एकमेकांच्या भावना समजून घेणे आणि स्वतंत्र व्यक्ती म्हणून आपल्या जोडीदाराच्या हक्कांचा आणि अधिकारांचा आदर करणे योग्य ठरते.
- **तणाव आणि मत्सर:** तणाव आणि मत्सर ही वैवाहिक जीवनातील समस्यांची प्रमुख कारणे आहेत. आर्थिक-कौटुंबिक आणि व्यावसायिक समस्यामुळे जोडप्यांमध्ये तणाव निर्माण होतो. त्याच वेळी, मत्सर देखील विवाहित नातेसंबंध बिघडवू शकतो. अती ईर्ष्यावान जोडीदारासोबत राहणे आव्हानात्मक असू शकते. एका मर्यादिपर्यंत हे सर्व ठीक आहे, पण जेव्हा मत्सराचा अतिरेक होतो, तेव्हा नको तितका मनावर ताण येतो. या तणावावर मात करण्यासाठी, त्याचे व्यवस्थापन करण्यास शिकणे आवश्यक आहे.  जर तुम्ही दोघे मिळून ही समस्या सोडवू शकत नसाल तर संमोहन तज्ज्ञाची मदत घ्या.
- **एकमेकांना बदलण्याचा प्रयत्न करणे :** तुमच्या आवडत्या व्यक्तीला ते जसे आहेत तसे स्वीकारा. पण काही लोकांना हे समजत नाही. ते आपल्या सोयीनुसार जोडीदाराला बदलण्याचा प्रयत्न करत असतात. पण लक्षात ठेवा, तुम्ही जितका तुमचा जोडीदार बदलण्याचा प्रयत्न कराल त्या प्रमाणात तुमचा जोडीदार तुमच्या विरुद्ध बंड करेल. त्यामुळे तुमच्यात वाद होतील. तुम्ही त्याच्यावर नियंत्रण ठेवत आहात असे त्याला वाटेल. यामुळे तुमच्या दोघांमध्ये त्रास तर होईलच पण नाते पूर्वीसारखे राहणार नाही.
- **स्वार्थी वागणूक :**पती-पत्नीचे नाते समान असते. यापैकी कोणी एक जरी स्वार्थी राहिला तर नात्यात कटुता निर्माण होऊ शकते. एक जोडीदार थोडासा स्वार्थी असेल तर ठीक आहे, पण अधिक स्वार्थी असणाऱ्या जोडीदारासोबत राहणे कोणालाही कठीण असते. याला सामोरे जाण्याचा उत्तम मार्ग म्हणजे एकमेकांचा दृष्टीकोन समजून घेणे. तुमच्या आवडीशिवाय इतरांचे हित समजून घेण्याचा देखील प्रयत्न करा. नाते हे दोघांचे असते आणि त्यामुळे आपला स्वार्थ इथे काही कामाचा नाही आणि यामुळे नाते कायमचे बिघडेल हे लक्षात ठेवा.

■ **लग्न टिकविण्याची समस्या :** समाजातील मुला- मुलींच्या संख्येतील असमतोलामुळे मुलांचे लग्न जमणे महाकठीण झाले आहे. काही पालक या समस्येवर मात करून मुलाचे लग्न जमवण्याचा प्रयत्न करतात. त्यात यशस्वी होतात. पण पुढे ते लग्न टिकेल की नाही या विचाराने हैराण होतात.

**लग्न टिकविण्याकरिता वयाचे अंतर महत्वाचे आहे का?**

सध्याचे जग हे क्षणाक्षणाला बदलत आहे. त्यामुळे लोकांच्या मतांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद निर्माण होत आहेत. विवाहात समस्या येऊन तो अल्पायुषी ठरू शकतो. म्हणजेच वयात अंतर जास्त असेल तर जोडप्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. वयात साधारण २ ते ५ वर्षांचे अंतर चांगले ठरू शकते. प्रेमात सर्वकाही माफ असे म्हणतात. वय बघून प्रेम होत नसले तरी लग्नाआधी माणसाने आपल्या वयात आणि जोडीदाराच्या वयातला फरक पाहिलाच पाहिजे. पण आज जेव्हा लोक आपले वय विसरून लग्न करतात. तेव्हा पती-पत्नीमधील वयातील अंतराचे महत्त्व समजणे अनेकांना कठीण जाते. प्राचीन काळापासून भारतातील पती नेहमीच त्यांच्या पत्नींपेक्षा मोठे असते. परंतु ही प्रथा देखील पूर्णपणे योग्य नाही.

लग्न ही आयुष्यातील खूप महत्त्वाची गोष्टी आहे. लग्नासाठी दोघांचे परिपक्व असणे आवश्यक आहे. म्हणूनच मुलगा मुलीपेक्षा थोडा मोठा असावा. जेव्हा हे घडते तेव्हाच तो मुलगा त्याच्या सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे समजून घेतो, आणि त्या योग्यरित्या पार पाडण्याचा प्रयत्न करतो. अटलांटा युनिव्हर्सिटीमध्ये झालेल्या एका संशोधनानुसार पती-पत्नीमध्ये वयाचे ५ वर्षांचे अंतर योग्य मानले जाते.

या संशोधनानुसार, ज्या जोडप्यांमध्ये ५ वर्षांचे अंतर आहे. त्यांच्यात घटस्फोटाची शक्यता केवळ १८% असते. दुसरीकडे, ज्या जोडप्यामध्ये वय १० वर्षे वयाचा फरक आहे. त्यांच्यात घटस्फोटाची शक्यता ३९% आहे आणि वयाचे अंतर २० वर्षे असल्यास घटस्फोटाची शक्यता ९५% आहे. तज्ज्ञांच्या मते, जैविक दृष्टिकोनातूनही मुलगा आणि मुलगी यांच्या परिपक्वता पातळीमध्ये फरक आहे. मुली १२-१४ व्या वर्षी पौगंडावस्थेत पोहोचतात, तर मुलांना १४-१७ वर्षे वयात येतात.

वाढत्या वयाबरोबर व्यक्तीचे विचार आणि समजूतदारपणा यात परिपक्वता येत असते. कोणत्याही अवस्थेत जोडीदाराला समजून घेणे अधिक महत्त्वाचे असते. जर तुमच्या नात्यामध्ये समजूतदारपणा असेल तर, कोणत्याही वयात नाते टिकविणे सोपे असते. रिलेशनशिप तज्ज्ञ सांगतात की, नाते टिकवण्यासाठी एकमेकांमध्ये समजूतदारपणा असणे गरजेचे आहे. हाच समजूतदारपणा कोणत्याही वयातील नाते टिकविण्याचा सर्वोत्तम आधार आहे.

*******

प्रकरण ४ थे

# विवाह जुळवितांना कुंडली ऐवजी आरोग्य पत्रिका तपासा

*हिंदू धर्मानुसार विवाह हा एक संस्कार असून हा संस्कार पूर्ण करण्याकरिता भारतीय संस्कृतीत लग्न जुळविण्याच्या वेळी मुहूर्त, जन्मपत्रिका, गुण, कुंडली यांना विशेष महत्त्व दिले जाते. सोबतच मुलाकडे घर आहे का?, नोकरी किंवा व्यवसाय कोणता, आर्थिक स्थिती, कुटुंब याबद्दलही माहिती घेतली जाते. लग्न टिकावे आणि यशस्वी व्हावे याकरिता अशा अनेक गोष्टी तपासल्या जातात. परंतु आजच्या युगात लग्न जुळविण्यापुर्वी या गोष्टींसह अजून एका गोष्टीची आवश्यकता निर्माण झाली आहे. ज्यामुळे लग्न करणाऱ्या जोडप्याच्या जिवनातील भविष्यातील बरीचशी संकटे वेळीच टाळता येतात. याकरिता महत्त्वाची असणारी गोष्ट म्हणजे भावी जोडीदाराचे मानसिक आणि शारीरीक स्वास्थाची तपासणी करणे.*

*पूर्वीच्या काळी लग्नापूर्वी आरोग्याबाबत साधला जाणारा संवाद, माहिती याचे प्रमाण क्वचित होते. पण २१व्या शतकात या मुद्यांबाबत जनजागृती झाली आहे. सकारात्मक बाब म्हणजे, भावी जोडपी भेटताना ब्लड ग्रुप किंवा आरोग्य निगडीत समस्यांबाबतीत चर्चा करत आहेत आणि आजच्या काळात हे महत्वाचे आहे. आजही एचआयव्ही, एसटीडी या चाचण्यांबाबत मोकळेपणाने अद्यापही बोलले जात नाही. जेव्हा ल्गन झाल्यानंतर कळते तेव्हा फसवणूक झाल्याचे दिसुन येते. असे प्रकार टाळण्याकरिता वैद्यकीय चाचणी करणे आवश्यक ठरते.*

*नवीन जोडप्याच्या जिवनात जन्माला येणाऱ्या अपत्याच्या आरोग्याच्या दृष्टीने लग्नाची कुंडली जुळण्यापेक्षा आरोग्याची पत्रिका जुळणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून लग्नानंतर आरोग्यविषयक निर्माण होणाऱ्या समस्या टाळता येतील. कोणते आजार अनुवंशिक आहेत, कोणत्या आजारांमुळे अपत्यांवर परिणाम होऊ शकतो, वेळीच निदान केल्यास कोणते आजार पूर्ण बरे होऊ शकतात अशा मुद्यांबाबत समाजामध्ये जनजागृती होणे महत्त्वाचे असून 'लग्नापूर्वी वैद्यकीय चाचणी' या गोष्टीकडे बदलत्या काळानुसार आणि बदलानुसार पाहणे आणि स्वीकारणे गरजेचे आहे. लग्न करण्यापूर्वी नक्की कोणकोणत्या चाचण्या वर आणि वधू दोन्ही पक्षांकडून करून घेणे आवश्यक आहे ते प्रत्येकाला माहीत असायला हवे. मग असे लग्न अरेंज मॅरेज असो अथवा लव्ह मॅरेज दोन्ही लग्नांमध्ये या चाचणी करून घेणे हे आवश्यक आहेच.*

## वैद्यकीय चाचणी तपासणीचे महत्व

- लग्नाआधी या चाचण्या केल्याने जोडीदाराच्या तब्येतीच्या निम्म्या गोष्टी आधीच कळतात आणि जास्त धोके टळतात, त्यामुळे आपल्या जोडीदाराच्या शारीरिक

ताकदीची आपल्याला आधीच कल्पना असते. भविष्यात काळजी घेणे महत्त्वाचे आहे आणि या चाचण्या तुम्हाला तुमच्या आरोग्याबद्दल बरेच काही सांगू शकतात. आपला जोडीदार किती सुदृढ आहे हे जाणून घेण्यास मदत होते.

- जे लोक प्रेम विवाह करतात त्यांना त्यांच्या जोडीदाराबद्दल बरेच काही माहित असते. जे अरेंज मॅरेज करतात. त्यांना त्यांच्या जोडीदाराच्या आरोग्याबद्दल फारसे माहित नसते. त्यामुळे जे कोणी लग्न करू इच्छितात. त्यांनी या चाचण्या करून घ्याव्यात असे मला वाटते.
- कोणत्याही चाचण्या करण्यापूर्वी दोघांचीही संमती असणे महत्त्वाचे आहे. कारण जर एखादी व्यक्ती म्हणाली की त्यांना चाचणी नको आहे, तर त्यांच्यावर जबरदस्ती केली जाऊ शकत नाही. कारण ते त्याचे वैयक्तिक मत असू शकते.
- अशा वेळी जोडीदाराला समजून घेऊन, चाचण्यांचे महत्त्व समजावून सांगून आणि गैरसमज दूर करून त्यासाठी तयार करता येते. दोन्ही कुटुंबातील लोकांना चाचण्यांबद्दल सांगायचे की नाही? हे त्या जोडप्याने ठरवायचे आहे.कारण सगळ्यांनाच हे पटेल याची शाश्वती नाही
- आजच्या पिढीकरिता वंध्यत्व चाचणी अत्यंत महत्त्वाची मानली आहे. तसेच लोक रक्तगट अनुकूलता चाचणीही करत आहेत. आजची तरुणाई कुटुंब नियोजनाच्या दृष्टिकोनातून या चाचण्यांना महत्त्व देत आहे. हे आवश्यक आहे की, तुमचा आणि तुमच्या जोडीदाराचा आरएच फॅक्टर सारखा असावा. याशिवाय अनुवांशिक आजारांशी संबंधित चाचण्या, लग्नापूर्वी अनुवांशिक चाचण्या, स्तनाचा कर्करोग, पोटाचा कर्करोग, किडनीचे आजार आणि मधुमेह आदी चाचण्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

## लग्न करण्यापूर्वी कोणत्या वैद्यकीय चाचण्या केल्या पाहिजेत?

- **लैंगिक संक्रमण रोग चाचणी :** या चाचणी द्वारे दोघांपैकी कोणाला या रोगाची लागण झाली आहे का? हे कळते. जेणेकरून दुसऱ्या जोडीदाराला ही लागण होण्यापासून वाचवता येते. शिवाय, त्यांच्यापासून जन्माला आलेल्या मुलाचेही संरक्षण करता येईल किंवा त्याला हा संसर्ग होऊ नये म्हणून विशेष काळजी घेतली जाऊ शकते. अन्यथा, इतर लैंगिक संक्रमित रोगांच्या बाबतीत डॉक्टर इतर चाचण्या सुचवू शकतात.
- **रक्तगट चाचणी** :रक्तगट चाचणी तुम्हाला आणि तुमच्या जोडीदाराला तुमचा स्वतःचा रक्त प्रकार जाणून घेण्यास मदत करू शकते. आता प्रत्येकाला त्यांचा रक्त प्रकार माहित आहे. पण फॅक्टर खूप महत्वाचा आहे. कारण स्त्रियांसाठी, लग्नानंतरची गर्भधारणा सर्वात महत्वाची आहे. त्याचा थेट परिणाम बाळावर होतो. डॉक्टर याबद्दल तपशीलवार सांगू शकतात. रक्तगट माहीत असल्यास,

कोण कोणाला रक्त दान करू शकेल? हेही आधीच ठरवता येते. जर रक्तगट जुळत नसेल तर या जोडप्याला गरोदरपणात समस्या येऊ शकतात. म्हणूनच हे सुनिश्चित केले पाहिजे की दोन्ही भागीदारांचे आरएच घटक समान किंवा सुसंगत श्रेणीत आहेत. असे करण्यात अयशस्वी झाल्यास आरएच विसंगतता निर्माण होते आणि जेव्हा आरएच-निगेटिव्ह आई आरएच-पॉझिटिव्ह रक्त असलेल्या गर्भासह गर्भवती होते. यामुळे आरएच निगेटिव्ह आईमध्ये अँटीबॉडीज तयार होतात, जे आरएच पॉझिटिव्ह बाळाच्या रक्तापर्यंत पोहोचून लाल रक्तपेशींचे नुकसान करतात.

- **प्रजनन चाचणी :** स्त्री आणि पुरुष दोघेही ही चाचणी करू शकले तर खूप चांगले होईल. चाचणी दोघांसाठी आहे. ही चाचणी स्त्रीच्या संप्रेरक पातळी, अंडाशयांची अल्ट्रासोनोग्राफी, थायरॉईड कार्य आणि इतर घटक निर्धारित करण्यासाठी वापरली जाते. पुरुषांसाठी, ही चाचणी शुक्राणूंची संख्या आणि जननक्षमतेशी संबंधित इतर घटक निर्धारित करण्यासाठी वापरली जाते.

- **जेनेटिक टेस्ट:** लग्नापूर्वी दोन्ही जोडीदारांनी अनुवांशिक चाचणी करून घ्यायला हवी. या चाचणीतून आपल्या जोडीदारास भविष्यात एखादा अनुवांशिक रोग होऊ शकतो का, याची माहिती मिळते.कोणताही रोग आढळल्यास त्यावर वेळेत उपचार करता येतो. त्याचप्रमाणे पुरुषांचीही वीर्य चाचणीदेखील करायला हवी. मूल होण्यास पूर्णपणे सक्षम आहे की नाही यावरुन कळते. अशाप्रकारे, लग्नानंतरच्या आरोग्याच्या समस्यावर वेळीच उपचार करता येतो.

- **इनफर्टिलिटी स्क्रीनिंग:** लग्नानंतर एखाद्या महिलेला मूल झाले नाही तर तिलाच दोष दिला जातो. मात्र हे दोघांवर अवंलबून असते. त्यामुळे लग्नाच्या आधी दोघांनाही इनफर्टिलिटी स्क्रीनिंग टेस्ट करायला हवी. त्याचप्रमाणे, लग्नापूर्वी स्त्रियांनी ओव्हरीची तपासणी करावी, जेणेकरून लग्नानंतर कुटुंब नियोजन करणे सोपे जाते. उशिरा लग्न झाले तर कधी कधी आई होण्याची शक्यता कमी असते. ही चाचणी केल्यास आई होण्याची क्षमता कळते.

- **असाध्य व अनुवंशिक रोग :** एखाद्या कुटुंबात विशिष्ट आजाराचा इतिहास असल्यास, ही चाचणी आपणास मदत करू शकते. मधुमेह, कर्करोग आणि इतर काही रोग टाळण्याची ही एक गुरुकिल्ली आहे.

- **जुनाट आजार :** कोणताही जुनाट आजार गर्भधारणेदरम्यान समस्या निर्माण करू शकतो. लग्न करणाऱ्या जोडप्यांना त्यांच्या उच्च रक्तदाबाची आणि मधुमेहाची स्थिती आधीच माहीत असायला हवी. त्यामुळे ही चाचणी घेणे आवश्यक आहे.

- **पेल्विक अल्ट्रासाऊंड चाचणी:** पेल्विक अल्ट्रासाऊंड चाचणी शरिराच्या आतल्या अवयवांची छायाचित्रे घेण्यासाठी केली जातात. अवयवाचे फोटो काढण्यासाठी ध्वनी लहरींचा वापर केला जातो. ही चाचणी गर्भाशय, अंडाशय आणि फॅलोपियन ट्यूब इत्यादींची स्थिती जाणून घेण्यासाठी केली जाते.
- **मानसिक आरोग्य तपासणी :** लग्नापूर्वी मानसिक आरोग्याशी संबंधित चाचण्या करुन घ्याव्यात यामध्ये Anxiety test, Depression test, OCD test, Personality test, IQ test & marriage compatibility test. इत्यादी चाचण्या करणे गरजेच्या आहेत. अनेकदा मानसिक आरोग्य तपासणीतून तुम्हाला तुमच्या जोडीदाराचे मानसिक आणि भावनिक आरोग्य कशा पद्धतीचे आहे ते समजते. वैवाहिक आयुष्य आनंदी व सुखी होण्यासाठी पती-पत्नी दोघांचं खुश असणं अत्यंत आवश्यक असतं. जर तुम्हाला वाटत असेल की सतत स्ट्रेस येतोय किंवा अति चिंतेमुळे शांत झोप लागत नाही तर आपलं मेंटल हेल्थ चेकअप नक्की करा. मानसिक रोगांविषयी आपल्या समाजात जास्त जागरुकता नसल्यामुळे लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. पण तुम्ही असं करू नका आणि तातडीने मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घ्या. तुम्ही भले कितीही फिट असा पण एकदा ही टेस्ट नक्की करून घ्या. लग्नाआधी काही महिने ही टेस्ट करावी. काही समस्या असल्यास तातडीने उपचार सुरू करू शकता.

## डी. एम. आय. टी. टेस्ट करा

प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव वेगवेगळा असतो आणि प्रत्येकाचा स्वभाव कसा आहे हे ओळखण्याकरिता कोणतेही साधन उपलब्ध नाही. जर दोघांचेही स्वभाव विपरित असेल तर, लग्न झाल्यावर दोघांमध्ये वाद निर्माण होतात. त्याचा परिणाम म्हणजे एकमेकांमध्ये वादविवाद निर्माण होणे, भांडणे होणे शेवटी घटस्फोटामध्ये त्यांची परिणीती होते. यावर आजच्या आधुनिक काळामध्ये एक नवीन चांचणी उपलब्ध झाली आहे. **Dermatoglyphics Multiple Intelligence Test (DMIT) Tool** च्या माध्यमातून आपण दोघांचेही विचार एकमेकांशी जुळतात काय याची चाचणी घेवून सम विचारांच्या जीवनसाथीची निवड करू शकतो. लखनऊ क्राईम ब्रँचने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार ज्या नवराबायकोचे बोटाचे ठसे जितके जास्त मिळतात तितके त्यांचे विचार सारखे असतात. त्यांच्यामध्ये कोणतेही मतभेद होत नाही. दोघांचेही स्वभाव एकमेकांशी जुळणारे असतात. (DMIT) ही टेस्ट तुमच्या हाताच्या दहा बोटाच्या ठश्याच्या माध्यमातून केली जाते. या ठश्याच्या विश्लेषणावरुन तुमचा स्वभाव कळतो, संशोधनानुसार हि टेस्ट खुप महत्वाची असून ही टेस्ट केल्यास तर, लग्न टिकण्याची शक्यता अधिक असते.

टिप :- हि टेस्ट डॉ. मुने सरांकडे उपलब्ध आहे.

## विवाहपूर्व समुपदेशन का गरजेचे आहे?

लग्न ही प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट असते. त्यात दोन वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र येतात, एकत्र संसार करतात. त्यांनी कशा पद्धतीने राहावे, त्यांच्यातील ताणतणाव कसा कमीत कमी राहील आणि दोघांनी एकमेकांना स्पेस कशा पद्धतीने दयावी हे समजून घेण्यासाठी समुपदेशन गरजेचे असते. या गोष्टी आपोआप कोणाला जन्मजात कळत नाहीत. त्यात दिवसेंदिवस घरे छोटी होत आहेत. त्यामुळे मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी मोठी माणसे नाहीत. पूर्वी आजी, आजोबा किंवा जाणती अशी माणसे काही झाले, तर समजून सांगायची; पण विभक्त कुटुंबात नवविवाहित जोडप्यांना मार्गदर्शन करणारी पूर्वीसारखी जाणती माणसे नाहीत. त्यामुळे विवाहपूर्व समुपदेशनात तुमचे नाते कसे राहणार , तुमच्या जबाबदाऱ्या काय आहेत आणि त्या कोणत्या पद्धतीने निभावल्या पाहिजेत, तसेच त्या निभावताना आपल्यातील नाते भावनिक आणि मानसिकदृष्ट्या अधिक भक्कम करणे गरजेचे असते. तसेच आपली कर्तव्ये काय आहेत, कसे वागले पाहिजे, काय टाळले पाहिजे हे सर्व कळणे आवश्यक आहे. याशिवाय परिवारातील मृत्यू, अपघात, लैगिंक बळीची शिकार, सावत्र आईकडून त्रास, शारीरिक प्रताळणा, आईला वडिलांकडून होणारी मारहाण या सारखे प्रसंग मुलामुलीच्या मनावर खोलवर साठवून राहतात. या नकारात्मक घटनांचा परिणाम पुढे मुलीच्या डिलीव्हरी काळामध्ये किंवा संसारामध्ये दिसून येतो. यालाच Postpartum Depresstion असे म्हणतात. संमोहनाच्या सहाय्याने अशा घटना मुलामुलींच्या मनावरुन काढता येतात. संसारातील पुढील परिणाम टाळण्याकरिता मानस तज्ञाकडून समुपदेशन करणे अत्यंत आवश्यक असते.

*******

प्रकरण ५ वे

# अल्पवयात होणारे प्रेम एक समस्या

*वेदानुसार मानवी आयुष्य 100 वर्षाचे अपेक्षित करुन जीवनाचे २५-२५ वर्षाच्या प्रमाणात चार भागात विभाजित करण्यात आले आहेत. या चार भागांना ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास अशा चार आश्रमात वाटले आहे. बाल्य आणि किशोरावस्थामध्ये व्यक्ती गुरुकुलमध्ये दीक्षा ग्रहण करून शिक्षा अर्जित करायचा. यापैकी पहिला भाग म्हणजे ब्रह्मचर्य आश्रम असून ज्याचा कार्यकाल पहिले २५ वर्षापर्यंत मानला जातो. या काळात मनुष्याने शक्तीचे संचय करणे, आपल्या क्षमतेनुसार गुरुकुलामध्ये शिक्षण घेणे आहे आणि पुढील आयुष्याकरिता लागणाऱ्या ज्ञानाचे ग्रहण करण्यामध्ये खर्च करण्यात येत असे. या काळात विद्यार्थी जंगलामध्ये गुरुच्या सानिझ्ात असल्यामुळे बाहेर जगात काय चालले याचे त्याला फारसे ज्ञान नसे. पण आता ही परिस्थिती बदलली आहे. या काळात मनुष्याच्या शरीरात वीर्य आणि रक्तकणांचा विकास जलद गतीने होतो. हा काळ शरीरात शक्ती संचित करणे आणि आरोग्यासाठी उत्तम मानला जातो. गेल्या काही वर्षाच्या काळात चित्रपट, टिव्ही आणि माबाईलने प्रवेश केला आणि माहिती तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला. वेदकाळात ज्या गोष्टी वयाच्या २५ वर्षानंतर माहिती होत होत्या त्या स्मार्ट फोनच्या माध्यमातून अल्पवयातच कळू लागल्या. एकीकडे मानवी जीवन वेगवान झाले आहे. तर दुसरीकडे सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य मोठ्याा प्रमाणात बदलत आहे. चित्रपट, इंटरनेट, डीजे म्युझिक अल्बम्स आणि वेबसाईटवरील माहितीमुळे आजच्या पिढीला तारुण्यात येण्यापुर्वीच प्रेमप्रकरण, लैंगिक संबंध आणि स्त्री-पुरुष यांच्यातील घनिष्ट नातेसंबंधाची माहिती होवू लागली आहे. आईवडील दोघेही कामानिमित्ताने बाहेर असल्यामुळे मुलांमुलींना मित्रमैत्रिणी यांच्याशिवाय कोणीही जवळचा नाही. कुटुंबातील सदस्यांकडून उदासीनता, आईवडीलांकडून प्रेमाचा अभाव आणि आईवडीलांचा पुरेसा वेळ न मिळणे, त्यांचे असामान्य वागणे किंवा घरगुती वाद इत्यादीमुळे नवीन पिढीच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होते. बदलते सामाजिक वातावरण आणि जीवनशैलीमुळे मुले तणावग्रस्त झाली आहेत. अशा परिस्थितीत, तणावातून मुक्त होण्यासाठी, ते आपल्या प्रियजनांचा आधार शोधू लागतात. किशोरवयीन प्रेम ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, जी थांबवणे कठीण आहे, परंतु योग्य वेळी शहाणपणा आणि संयमाचा वापर केला तर किमान किशोरवयीन मुलांच्या या काळात भरकटण्यापासून वाचवता येते.*

## कमी वयात प्रेमात पडण्याची कारणे

- **शरीरात होत असलेले बदल :** पौगंडावस्थेतील हार्मोनल बदलांमुळे मुलामुलींमध्ये शारीरिक आणि मानसिक दोन्ही बदल होतात. अशावेळी मुले

खूप भावनिक आणि संवेदनशील बनतात. याच काळात दोघांमध्ये परस्पराविषयी आकर्षण आणि गुप्तांग विकसित होताना लैंगिक इच्छाही वाढू लागतात. पौगंडावस्थेत असतांना दोघंच्याही मनात विरुद्ध लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटू लागते. याकाळात कल्पनेच्या दुनियेत उडणारे मन... कोणालातरी शोधण्याच्या विचाराने रोमांचित होते. कधी कधी तर, अनोळखी व्यक्तीसोबत अनेक स्वप्ने जपायला लागते. अशी व्यक्ती जेव्हा नजरेसमोर येते तेव्हा त्या व्यक्तीसाठी साऱ्या जगासाठी बंड करण्याकरिता मागेपुढे पाहत नाही. अशा प्रेमात पडलेल्या व्यक्तीने चुकीचा मार्ग निवडला आहे असे जेव्हा, पालकांच्या लक्षात येते त्याचेळी आई-वडिलांसाठी सर्वात कठीण काळ असतो. अशा अवस्थेत असलेल्या प्रेमी युगलास ना काळाची पर्वा, ना समाजाच्या बंधनांची भीती असते. अशा वेळी पालकांची जबाबदारी अधिकच वाढते. अशातच जर निर्णय चुकला तर, दोघांच्या भविष्यावर वाईट परिणाम दिसून येतात.

- **प्रेम ही एक नैसर्गिक प्रक्रिया:** विरुध्द लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण हे या वयातील नैसर्गिक भावना आहे जी कोणलाही टाळता येत नाही. या वयातील तरुणींना चित्रपटातील डँशिंग हिरोचे विशेष आकर्षण असते. मग असा हिरो कोणत्याही वयातील असू शकतो आणि आपल्या स्वप्नामध्ये त्या व्यक्तीकडे आकर्षित होतात. जेव्हा अशा स्वप्नातील हिरो प्रत्यक्ष जीवनात त्यांच्या अवती भवती दिसतो तेव्हा त्यांच्या प्रेमाला विशेष बहर येतो. याच आकर्षणलाच ते प्रेम समजून बसतात. त्यांच्या या प्रेमाला कुठलीही परिपक्वता नसते आणि हाच काळ तरुणांकरिता आणि पालकांकरिता कठीण काळ असतो.
- **काल्पनिक जीवनाचा आनंद :** किशोरवयीन मुलांमुलीमध्ये वास्तविक्तेपेक्षा काल्पनिक जीवनात जगण्याचे वेड असते. जेव्हा त्याच्या मनात स्वप्नांना आणि कल्पनांना नवा आकार देऊन ते प्रत्यक्षात आणण्यासाठी कोणीतरी आहे असे त्यांना वाटते. तेव्हा त्याच्याकडे आकर्षित होतात आणि त्यालाच आपल्या जीवनाचा राजकुमार किंवा राजकुमारी मानतात.
- **बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंड असणे हे सामाजिक स्टेटस सिम्बॉल :** आज पाश्चत्य देशामध्ये गर्लफ्रेंड किंवा बॉयफ्रेंड असणे हे स्टेटस सिम्बॉल बनले आहे. जर आपल्या मुलाला किंवा मुलीचा बायफ्रेड किंवा गर्लफ्रेड नसेल तर, पालकांना चिंता वाटते. जो कोणी या विचारसरणीच्या पलीकडे असेल तो हसतमुख बनतो किंवा पुराणमतवादी समजला जातो. म्हणजे ज्याला बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंड नाही तो हीन समजला जातो. या विचाराचा परिणाम भारतातील मोठमोठ्या शहरामध्ये दिसुन येतो.

## सामाजिक परिस्थिती

आपणही हे अनेकदा अनुभव असतो किंवा बोलत असतो की, शाळेतली मुले ही पहिल्यासारखी राहिली नाहीत. पुर्वी प्रेमाचा फिव्हर हा कॉलेजमध्ये चढायचा पण हल्ली तर शाळेत देखील  मुल-मुली एकमेकांच्या प्रेमात पडायला लागली आहे. याचा अर्थ हल्लीच्या मुलामुलींचा  स्पिड हा पुर्वीच्या तुलनेत अधिक वाढला आहे हे मात्र सत्य आहे. पौगंडावस्थेत असणारी मुले अनेक चढउतारांमधून जात असतात. खऱ्या जीवनातील अनुभवाचा अभाव असल्यामुळे आपल्या काल्पनिक जीवनालाच खरे मानतात आणि त्यापासून होणाऱ्या परिणामाबद्दल ते बेफिकीर असतात . यामुळेच या वयात जनरेशन गॅप सर्वाधिक जाणवते. अशा वयात असणाऱ्या बहुतेक मुलांवर त्यांचे कुटुंब आणि पालकांपेक्षा बाहेरील व्यक्ती आणि मित्रांचा प्रभाव जास्त असतो. अशा परिस्थितीत, त्यांच्यासाठी एकमेकांकडे आकर्षित होणे किंवा प्रेमात पडणे असामान्य नाही. पण ही परिस्थिती तुमच्यासाठी चिंताजनक असू शकते.

या अवस्थेमध्ये मुले आणि मुली साहजिकच मूडी, संवेदनशील, भावनिक, निष्काळजी आणि परिणामांची चिंता न करता निर्णय घेतात. अशा अवस्थेत त्यांना आपले पालक सुध्दा शत्रूवत किंवा रुढीवाढी वाटतात. अशा अवस्थेत  असलेले हे किशोरवयीन मुले कधी आणि कोणते पाऊल उचलतील हे कळणे कठीण आहे. भावनेच्या भरात ते कोणताही चुकीचा निर्णय घेऊ शकतात. कधी कधी प्रेमात फसवणूक झाल्यावर किंवा मन दुखावल्यावर ते हे सर्व सहन करू शकत नाहीत. तुमच्या मुलाचे मानसिक संतुलन बिघडण्यापूर्वी किंवा आपले मानसिक संतुलन गमावण्यापूर्वी, त्यांना सांभाळणे ही पालकाची महत्वाची जबाबदारी ठरते. अन्यथा त्यानंतर होणाऱ्या परिणामामुळे संपूर्ण कुटूंबाचे मनस्वास्थ बिघडते. अशा अवस्थेमध्ये कुट्रूंबातील कर्त्या पुरूषावर संपूर्ण कुटूंबाला साभाळण्याची महत्वाची जबाबदारी येते. तेव्हा पालक म्हणून, आपल्या मुलांच्या सर्व प्रकारच्या भावना समजून घेणे ही आपली जबाबदारी ठरते. मुले जसजशी मोठी होतात तसतसे त्यांच्यात अनेक हार्मोनल बदल होतात. त्यांच्या शरीरात, वागण्यात, आवडीनिवडीतही बदल होतो. या वयात जरी त्यांना इतर लिंगाबद्दल आकर्षण वाटत असले तरी त्यात काहीही चुकीचे नाही, त्यांना घाबरवण्याऐवजी किंवा रागावण्याऐवजी त्यांच्याशी बोलणे आवश्यक आहे.

हे वय कदाचित असे वय आहे की मुलाला त्याच्या पालकांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट वाईट वाटते. अशा स्थितीत मुलं त्यांच्यासारखं त्यांच्याशी बोलेल अशी एखादी व्यक्ती शोधू लागतात. एखाद्यावर प्रेम करणे किंवा आवडणे यात काही गैर नाही, परंतु  आपल्या पाल्याने चुकीच्या व्यक्तीकडे किंवा चुकीच्या मार्गावर जाऊ नये याची वेळीच काळजी घेणे ही पालकांची जबाबदारी ठरते.

## पालकांनो! तुमच्या किशोरवयीन मुलामध्ये होणारे बदल समजून घ्या

मुलांच्या किशोरवयीन काळात मुले आपल्या आयुष्याच्या दुसऱ्या आणि महत्त्वाच्या टप्प्यात प्रवेश करीत असतात. या काळात त्यांच्या शरीरात अनेक महत्वाचे बदल होत असतात आणि आपणसुध्दा त्याच टप्पातून गेलेले असतो यांची जाणीव प्रथम स्वतःला ठेवा. हार्मोन्समुळे मुलांच्या शरीरात अनेक बदल होत असतात आणि या बदलांचा परिणाम त्याच्या शरीरावरच नव्हे तर त्याच्या वागण्यात आणि बोलण्यातही दिसून येत असतो. एका संशोधनानुसार, ५० टक्के मानसिक समस्या याच काळात सुरू होतात. पौगंडावस्थेमध्ये मुलावर अनेक प्रकारची दडपण येत असतात. याचा तो योग्य पद्धतीने सामना करू शकला नाही, तर समस्यांचा गुंता वाढत जातो. याच काळात आपली मुले अनेक नवनवीन लोकांच्या संपर्कात येत असतात आणि या अवस्थेत त्यांचे एकमेकांकडे आकर्षणही वाढते. पालकांसाठीही हा काळ अतिशय नाजूक असतो त्यामुळे मुलांची काळजी घेणे आवश्यक असते. या काळात मुलांना समजून घेण्यासोबतच त्यांना त्यांच्या मनात निर्माण झालेल्या समस्या समजावून सांगणेही महत्त्वाचे असते. जर यावेळी आपण मुलांच्या पाठीमागे ढालीप्रमाणे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. ते तुम्हाला समजत नसतील पण तुम्ही त्यांना समजून घेऊन समजावून सांगणे आवश्यक आहे. मुलाला योग्य आणि अयोग्य याबद्दल शिक्षित करणे आणि त्यांच्या लैंगिकतेबद्दल त्यांना स्पष्ट माहिती असणे गरजेचे आहे. त्यांना सर्व परिणामांची जाणीव करून देणे खूप महत्वाचे आहे. याकाळात मुलाला स्वतःबद्दल चांगले वाटू द्या, त्यांचा आत्मविश्वास वाढवा आणि त्यांना कळू द्या की रंग आणि आकार यामुळे काही फरक पडत नाही. तुम्हाला वाटत असेल की मुलावर काही प्रकारचे दडपण आहे, तो आवश्यकतेपेक्षा जास्त झोपत आहे, तो एकटा राहणे पसंत करत आहे, तर त्याच्याशी बोला आणि त्याला सर्वकाही सांगण्यास प्रवृत्त करा. कराण यावर संवाद हाच एक बेस्ट पर्याय आहे. सर्व समस्यांचे निराकरण हे हेल्दी संवादातूनच पुढे जाणार आहे. समजून घेणे अत्यंत महत्वाचे असते. अशा काळात आपण त्यांचे आईवडील होण्याऐवजी मित्र व्हा आणि त्यांच्या भावनांना समजून घ्या.

- **मुलांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करा :** जेव्हा तुम्ही तुमच्या मुलांशी बोलता तेव्हा त्याचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका आणि विचारपूर्वक त्याचे समाधान करा. त्याच्या कोणत्याही कृत्यावर टीका करणे किंवा कठोरपणे प्रतिक्रिया देण्याचे टाळा. जर तुमच्या मुलाने तुम्हाला अस्वस्थ करणारे प्रश्न विचारले असतील त्याला समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न करा. अशाप्रकारे त्याच्यामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करा. यामुळे तुमच्यासोबत कोणत्याही प्रश्नावर संवाद साधण्याचा प्रयत्न करतील.

- **मुलांसोबत आपला वेळ खर्च करा:** आपल्या मुलांसोबत दिवसाचा काही वेळ घालवा आणि आपाला अनुभव शेअर करा. त्यांच्या मित्रांना घरी आमंत्रित करा, त्यांच्या आवडीचे गेम, नवीन चित्रपट इत्यादींबद्दल त्यांच्याशी बोला आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करा. मूल तुमच्यापासून काहीही लपवू नये यासाठी प्रयत्न करा. तो तुम्हाला सांगेल किंवा सांगणारही नाही असे गृहित धरुन तुम्ही त्याच्याशी वर्तवणूक ठेवा. तुम्हाला हे समजले पाहिजे की मुलाला तुमच्या सहवासाची खूप गरज आहे.
- **आपल्या मुलांना वास्तविक जीवनाचा परिचय करुन द्या :** किशोरवयीन मुलांमध्ये प्रणय आणि प्रेमाबद्दल अवास्तव कल्पना असू शकतात ज्या त्यांनी चित्रपट आणि टीव्हीवरून शिकल्या असतील. त्यांना आठवण करून द्या की खरे जीवन नेहमीच परिपूर्ण आणि मोहक नसते. खरे प्रेम म्हणजे आपल्या सर्व दोष आणि फायद्यांसह मुक्त होणे आणि समोरची व्यक्ती जशी आहे तशी स्वीकारणे.
- **जीवनातील प्राधान्य समजावून सांगा:** पौगंडावस्थेत, मुलांना त्यांचे प्राधान्यक्रम समजू शकत नाहीत त्यांना त्यांच्या मित्रांसोबत आणि सोशल मीडियासोबत वेळ घालवणे आवडते. पण तुम्ही मुलांना आरामात समजावून सांगा की, यावेळी अभ्यास, करिअर, शिस्त याला तुमचे प्राधान्य असले पाहिजे.जर तुमचा एखादा मित्र असेल ज्याला तुम्ही डेट करू इच्छित असाल तर त्यांच्यासाठी काही सीमा तयार करा जेणेकरून ते तुमच्या अभ्यासात, स्वप्नांमध्ये आणि तुमच्या करिअरमध्ये व्यत्यय आणू नये. या गोष्टी कदाचित त्यांना चांगला निर्णय घेण्यास मदत करू शकतात. किशोरवय हा जीवनाचा टर्निंग पॉईंट आहे, त्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.
- **निरोगी नातेसंबंधाच्या सीमा स्पष्ट करा:** त्यांना काही सीमांबद्दल कळू द्या ज्याची त्यांना नात्यात जाणीव असली पाहिजे. त्यांचे स्वातंत्र्य कुणालाही हिरावून घेऊ देऊ नका, त्यांची मानसिक शांती कुणालाही हानी पोहोचवू देऊ नका, असे त्यांना सांगण्याची गरज आहे. जर कोणी असे केले तर त्याला तिथेच थांबवा.
- **लैंगिक शिक्षणाबद्दल बोला:** लैंगिक शिक्षणाबद्दल बोला: आजही आपल्यातील बऱ्याचशा पालकांची आपल्या मुलांसोबत लैंगिक विषायावर बोलण्याची मानसिकता नसते. परंतु, आजच्या आधुनिक युगामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट झाला आहे. काही वर्षापुर्वी जी माहिती सर्वसामान्यता कुटूंबामध्ये बोलणे वाईट मानले जात होते. ती संपूर्ण माहिती इंटरनेटवर उपलध्द आहे आणि आपल्यापेक्षाही अधिक वेगाने नवीन पिढी इटरनेटवरील कोणतीही माहिती

मिळविण्यात सक्षम झाले आहेत. त्यांना इतरांकडून कोणतीही चुकीची माहिती मिळण्याऐवजी आपण त्यांचे समाधान केल्यास तर, चुकीच्या मार्गावर त्यांची पावले जाण्यापासून थांबवू शकता.

## अल्पवयात प्रेमात पडल्याचे दुष्परिणाम

प्रेम होण्याला कोणते वय नसते. ते अगदी सहज होऊन जाते. पण आपले पाल्य कमी वयात प्रेमात पडला तर, वेळीच त्याची काळजी घेणे खूप गरजेचे असते. प्रेम होणे हे जरी आपल्या हातात नसले तरी, प्रेमातील मर्यादा सांभाळून त्याच्या दुष्परिणापासून आपल्या पाल्याला सांभाळणे हे नक्कीच आपल्या हातात असते. अशावेळी बेजाबाबदारपणे केलेली एखादी चूकही आपल्या कुटूंबाकरिता महागात पडू शकते. प्रेमात पडलेली मुले-मुली शांत डोक्याने विचार करण्यापेक्षा हळवे होऊन मनाने किंवा हृदयाने निर्णय घेतात. ज्यामुळे अशा परिस्थितीमध्ये अशा काही गोष्टी घडतात की त्याचा आपणास पश्चाताप त्यांना आयुष्यभर करावा लागतो. या सर्व परिणामापासून आपल्या पाल्यास दूर ठेवणे हीच आपली खरी कसोटी असते.

- **अभ्यासाकडे दुर्लक्ष :** हल्लीची बरीच मुले-मुली कॉलेजमधील आपल्या एखाद्या मित्राच्या किंवा मैत्रीणीच्या प्रेमात पडतात. कधीकधी शालेय जिवनापासूनच अशा प्रकारची सुरवात होत. या काळात सुरु झालेली प्रेमकहाणी ही अनेक साहसांनी भरलेली आणि भावनिक बंधात बांधली गेलेली असते. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रेमीयुगल आपल्या अभ्यासापेक्षा प्रेमाला आणि नात्याला जास्त महत्व देऊ लागतात. यामुळे त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ शकते आणि त्याचा परिणाम त्याच्या भावी करियर पडतो. अशा वेळी सावधगिरी बाळगणे खूपच आवश्यक आहे.
- **हस्तमैथुनाची सवय लागणे. :**जर मुलांचे प्रेम एकतर्फी असेल तर, तो मुलगा स्वप्नामध्ये किंवा झोपेमध्ये त्या मुलीकडे जवळीक साधत असल्याची संकल्पना करतो. अशा अवस्थेमध्ये लैगिंक उत्तेजना येवून अशा मुलांना हस्तमैथुन करण्याची सवय लागते. अशा सवयीच्या आहारी जावून अशी मुले शारीरिक दृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या कमजोर होवून नैराश्याकडे जातात. शेवटी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. अशा प्रकारच्या कितीतरी केसेस माझेकडे आलेल्या आहेत आणि त्यांचेवर उपचार चालू आहेत.
- **वेळ आणि पैशाचा गैरवापर :** भर प्रेमाच्या अवस्थेमध्ये प्रेयसीला महागड्या भेटवस्तू देणे, प्रियकराला खुश करण्यासाठी सरप्राईज देणे आणि फिरायला जाण्यासारख्या गोष्टी या जोडप्यांमध्ये अगदी साधारण घडतात. या सर्व गोष्टींसाठी पैशांची गरज भासते आणि कॉलेजमधील मुलांकडे पैसे नसल्याने पैशांसाठी ते सहाजिकच आई-वडीलांवर अवलंबून राहतात. आई-वडीलांनी पैसे

न दिल्यास ते मित्रांकडून उधारी घेतात आणि जेव्हा ही रक्कम चुकती करण्याची वेळ येते तेव्हा मात्र असे युगल गैरमार्गाकडे वळतात. अशावेळी त्यांना सावध करणे आणि या संकटातूक बाहेर काढणे कठीण असते तेव्हा आपल्या पाल्यास वेळीस सावध करण्याची गरज असते.

- **शारीरिक जवळीक :** प्रेमात आकंठ बुडालेल्या प्रेमी युगलाकरिता शारिरिक जवळीक निर्माण होणे ही गोष्ट फारच संवेदनशील आणि संकटांना निमंत्रण देण्यासारखी घटना आहे. जर यामध्ये थोडा जरी निष्काळजीपणा झाल्यास तर, त्याचे परिणाम मुलींना भोगावे लागते किंवा मुलांवर सुध्दा गंभीर आरोप लादले जातात. अशा अवस्थेमध्ये त्यांचे संपूर्ण आयुष्य चुकीच्या मार्गावर जावू शकते अशावेळी आपल्या पाल्यास वेळीच सावरणे आवश्यक असते.
- **गैरफायदा घेणे:** कॉलेजमध्ये अशी बरीच मुले-मुली असतात जी स्वतःच्या आनंदासाठी, आरामदायी जीवनासाठी प्रेमप्रकरण सुरु करतात. त्यामुळे अशा नात्यांमध्ये प्रेम नसते तर, केवळ टाइमपास म्हणून नाती निर्माण होतात आणि कॉलेज संपताच ही नाती देखील तुटतात. अशावेळी सर्वात जास्त त्रास त्या व्यक्तीला होतो जो खरोखर मनापासून त्या नात्यात गुंफलेला असतो. अशा परिस्थितीत बऱ्याचदा ब्लेकमेल आणि शारीरिक अत्याचारासारख्या गोष्टी देखील घडतात.
- **नात्यामध्ये दुरावा निर्माण होणे:** सर्वमान्यतः आपल्या मुलामुलीने आपल्या जातीतील किंवा समाजातील आणि आपल्या संमतीने लग्न करावेत अशी अपेक्षा असते. परंतु, प्रेमात पडण्याला कोणताही धर्म किंवा जात आडवी येत नाही. परंतु, रुढीप्रिय पालकांना ही गोष्ट आवडत नाही. यामुळे मुलामुलींच्या नात्यामध्ये दूरावा निर्माण होतो. हीच गोष्ट टाळण्याकरिता आपण आपल्या पाल्यास वेळीच सावध करणे आवश्यक आहे.

*******

प्रकरण ६ वे

# प्रेमविवाह योग्य आहे का

*प्रेमविवाह चांगला की अरेंज मॅरेज चांगले यावर कोणतेही निश्चीत असे उत्तर नाही. मुलगा किंवा मुलाचे आम्ही निवडलेल्या मुलासोबत किंवा मुलीसोबत लग्न करावे, लग्नानंतर त्यांचे आयुष्य सुखी व्हावे, आपल्या मनासारखे नातेवाईक मिळावे त्यांच्यामध्ये मानसन्मान व्हावा अशी पाल्याची ईच्छा असते. काही दशकापुर्वी आईवडिलांनी निवडलेल्या मुंलासोबत किंवा मुली सोबत मान खाली घालून लग्न लावले जात असे यामध्ये मुलामुलीच्या इच्छेला फारसे महत्व नसायचे काळाच्या ओघात मुलामुलीची पसंती प्रथम स्थानी आली. आता बदलत्या काळात प्रथम मुलगा किंवा मुलगी आपला जोडीदार पसंत करते आणि नंतर आपल्या आईवडिलांना त्याची माहिती देते. लव्ह मॅरेज असो किंवा अरेंज्ड मॅरेज असो दोन्ही लग्नाच्या पध्दती आपआपल्या ठिकाणी योग्यच आहे. लग्नानंतर दोघांच्याही आयुष्यात आनंद नसेल तर आयुष्य अवघड होऊन बसते. बऱ्याचदा छोट्या छोट्या कारणामुळे विवाहित जोडप्यांमध्ये वाद होतात. अनेकदा याचे रुपातंर घटस्फोटासारख्या गोष्टीत होते. दोन्ही पध्दतीमध्ये लग्नानंतरचे आयुष्य कधीकधी आव्हानात्मक ठरु शकते. भारतासारख्या देशात बहुतांश जोडपी अरेंज मॅरेज करतात. एका अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे की, आजही भारतात ७० टक्के विवाह अरेंज मॅरेजच करतात. यामुळे कोणती विवाह पध्दती योग्य हा प्रत्येकाच्या आयुष्यातील वैयक्तिक प्रश्न आहे दोन्ही प्रकार आपल्या जागी योग्य आहे. परंतु, ज्यामध्ये दोघाचेही आयुष्य आनंदात जाईल तिच विवाह पध्दती चांगली*

प्रेमविवाह! तरुणाईला शतकानुशतके भुरळ घालणारा शब्द आहे. गेल्या दोन दशकामध्ये प्रेमविवाहामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षामध्ये टिव्ही आणि मोबाईलने मानवी जिवनात प्रवेश केल्यापासून प्रेमविवाहाचा भयानक उदोउदो झाला आहे. आज सर्वच क्षेत्रांत ठसा उमटविणाऱ्या मुलींच्या संख्येत जशी प्रचंड वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे शाळकरी वयात प्रेमात पडणाऱ्या, अव्यवहारीपणे, आणि बेजबाबदारपणे प्रेमप्रकरणांच्या संख्येमध्येही वाढ झाली आहे. आपल्या प्रेमाच्या पूर्तीसाठी, लग्नासाठीपालकांना वेठीस धरून इमोशनली ब्लॅकमेल करणाऱ्या जर या मार्गाने लग्न होत नसेल तर, पळून जावून लग्न करणाऱ्या मुलांमुलींच्या संख्येमध्ये आजच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. इतकेच नव्हे तर, मुलांमुलींच्या प्रेमप्रकराणंमध्ये एकमेकांत वैर निर्माण होईल इतक्या टोकांचे मतभेद वाढत चालले आहेत की, तडजोड कुठपर्यंत आणि का करावी हा प्रश्न पालकांना

अस्वस्थ करतो आहे. अशा या कौटुंबिक अस्वास्थ्य निर्माण करणाऱ्या संघर्षांला कसे तोंड द्यायचे हा आजच्या पालकांसमोरील मोठा प्रश्न आहे.

## प्रेमविवाहाची कारणे

- हल्ली मुली लवकर वयात येतात. वयाच्या नऊ ते अकराव्या वर्षी वयात आलेल्या मुलींना वयाच्या साधारण पंधराव्या ते अठराव्या वर्षी बॉयफ्रेंडची गरज निर्माण होते. या काळात त्याचे जग हे आजूबाजूच्या मित्रमत्रिणींपुरतेच मर्यादित असल्याने त्यांना प्रेमात पडायला बरोबरीचे मित्र सुध्दा मदत करतात.
- प्रेम करण्याच्या काळामध्ये आधी शिक्षण पूर्ण करणे, नोकरी शोधणे, राहायला घर घेणे, मग जोडीदाराचा शोध व नंतर लग्नाचा विचार करणे या क्रमवारीऐवजी आधी जोडीदार निवडणे, जमल्यास शिक्षण पूर्ण करणे, मग नोकरी आणि मग लग्न असा विपरीत क्रम हल्ली सगळीकडे दिसतोय.
- एकीकडे मुलींचे तारुण्यात येण्याचे वय कमी होत आहे, तर लग्नाचे वय वाढत आहे. त्यामुळे प्रेमात पडणे व विवाह यांच्यातील काळाचे अंतर प्रचंड वाढल्याने अनेक मानसिक, शारीरिक, भावनिक, कौटुंबिक तसेच सामाजिक समस्यांचा जन्म होत आहे. या समस्येचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे बहुतेक मुलींचे शाळा-कॉलेजातच 'ॲडव्हान्स बुकिंग' होत आहे.
- प्रेमविवाह करणाऱ्या मुलींना लग्नानंतर व्यवहाराचे चटके बसायला लागल्यावर त्याच पालकांकडून सर्व प्रकारची मदत घेण्यात मुळीच कमीपणा वाटत नाही. शिवाय फक्त तरुणतरुणींमध्ये असते तीच प्रेमभावना तेवढी महत्त्वाची. बाकीच्या नातेसंबंधातल्या प्रेमभावनेला यांच्या लेखी फारसं महत्त्व नसतं.
- साधारण १९८० पर्यंत मुलामुलींची लग्ने ही पालकांच्या समंतीने लावली जात असे आणि मुले आणि मुली सुध्दा आपल्या आईवडीलांच्या संमतीने विवाहाला मान्यता देत असे आणि आपल्या पालकांसमोर कोणत्याही प्रश्न उपस्थित करीत नसे.
- एकूण सरसकट प्रेमविवाह करणे चुकीचे असे नाहीत, आज लग्नाच्या वयात असलेल्या मुलामुलींचे पालक जेव्हा ते तरुण होते तेव्हा टिव्ही किंवा चित्रपटामध्ये बघून आपलाही हिरोहिरोईनप्रमाणे प्रेमविवाह व्हावा असे त्यांना वाटत असेलही परंतु, त्यावेळसची समाज व्यवस्था आणि आईवडील व नातेवाईकाच्या अप्रत्यक्ष दबाबवामुळे त्यांना आपली ईच्छा जाहीर करता आलि नाही किंवा तसे साहस न करता आल्यामुळे आईवडीलांनी पसंत केलेल्या ठिकाणी लग्न करण्यास मान्यता दिलेली असते. जेव्हा आपली मुलगी किंवा मुलगा लग्नास येतो तेव्हा आपल्या जावायाबद्दल आणि सुने बद्दल काही अपेक्षा ठेवतात.

## कुटूंबाच्या संमतीने प्रेमविवाह केल्यास होणारे फायदे

लग्न हे आयुष्यभराचे नाते असते असे म्हणतात. त्याच वेळी, जर आपण प्रेमविवाहाबद्दल बोललो तर याचा अर्थ असा विवाह आहे जिथे मुलगा आणि मुलगी एकमेकांना आधीच ओळखतात आणि त्यांच्यात खोल प्रेम असते. दोघांनी परस्पर संमतीने लग्न केले तर त्याला प्रेमविवाह म्हणतात. जर तुम्ही कुटूंबाच्या संमतीने विवाह केल्यास तर प्रेमविवाहाचे फायदे आहेत.

- **इच्छित जीवनसाथी भेटणे:** प्रेमविवाहाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आपल्या आवडीचा जोडीदार मिळणे. अरेंज्ड मॅरेजच्या विपरीत, प्रेमविवाहात, कुटुंबातील सदस्य जोडीदार शोधत नाहीत, उलट मुलगा किंवा मुलगी त्यांच्या आवडीनुसार जीवनसाथी निवडतात आणि नंतर परस्पर संमतीने लग्न ठरवतात.

- **प्रेमाने भरलेले नाते:** नावाप्रमाणेच प्रेमविवाह हा प्रेमाच्या नात्यावर आधारित असतो. त्याच वेळी, एनसीबीआय (नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन) द्वारे करण्यात आलेल्या प्रेमाशी संबंधित एक संशोधनानुसार ज्यामध्ये काही महिलांनी म्हटले आहे की विवाहापूर्वी विवाहित जोडप्यात प्रेम असेल तर त्यांचे नाते अधिक स्थिर आणि घट्ट असते. अरेंज मॅरेजमध्ये लग्नानंतर प्रेम होते म्हणजेच, विवाहानंतर प्रेमाचे बंधन हळूहळू घट्ट होत जाते, तर प्रेमविवाहात प्रेमाचे बंधन आधीच घट्ट असते.

- **जोडीदाराची चांगली ओळख:** प्रेमविवाहाचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्ही तुमच्या जोडीदाराला लग्नाआधीपासूनच चांगल्या प्रकारे ओळखणे. प्रेमविवाहात जोडपे त्यांच्या जोडीदारास चांगले समजतात. ते एकमेकांच्या आवडी-निवडीची पूर्ण काळजी घेतात. शिवाय, त्यांना चांगल्या आणि वाईट वर्तनाची देखील चांगली जाणीव असते. त्यामुळे त्यांच्या नात्यात वितुष्ट येण्याची शक्यता फारच कमी असते.

- **भांडणाला वाव कमी:** कोणत्याही नातेसंबंधात भांडणे सामान्य मानली जात असली तरी, अरेंज्ड मॅरेजच्या तुलनेत प्रेमविवाहात भांडणे होण्याची शक्यता कमी असते. याचे कारण असे की लव्ह मॅरेज जोडपे एकमेकांना बऱ्याच काळापासून एकमेकास ओळखतात, त्यामुळे त्यांना एकमेकांच्या स्वभावाची त्यांना चांगली जाणीव असते. त्यांना एकमेकांना माहिती असते की आपल्या जोडीदारास कसे सांभाळावे. त्यांच्यापैकी कोणते शब्द समोरच्या व्यक्तीला अपमानित करू शकतात आणि कोणते नाही.

- **सतत आनंदी राहण्याचा प्रयत्न :** आपल्याला हवे ते मिळाले तर कोणाला आनंद होत नाही? प्रेमविवाह करणाऱ्या जोडीदारांसोबतही असेच काहीसे घडते.

त्यांना त्यांच्या आवडीचे आयुष्य मिळते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या आयुष्यात खूप समाधान मिळते आणि ते त्यांचे पुढील आयुष्य आनंदाने घालवू शकतात.

## कुटूंबाच्या संमतीने प्रेमविवाह न केल्यास होणारे तोटे

अजूनही आपल्याकडे प्रेमविवाहाला कुटूंबामध्ये पसंत केले जात नाही. जर कोणतेही पालक प्रेमविवाहासाठी तयार नसतील तर पटवून देण्याचा प्रयत्न करा. जर तुमच्या विवाहाला कुटूंबाची संमती नसेल तर, भविष्यामध्ये तुम्हाला तोटेच सहन करावे लागेल. याची किंमत फार मोठी आहे.

- **प्रियजनांपासून दूर राहणेः** आजकाल प्रेमविवाह हे आंतरजातीय, आंतरधर्मिय होवू लागले आहेत. अरेंज मॅरेज हे प्रामुख्याने जातीतच होत असल्यामुळे यामध्ये नातेवाईकांचा गोतावळा मोठा असतो. कुटुंबातील सदस्यांनी प्रेमविवाहास सहमती दिली तर जोडप्यांना यात लग्नाकरिता कोणतीही अडचण येत नाही. त्याचवेळी घरच्यांचे पटत नसेल किंवा लग्नाला घरच्याची मान्यता नसेल तर, इथूनच कुटूंबातील संघर्षाला सुरूवात होते. कधीकधी त्यांना कुटुंबाच्या विरोधात जावे लागते, विशेषतः जेव्हा जोडीदार दुसऱ्या जातीचा किंवा धर्माचा असतो. अशा परिस्थितीत समाजाच्या भीतीपोटी कुटुंबीय, मित्रमंडळी, नातेवाईकही अंतर ठेवतात. प्रेमविवाहाचा हा सर्वात मोठा तोटा मानला जाऊ शकतो.

- **समाजाचे गुन्हेगार बनणेः** प्रेमविवाह करणाऱ्या जोडप्यांना काही वेळा समाजाचा पाठिंबा मिळत नाही. वास्तविक, प्रत्येक धर्माच्या स्वतःच्या प्रथा आणि परंपरा वेगवेगळ्या असतात, ज्या समाजाच्या हितासाठी सर्वानिच पाळल्या पाहिजेत अशी समाजाची अपेक्षा असते. त्याचबरोबर प्रेमविवाह करणाऱ्या जोडप्यांनी या प्रथा पाळल्या नाहीत तर समाज त्यांना गुन्हेगार मानू लागतो. त्यांचा या समाजाच्या दृष्टीने योग्य संबंध नाही.
- **कुटुंबांमधील मतभेद :** प्रेमविवाहामुळे मुलगा आणि मुलगी दोघांच्याही कुटुंबात कलह निर्माण होऊ शकतो. वास्तविक, या प्रकारच्या लग्नामध्ये जोडप्याचे कुटुंब एकमेकांना नीट ओळखत नसल्यामुळे दोघांच्याही आईवडीलांच्या मनात असलेल्या अपेक्षा पूर्ण होत नाही. यामुळे त्यांच्या इच्छा पूर्ण न झाल्यामुळे कुटूंबात मतभेदाची परिस्थिती उद्भवू शकते.
- **बदनामी होण्याची भीतीः** प्रेमविवाह दुसऱ्या धर्मात किंवा जातीत झाला तर केवळ मुलगा-मुलगीच नाही तर त्यांच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांनाही बदनामीची भीती वाटते. भारतात आजही अशी काही कुटुंबे आहेत जी जात आणि धर्माच्या वर उठून प्रेमविवाह करण्यास सहमत आहेत. परंतु, समाज अशा कुटुंबांना स्वीकारण्यास नकार देतो. यामुळे त्यांना बदनामीला सामोरे जावे लागू शकते.

## प्रेमविवाह यशस्वी न होण्याची कारणे

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. लग्नानंतर दोन व्यक्ती नव्या आयुष्याची सुरुवात करतात. सध्या अनेकांना अरेंज मॅरेजपेक्षा लव्ह मॅरेज करायला आवडते. प्रेमविवाह करण्याचे अनेक फायदे आहेत. प्रेमविवाहामध्ये जोडीदाराला समजून घेणे खूप सोपे जाते; पण तरीसुद्धा काही कारणांमुळे प्रेमविवाह अयशस्वी होऊ शकतात.

- **घरच्या मोठ्या व्यक्तींचे सहकार्य न मिळणे:** अनेकदा प्रेमविवाह करताना घरच्या लोकांचे सहकार्य लाभत नाही. हे लोक प्रेमविवाहच्या विरोधात असतात. अशा वेळी लग्नानंतर ते जोडपे स्वत:ला एकटे समजू लागते. नात्यात आलेली कोणतीही अडचण असे जोडपे त्यांच्याबरोबर शेअर करू शकत नाही. त्यामुळे अनेकदा त्यांना समजून सांगणारे कोणी नसल्यामुळे ते दाम्पत्य विभक्त होण्याचा विचार करू लागतात.
- **जोडीदाराचा खरेपणा समोर आल्यास :** प्रेमविवाहानंतर जोडीदाराचे आयुष्य पूर्णपणे बदलते. बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड लग्नानंतर नवरा-बायको होतात. लग्नानंतर एकमेकांबरोबरचा सहवास वाढतो, जोडीदाराविषयी चांगल्या-वाईट गोष्टी कळू लागतात, तेव्हा खरेपणा समोर येतो. अशा वेळी मतभेदांचे प्रमाण वाढून वारंवार खटके उडण्याची शक्यता जास्त असते. मग नात्यात समजूतदारपणा कमी असेल, तर नात्यात तेढ निर्माण होऊ शकते.
- **घाईत लग्नाचा निर्णय घेणे:** लग्न ही आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची बाब आहे. प्रेम विवाह करताना कधीही घाईत निर्णय घेऊ नका. जोडीदाराला व्यवस्थित समजून घ्या. अनेकदा कित्येक जण आकर्षणाला प्रेम समजतात आणि लग्नानंतर पश्चात्ताप करतात.प्रेमविवाह करण्यापूर्वी जोडीदार आपल्यासाठी योग्य आहे का, हे जाणून घेणे खूप महत्त्वाचे ठरते. परंतु, घाईघाईने निर्णय घेतल्यास तर, जोडप्यांमध्ये खटके उडायला लागतात आणि भांडणे होवू लागतात. शेवटी हा वाद घटस्फोटापर्यंत येवून पोहचतो.
- **अति अपेक्षा ठेवल्यामुळे :** अशाप्रकरणामध्ये लग्नापुर्वीचा काळ हा चित्रपटामध्ये दाखविल्याप्रमाणे असतो आणि लग्नांनंतरही जोडीदार एकमेकांकडून त्याप्रमाणे अपेक्षा ठेवतात. लग्नानंतर दोघांचेही आयुष्य पूर्णपणे बदलते. जबाबदाऱ्या वाढतात आणि त्यामुळे जोडीदार तुम्हाला पूर्वीप्रमाणे वेळ देऊ शकत नाही. त्यामुळे दोघांनीही परस्परांकडून अति प्रमाणात अपेक्षा ठेवल्यास तर, लग्नानंतर काही वर्षातच एकमेकांमध्ये खटके उडायला लागतात.
- **एकमेकांविषयी आदर नसणे:** कोणत्याही नात्यात एकमेकांविषयी आदर असणे खूप गरजेचे आहे. प्रेमविवाहामध्ये दोघेही एकमेकांना चांगले ओळखतात.

त्यामुळे ते एकमेकांबरोबर मनमोकळेपणाने वागतात. अशा वेळी एकमेकांचा अनादर होणार नाही याची काळजी घेणेही तितकेच गरजेचे आहे.

## प्रेमविवाह आईवडिलांच्या परवानगीने करा

प्रेमविवाह करणे वाईट नाही, जर करावयाचाच असेल तर, आईवडीलांच्या परवानगीने विवाह करा. लग्न करतांना आईवडिलांची गरज नसली तरी, लग्नानंतर येणाऱ्या प्रसंगांना सामना करण्याकरिता परिवाराची आपणास खुप मदतीची आवश्यकता असते. उदा. अपघात झाल्यास, तेव्हा, गर्भधारणेचे वेळी आपले कुटूंबच आपणास मदत करतात. जर तुम्ही नोकरी करीत असला तर, मुले सांभाळण्याकरिता आपणास परिवाराची गरज भासते. आयुष्यात केव्हाही आर्थिक संकट आल्यास तर, अशावेळी प्रेमविवाह करणाऱ्या मुलींना परीवाराची खूप गरज असते. अशावेळी आपले आईवडीलच आपणास मदत करण्यास पुढे येतात. परिवाराची सर्वात मोठी गरज भासते जेव्हा लग्न घटस्फोटापर्यत येवून पोहचते तेव्हा. यावेळी आपणास आपल्या कुटूंबाचा मानसिक आधार सर्वात मोठी मदत ठरते. या घटनेची जाणीव माझ्याकडे आलेल्या एका केसवरुन आलेली आहे.

## केस स्टडी

आईवडीलांची समंती नसतांना प्रेमविवाह केल्यामुळे काय परिणाम होतात अशा प्रकारची जळगाव येथील केस माझ्याकडे आली होती. जळगांव येथे राहणाऱ्या एका मुलीने आईवडील आणि नातेवाईकांच्या विरोधामध्ये जावून दुसऱ्या जातीच्या मुलासोबत पेमविवाह केला. एक ते दोन वर्षे सर्व बरोबर चालले होते. कोरोना नंतर मुलाची नौकरी गेली. त्यानंतर तो व्यसनाधिन झाला, जुगार खेळू लागला आणि` आपल्या पत्नीला रोज मारहाण करु लागला. आज तिला पाच वर्षाची मुलगी असून तिलासुध्दा तो मारहाण करीत असे. घरी खायला काही नाही, पत्नीला कमविण्याचे काही साधन नाही. अशातच तिने मला संपर्क केला, त्यातुन नवऱ्याची व्यसनातून सुटका करावी अशी ती मला विनंती करीत होती. परंतु तो इतका आहारी गेला होता, की, त्याला त्यातून बाहेर काढणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत जेव्हा तिने आपल्या आईवडीलांना फोन केला, तेव्हा त्यांनी तिला कोणताही प्रकारची मदत सरळ नकार दिला आणि आमच्यासाठी तू मेली आहे म्हणून सरळ मदत करण्यास नकार दिला.

या संपूर्ण घटनेमुळे ती महिला कोणत्या मानसिक अवस्थेमध्ये असेल याचा विचार करा. जेव्हा मी तिच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न तेव्हा ती म्हणाली की, मला मुलीला मारून टाकून आत्महत्या कराविशी वाटते. अशा अवस्थेपर्यत तीची मानसिकता निर्माण झाली होती.

या अनुभवावरून हे लक्षात येते की कोणत्याही प्रकारच्या लग्नामध्ये मग तुम्ही प्रेमविवाह करा की अरेंज मॅरेज करा. परिवाराच्या संमतीशिवाय लग्न केल्यावर जेंव्हा अशा समस्या उद्‌भवतात त्यावेळेस मदत न मिळाल्यामुळे आपणच संकटात सापडतो.

मित्रहो, मुलींना लग्न करतांना आपल्या निर्णयामुळे परिवाराच्या संमतीशिवाय लग्न केल्यावर काय परिणाम होतील याचा आपणास अंदाज नसतो, त्यामुळे त्यांच्या हातुन चुका होत असतातच. अशावेळी आपले आईवडीलच आपल्या मदतीला धावून येतात. आपल्या समस्याच्या त्यांच्याकडेच बोलून दूर करु शकतो आणि त्यातुन मार्ग काढू शकतो.

*******

प्रकरण ७ वे

# परंपरागत विवाह व सामाजिक महत्व

*प्राचीन वैदिक काळापासून भारतात परंपरागत विवाह पद्धती आचरणात आहे. हिंदू धर्मात, विवाह हे दोन व्यक्ती किंवा आत्म्यांमधील अनंतकाळचे पवित्र नाते मानले जाते. हिंदू धर्मातील प्राचीन धर्मग्रंथ वेदांमध्ये विवाहाच्या आठ प्रकारांचे वर्णन केले आहे. आयोजित विवाहामध्ये, पालक लग्नाच्या प्रक्रियेतील प्रत्येक पैलू ठरवतात. एकदा दोन कुटूंबात विवाह मुलाचा किंवा मुलीचा विवाह करण्याचे निश्चीत झाले की, कुटुंबाचा कर्ता वधु किंवा वराचा शोध घेण्याच्या कामाला लागतात. विवाहासाठीचे काही निकष सांस्कृतिक पार्श्वभूमी, भावी मुला-मुलीची शैक्षणिक पात्रता, कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती, मुलगा आणि मुलगी यांच्या जन्मकुंडलीचे तपशील जुळवून विवाह निश्चीत करतात. अरेंज्ड मॅरेज हा एक विवाह आहे जो मूलत: होणा-या वधू-वरांच्या साधक-बाधक गोष्टींचा विचार करून निश्चित केला जातो. होय, यास थोडा वेळ लागतो. अलीकडील सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की , ज्या जोडप्यांनी परंपरागत विवाह पध्दतीने लग्न केले आहे, ते प्रेम-विवाह करणाऱ्या जोडप्यांपेक्षा जास्त आनंदी जीवन जगत आहेत. परंपरागत पध्दतीने लग्न करणाऱ्या जोडप्यांनी लग्नानंतर प्रेम विकसित केले असून ते आता त्यांच्या मुलांसह आणि कुटुंबातील इतर सदस्यांसह मनापासून आनंदाने जीवन जगत आहेत. प्रेमविवाह चांगले असतात पण जर तुम्ही आणि तुमच्या कुटुंबातील सदस्यांनी तुमचा जीवनसाथी हुशारीने निवडला तर अरेंज्ड मॅरेज अधिक चांगले होऊ शकतात हे मात्र खरे आहे.*

अरेंज मॅरेज किंवा लव्ह मॅरेज हे दोन्हीही विवाह पध्दती आपल्या आपल्या जागी योग्य आहेत. या प्रश्नाचे उत्तर व्यक्तीसापेक्ष वेगवेगळे असू शकते. भारतात मात्र अरेंज विवाहाचे फायदे सांगून त्याला अधिक प्रोत्साहन दिले जाते. एखादी व्यक्ती एकतर तो ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्याशी लग्न करतो किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी निवडलेल्या मुलांमुलीसोबत लग्न करण्यास तयार होतात. आजही भारतात सर्वाधिक विवाह अरेंज मॅरेज पध्दतीने केले जातात. कारण ही एक सर्वमान्य एक सामाजिक प्रथा आहे. आपल्या समाजातील प्रत्येक दुसरी व्यक्ती अरेंज्ड मॅरेज करण्यास सहमत असते, विशेषतः महिलांचे प्रमाण यात अधिक आहे. पालकांना वाटते की अरेंज्ड मॅरेज जास्त यशस्वी होतात. यामुळे लग्नांनंतर जी अस्वस्थता निर्माण होते, त्यातून बाहेर पडणे फार कठीण असते. तुम्ही नीट ओळखतही नसलेल्या एखाद्या व्यक्तीसोबत असणे अस्वस्थ वाटणे स्वाभाविक आहे. तथापि, कालांतराने, आपण हे नाते आणि आपल्या जोडीदारास समजू लागतो. जर तुम्ही

नुकतीच लग्नगाठ बांधली असेल किंवा गाठ बांधणार असाल तर अरेंज मॅरेजमधूनही तुम्ही प्रेमाची अनुभूती घेऊ शकता.

## अरेंज मॅरेजचे फायदे

भारतात लग्नाला आयुष्यभराचे बंधन मानले जाते. विवाह ही नवीन जीवनाची आणि कुटुंबाची सुरुवात आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीने लग्नाचा निर्णय विचारपूर्वक घ्यावा. लग्नासाठी जीवनसाथी जितका महत्त्वाचा तितकाच विवाह पद्धतीला महत्त्व आहे. लग्न हे दोन व्यक्तींमधील नाते असले तरी आयुष्यभर एकत्र राहण्यासाठी मुला-मुलीचे कुटुंब, त्यांचा समाजातील दर्जा, आवडी-निवडी, वागणूक अशा अनेक बाबींचाही विचार केला जातो. अशा परिस्थितीत लग्नाच्या दोन पद्धती आहेत. हा एक प्रेमविवाह आहे, ज्यामध्ये मुलगा आणि मुलगी स्वतःहून आपला जीवनसाथी निवडतात. त्यांना त्यांचे आयुष्य कोणासोबत घालवायचे ते ते ठरवतात. या प्रकारच्या लग्नात मुलगा आणि मुलगी एकमेकांना आधीच ओळखतात आणि समजून घेतात. पण आणखी एक मार्ग आहे, अरेंज्ड मॅरेज म्हणजेच असा विवाह ज्यामध्ये तुमचे आई-वडील किंवा कुटुंबातील सदस्य तुमच्या जीवनसाथीचा शोध घेतात. या प्रकारच्या लग्नामध्ये, लोक सहसा आपल्या जोडीदाराला आधीपासून ओळखत नाहीत किंवा लग्नापूर्वी प्रेम करत नाहीत. ही भारतातील विवाहाची एक प्राचीन पद्धत आहे, जी अजूनही बहुतेक कुटुंबांमध्ये स्वीकारली जाते. जर तुमचे पालक तुमच्यासाठी जीवनसाथी शोधत असतात.

- **कुटूंबांचा आणि नातेवाईकांचा लग्नात सहभागः** अरेंज मॅरेज हे सामाजिक परंपरा आणि विधींचे पालन आणि वडिलधाऱ्यांचा आदर करून आयोजित केले जातात. अशा प्रकाराच्या लग्नामध्ये तुमचे संपूर्ण कुटुंब आणि जवळचे लोक तुमच्या लग्नात सक्रियपणे सहभागी होतात. यामध्ये वधूवराचे पालक केवळ मुलाचीच नव्हेतर, मुलीकडील कुटुंबाची पार्श्वभूमी पाहतात. कुटुंब कसे आहे, त्यांची समाजातील स्थिती काय, त्यांची पात्रता काय, मुलाचे वडील कुठे काम करतात, त्यांचे पद काय आहे, आई कशी आहे, बहिणी आणि भाऊ काय करतात. या संपूर्ण घडामोडीमध्ये आपण एकटे नसतो तर, आपल्या लग्न जुळविण्याच्या प्रक्रियेमध्ये आपले संुपूर्ण कुटूंब  आपले नातेवाईक आपल्या सोबत असतात. यामध्ये तुम्ही तुमच्या वैवाहिक जीवनातील मौल्यवान क्षण तुमच्या जवळच्या व्यक्ती आणि नातेवाईकांसोबत आनंदाने घालवू शकता. त्यांची सदिच्छा आणि वडीलधाऱ्यांचा आशीर्वादही तुम्हाला मिळेल. भारतात, लग्न हे केवळ एक सामाजिक किंवा कायदेशीर बंधन नाही तर ते एक धार्मिक विधी आहे. हे केवळ दोन जीवांचेच नव्हे तर दोन कुटुंबांचे मिलन आहे. भारतीय विवाहसोहळे हे परंपरा, समारंभ आणि कुटुंबांचे परिपूर्ण संयोजन आहे.

- **जोडप्याला वडीलधाऱ्यांचा पाठिंबा असतो. :** जर तुम्ही तुमच्या कुटूंबाच्या मान्यतेने विवाह करीत असेल तेव्हा संपूर्ण कुटूंबाचा आयुष्यभर अखंड पाठिंबा मिळत असतो. आयुष्यातील प्रत्येक अडचणीत ते तुमच्या आणि तुमच्या जोडीदाराच्या पाठीशी आनंदाने उभे राहतात, कारण त्यांनी तुमच्या लग्नासाठी तुमचा जोडीदार स्वतः निवडलेला असतो. जरी तुम्हाला तुमच्या जोडीदारासोबत लग्नानंतरची कोणतीही समस्या भेडसावत असली तरीही ते या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करीत असतात. या परिस्थितीसाठी तुम्हाला दोष देणार नाहीत. परंतु, आईवडीलांच्या संमतीशिवाय प्रेमविवाहाच्या बाबतीत, लग्नानंतरच्या कोणत्याही समस्यांमध्ये वडील तुम्हाला पूर्णपणे साथ देत नाहीत. तुमच्या जोडीदाराच्या निवडीबद्दल ते तुम्हाला दोष देऊ शकतात, खासकरून जर तुम्ही आईवडीलांच्या संमतीशिवाय लग्न केले असेल.
- **सामाजिक अनुकूलता:** अरेज मॅरेजमध्ये नेहमी समाजामध्ये किंवा जातीमध्येच केले जाते. अशा प्रकारच्या लग्नामध्ये तुम्ही केवळ तुमच्या जोडीदाराशी लग्न करत नाही, तर तुम्ही त्याच्या किंवा तिच्या संपूर्ण कुटुंबाशी लग्न करता. तुमचे पालक संभाव्य जोडीदाराची सामाजिक पार्श्वभूमी, शैक्षणिक पात्रता, सामाजिक स्थिती आणि नवीन कुटुंबात तुम्ही किती चांगले जुळवून घेऊ शकाल याकडे लक्ष देतात, ज्यामुळे तुमचे वैवाहिक जीवन अधिक आनंदी बनण्यास मदत होते. यामुळे अशा प्रकारच्या लग्नाला संपूर्ण समाजाची मान्यता असते.
- **जोडीदार निवडण्यासाठी अनेक पर्याय असतात:** जेव्हा अरेंज मॅरेज करता यामध्ये जोडीदार निवडीकरीता एकापेक्षा अधिक कुटंब तुमच्याकडे पर्याय घेवून येतात. यामध्ये मुलांस किंवा मुलीस आपले जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. जर लग्नाकरिता आलेला उमेदवार पसंत नसेल तर, विवाहास नकार देण्याचा पर्याय दोघांकडे उपलब्ध असतो. जेव्हा दोघांचीही एकमेकाच्या निवडीला संमती असेल तेव्हाच कटूंबाील कर्ते पुरुष लग्न जुळविण्याच्या पुढील प्रक्रियेला प्राधान्य देतात.
- **परीपूर्ण जोडीदार निवडण्यास प्राधान्य :** प्रेमामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या मनाचे नव्हे तर हृदयाचे अनुकरण करीत असते. त्यामुळे, जेव्हा तो आपला जीवनसाथी निवडतो तेव्हा तो व्यावहारिक असेलच असे सांगता येत नाही. जरी ते प्रेमाच्या आराखड्यामध्ये जोडीदार योग्य असला तरी तो, संसार करतांना आयुष्यातील समस्या सोडविण्याकरिता योग्य असेलच असे सांगता येत नाही. प्रेमाध्ये त्याच्यात लपलेल्या चांगल्या वाईट गुणांची पर्वा न करता, आपण जोडीदारावर प्रेम करतो त्याच्याशीच लग्न करण्याचा दृढनिश्चय करतो. अरेंज्ड मॅरेज जुळविणारे सर्व लोक अनुभवी आणि आयुष्याबाबत अतिशय व्यवहारी असतात आणि त्यामुळे ते आपल्या अनुभावाच्या आधारे नातेवाईकाकाडे चौकशी

करुन मुलगा  किंवा मुलीची निवड करतात आणि अंतिम मान्यता देतात. एक परिपूर्ण व्यक्तीची निवड केल्याची खात्री पटल्यानंतरच ते लग्नासाठी पुढे जातात आणि तेही त्यांच्या कुटुंबातील ज्येष्ठांच्या आशीर्वादानेच घडून येते. त्यामुळे त्यांच्या वैवाहिक जीवनात अपयश येण्याची शक्यता फारच कमी असते.

- **अहंकाराचे कार्य कमी असते:**अरेंज्ड मॅरेज करणारी जोडपी एकमेकांची प्रत्येक गोष्ट जाणून घेऊनच एकमेकांची निवड करतात. त्यांना त्यांच्या जोडीदाराच्या अपेक्षा त्यांना माहिती असतात.  त्यामुळे साधारणपणे अरेंज्ड मॅरेजमध्ये अहंकार कमी दिसतो. परंतु, प्रेम अनियोजित असल्यामुळे, जोडप्यांना त्यांच्या विवाहापूर्वी एकमेकांच्या प्रत्येक तपशीलाचा अभ्यास केला जाऊ शकत नाही आणि नंतर त्यांना त्रास होऊ शकतो कारण कधीकधी त्यांच्या नात्यात अहंकार येतो. त्यामुळे त्यांच्या वैवाहिक जीवनावर परिणाम होऊ शकतो.

- **कौटुंबिक जबाबदारी:** अरेंज्ड मॅरेज म्हणजे वधू-वर, दोन्ही पक्षांचे कुटुंब आणि समाज यांच्या संमतीने केलेला विवाह. अशा परिस्थितीत, अरेंज्ड मॅरेजचा एक फायदा असा आहे की तो समाजाने स्वीकारला असतो आणि लग्नाची संपूर्ण जबाबदारी पालकांवर आहे. लग्नानंतर कोणत्याही प्रकारची अडचण आली तर संपूर्ण कुटुंब वधू किंवा वराच्या खांद्याला खांदा लावून उभे असते.

- **कुटुंबांचे समन्वय:**कुटुंबातील सदस्य स्वतः आपल्या मुलासाठी किंवा मुलीसाठी जीवनसाथी शोधतात. या लग्नाला त्यांची संमती आहे. अशा परिस्थितीत दोन्ही कुटुंबांमध्ये चांगली समज आणि बंध निर्माण होतात. प्रेमविवाहामध्ये दोन कुटुंबांमध्ये सामंजस्य राखणे हे अरेंज्ड मॅरेजच्या तुलनेत अवघड काम आहे.

- **जीवनसाथी शोधण्यापासून दिलासा :** पूर्वीच्या काळात लग्नाआधी मुला-मुलींची ओळख होत नव्हती किंवा त्यांची संमतीही विचारली जात नव्हती, पण आता काळ बदलला आहे. अरेंज्ड मॅरेजमध्येही वधू-वरांची पसंती विचारली जाते आणि त्यांना लग्नापूर्वी भेटण्याची संधी मिळते. अशा परिस्थितीत, तुम्हाला स्वतःसाठी जीवनसाथी शोधण्याची चिंता करण्याची गरज नाही. कुटुंबातील सदस्य तुमच्यासाठी जीवनसाथी शोधतात आणि तुम्हाला तुमच्या आवडी-निवडीबद्दल त्यांना सांगावे लागेल.

- **बाल संगोपनास मदत :**अरेंज मॅरेजमध्ये जन्माला येणाऱ्या बाळाची काळजी घरातील वडीलधाऱ्यांच्या देखरेखीखाली असते. या प्रकारच्या लग्नात मुलांना आजी-आजोबांचे प्रेम मिळते. अशा परिस्थितीत मुले चांगल्या वातावरणात वाढतात आणि त्यांना चांगले संस्कार मिळतात. प्रेमविवाहात कुटुंबातील वडीलधाऱ्यांची साथ न मिळण्याची शक्यता असते.

- **वैवाहिक जीवनावर कुटुंबाचा प्रभावः** अनेकदा अशा विवाहांमध्ये दोन्ही पक्षांच्या कुटुंबांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. विवाहित जोडप्यांमध्ये मतभेद देखील असू शकतात. अशा परिस्थितीत, अशा वियोगाचा परिणाम दोघांच्या कुटुंबावर आणि दाम्पत्याच्या वैवाहिक जीवनावर होतो.

आजही भारतीय समाजात अरेंज्ड मॅरेजवर विश्वास आहे. भारतात ९० टक्के विवाह हे अरेंज्ड मॅरेजद्वारे होतात. जरी देश पुरोगामी बनला असला तरी लोक अजूनही अरेंज्ड मॅरेजवर विश्वास ठेवतात. आपल्या आवडीनुसार लग्न करण्याकरिता भारतात अनेक मोठ्या वैवाहिक वेबसाइट कार्यरत आहेत. अनेक अभ्यासातून मिळालेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारत आणि इतर अनेक देशांमध्ये अरेंज्ड मॅरेज यशस्वी आहेत. पालकांची नेहमीच आपल्या मुलांमुलीसाठी सर्वोत्तम जोडीदार निवडण्याची इच्छा असते आणि यासाठी ते कोणतीही कसर सोडू इच्छित नाहीत. अरेंज्ड मॅरेजमध्ये आई-वडिल आ(णि नातेवाईकांचा सहभाग असल्यामुळे भविष्यात वैवाहिक जीवनात काही समस्या आल्यास तर, पालक आणि नातेवाईक त्या समस्या सोडविण्याकरिता पुढाकार घेतात. यासोबतच पालकांकडून आर्थिक बळही मिळते, कारण तुम्ही त्यांच्या इच्छेनुसार लग्न केले असते.

### कोणता विवाह प्रकार योग्य लव्ह मॅरेज आणि अरेंज मॅरेज

लव्ह मॅरेज आणि अरेंज मॅरेज या दोन्हींचे स्वतःचे फायदे आणि तोटे आहेत. परंतु, जसे प्रेम भावनिक असते आणि अरेंज मॅरेज हे व्यावहारिक आणि दुरगामी टिकणारे असते. प्रेमविवाह हे कोणत्याही प्रकारे यशस्वी विवाहाचे प्रमाणपत्र नाही. एखाद्या अरेंज मॅरेजप्रमाणेच यामध्ये सुध्दा अनेक आव्हानेही येतात. एकमेकांवर प्रेम करणाऱ्या आणिलग्न करणाऱ्या जोडप्यांना सुध्दा खऱ्या आयुष्यामध्ये स्वतःचा संघर्ष असतो. लग्न ही आयुष्यभराची बांधिलकी असते. मग ते प्रेम असो वा अरेंज, कोणतेही लग्न म्हणजे जोपर्यंत परस्परावर प्रेम, विश्वास आणि एकमेकाबद्दल आदर एकत्र मिसळत नाहीत तोपर्यंत कोणताही विवाह यशस्वी होत नाही. जेव्हा तुमचे नाते काळाच्या कसोटीवर टिकते तेव्हाच विवाह यशस्वी झाल्याचे प्रमाणपत्र मिळते. अरेंज मॅरेजमध्ये वैवाहिक नाते हळूहळू उलगडण्याची किमया आहे.

अनेकदा अनोळखी असणे हे फायद्याचे ठरते. तुम्हाला तुमचं लग्न कसे व्हायला पाहीजे हा तुमचा प्रश्न आहे. प्रेमळ जोडीदार मिळणे, त्याने लग्नाची मागणी घालावी अशी अपेक्षा करणे आणि त्याला तुमच्या कुटुंबीयांनी परवानगी देणे आणि परीकथेप्रमाणे सर्व काही सुखरूप पार पडणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. पण, खऱ्या आयुष्यामध्ये हेच घडेल असे सांगता येत नाही, कधीतरी तुम्ही अपेक्षित न केलेल्या गोष्टी सुध्दा तुमच्या आयुष्यात घडतात आणि तुम्हाला त्या आईवडिलांकरिता आणि झालेल्या मुलांकरिता निभावून न्याव्या लागतात, अन यालाच सुनहरा संसार

म्हणतात. परंतु, जर तुमचा प्रेमविवाह झाला नाहीतर, तुम्ही अरेंज मॅरेजलाही प्रेमविवाहामध्ये बदलू शकता हे तुमच्या दोघांवर अवलंबून असते. त्याकरिता तुम्हा दोघांनाही एकमेकांना समजावून घ्यावे लागेल.

- **एकामेकाच्या प्रेमात पडा:** लव्ह मॅरेजप्रमाणे तुम्ही एकमेकांना वर्षानुवर्षं ओळखत नसालही; पण एकदा का ही लग्नाची गाठ बांधली गेली, की अरेंज्ड मॅरेजनंतर तुम्ही तुमच्या जोडीदाराला हळूहळू ओळखायला लागता, समजून घेता आणि या सगळ्यामध्ये तुम्ही त्या व्यक्तीच्या प्रेमात पडता. हे केवळ शारीरिक आकर्षण किंवा लव्ह ॲट फर्स्ट साइट नसते, तर तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या विचित्र सवयी, चांगले-वाईट गुण, स्वभावातील काही वैशिष्ट्यं हे सर्व जाणून घेता आणि तरीही त्याला किंवा तिला आहे तसं स्वीकारण्याची ताकद तुमच्या प्रेमात निर्माण होते.
- **दिल को देखा :** सौंदर्य हे तुम्हाला अनेक महिने गुंतवून ठेवेल; पण सुंदर हृदय आणि निखळ मन हे तुमचं लग्न जसा काळ पुढे सरकेल तसतसे ते अधिकाधिक मजबूत होत जाते. सुंदर चेहरा, शरीरयष्टी, मोहक व्यक्तिमत्त्व यांना पाहून जोडीदार निवडण्यात काहीच चूक नाही; पण जोडीदार निवडण्यासाठी त्याही पलीकडे जाऊन व्यक्तीचा स्वभाव व प्रेम करण्याची क्षमता बघायला हवे. सौंदर्य काय, काही काळाकरिताचच असते; पण मन तरुण तसंच उतारवयातही कायम राहते हे नक्की आणि त्यावर तर संपूर्ण वैवाहिक आयुष्य तग धरून राहते.
- **आई-बाबांचे विचार महत्वाचे :** कितीही अमान्य केले, तरी तुमच्या पालकांना आयुष्य आणि यशस्वी लग्न याचा तुमच्यापेक्षा जास्त अनुभव असतो. ज्या पायरीवर तुम्ही आत्ता पाऊल टाकू पाहताय, त्या पायऱ्या चढून ते तुमच्याआधी गेले आहेत आणि त्यामुळे या प्रवासात कुठे ठेच लागेल, ते त्यांना नक्कीच चांगले माहीत असते. त्यामुळेच तुमच्यासाठी काय उत्तम हे त्यांना कळते, हे स्वीकारायला हवं. ते कायम तुमच्या भल्याचा विचार करतात आणि त्यामुळे ते योग्य तेच मार्गदर्शन करतील, यावर विश्वास ठेवा.
- **प्रेम ही आहे जबाबदारी:** एकदा लग्न झाल्यावर मग पुन्हा मागे वळून पाहणे कुणालाही शक्य नाही.कारण आयुष्याला रिव्हर्स गेअर नाही. एकमेकांच्या सुख-दुःखात एकमेकाला साभांळणे ही एकमेकांची जबाबदारी आहे. हे एकमेकांच्या रोज नव्यानं प्रेमात पडण्याचे एक अव्यक्त वचन असते. तुम्हाला भेटून अगदी काहीच महिने झाले असतील, तरी त्या व्यक्तीला आहे तसे स्वीकारून त्याच्यावर प्रेम करायला तुम्ही अरेंज्ड मॅरेजमध्ये शिकता.
- **संसारातील रोमँटिकपणा टिकविणे आपली जबाबदारी:** अरेंज्ड मॅरेजचा 'रोमान्स' हा शब्दात व्यक्त करता येणार नाही. तुम्हाला तुमच्या जोडीदाराबद्दल

रोज नवीन गोष्ट कळत असते आणि त्यामुळे या नात्यातील नावीन्य टिकून राहते. तुम्ही एकमेकांसाठी आधी फक्त दोन अनोळखी व्यक्ती असता, मग हळूहळू तुमची मैत्री वाढते आणि मग तुम्ही रोज नव्यानं एकमेकांच्या प्रेमात पडता. हा पूर्ण प्रवासच तुमच्यासाठी परीकथा नाही का?

- **घरोघरी मातीच्या चुली:** तुम्ही लव्ह मॅरेज करा किंवा अरेंज्ड मॅरेज, जोडीदारासह आणि जोडीदारासाठी छोट्या-मोठ्या तडजोडी करणे कुणालाही चुकत नाही. तसेच तुम्हाला तुमच्या जोडीदारासोबतच त्याच्या कुटुंबियांसोबत जमवून घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी असते. शेवटी यशस्वी लग्न म्हणजे तरी काय? चांगल्या-वाईट दिवसांत, ऊन-सावलीमध्ये तुमच्या जोडीदाराची साथ न सोडणे आणि त्याच्यावर बिनशर्त प्रेम करणे, याला यशस्वी लग्न म्हणता येऊ शकते.

- **कोणतेही लग्न परिपूर्ण नसते:** जेव्हा आपण परिपूर्ण नसतो, आपला जोडीदारही परिपूर्ण नसतो. तेव्हा कोणत्याही कारणाशिवाय परिपूर्ण विवाहाची कृत्रिम अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे? जोडपे प्रेमविवाहात जितके भांडतात तितकेच अरेंज मॅरेज जोडप्यांमध्ये सुध्दा भांडणे होतात. परंतु, भांडणानंतरही आपला संसार टिकवून ठेवण्यामध्ये जिवनाची सार्थकता आहे. दोन विरोधी विचाराचे व्यक्ती जवळ आल्यास तर, वादविवाद होणार परंतू, हा वादविवाद मनाच्या खोलीवर न नेता एकमेकांच्या विचाराचा आदर करणे हेच सूखी जिवनाचे सूत्र आहे. ही एक प्रक्रिया आहे आणि हेच सुखी नात्याचे सौंदर्य आहे.

- **प्रेमविवाह देखील तुटतात :** असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही की अरेंज मॅरेजच्या तुलनेत लव्ह मॅरेज अधिक सुसंगत आणि यशस्वी असतात असा विश्वास आपल्या सर्वांनाच आहे. जरी, काही प्रमाणात, हे देखील खरे आहे, परंतु, जर खरोखरच असे होते, तर प्रेमविवाहात जोडपी का विभक्त झाली असती? जरी ते एकमेकांना तुलनेने बऱ्याच काळापासून ओळखत असले तरी ते वेगळे झाले आहेत. त्यामुळे प्रेमविवाहांमध्येही चढ-उतार असतात हे समजून घ्या. प्रेमविवाह हा कोणत्याही प्रकारे दीर्घकालीन, यशस्वी विवाहाची हमी नाही.

## अरेंज मॅरजचे लव्ह मॅरजमध्ये रुपांतर करा

आपण नेहमीच ऐकतो लव्ह मॅरिजपेक्षा अरेंज मॅरेज जास्त टिकतात आणि ते एकमेकांसोबत अधिक चांगल्या प्रकारे जुळवून घेऊ शकतात. पण, आजच्या काळात लोक फक्त ओळखीच्या किंवा प्रेमाच्या व्यक्तीशीच लग्न करण्याला अर्थात लव्ह मॅरेजला जास्त प्राधान्य देत आहेत. त्यामुळे हा प्रश्न कायम मनात राहतो की, लव्ह मॅरेज करायचे की, अरेंज. तुम्हीही जर लग्नाचा विचार करत असाल आणि तुम्हीही या विचारात अडकले असाल तर यामध्ये बदल करण्याची क्षमता केवळ तुमच्यामध्येच असते.

- **एकमेकांना समजूत घेणे :** जेव्हा दोन अनोळखवी व्यक्ती लग्न करतात तेव्हा त्यांना आधीच माहित असते की, ते एकमेकांना ओळखवत नाही. त्यामुळे ते एकमेकांना समजून घेण्याकरिता पुढाकार घेतात आणि कालांतराने दोघांचेही नाते सक्षम होऊ लागते. नाते सक्षम व्हायला आणि एकमेकांना समजून घ्यायला वेळ लागेल हे दोघानांही ठाऊक असते.
- **मित्रासारखे आयुष्य जगा :** अरेंज मॅरेजमध्ये एकमेकांना समजून घेण्याची संधी मिळते कारण ते एकमेकांना आधीपासून ओळखवत नाही. त्यामुळे लग्नानंतरचे पहिले काही महिने एकमेकांना ओळखवायला, एकमेकांना समजावून घ्यायला वेळ देतात. अशाने त्यांच्यातील बाँडिंग वाढते. दोघांमध्ये चांगली मैत्री निर्माण होते आणि हीच मैत्री नाते मजबूत आणि टिकवून ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते.
- **येणाऱ्या जबाबदाऱ्या समजून घ्या :** जेव्हा लोक अरेंज मॅरेज करतात तेव्हा दोघांनाही माहित असते की, आता त्यांची जबाबदारी वाढणार आहे. कारण एक मुलगी घर सोडून येणार आहे आणि तिच्या परीने सासरच्यांना आपलेसे करणार आहे तर मुलाला हे ठाऊक असते की, तिची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर आहे. त्यामुळे अरेंज मॅरेजमध्ये एकमेकांच्या जबाबदाऱ्या समजून घेणे हाच खऱ्या जिवनातील शहाणपणा असतो.
- **प्रेम देऊनच ते वाढते :** प्रेम ही एक भावना आहे. जी माणसांची काळजी घेतल्याने निर्माण होते. अनेक जणांचा असा समज असतो की, अरेंज मॅरेजमध्ये प्रेम नसते. पण हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. अरेंज मॅरेजमधील नात्यात एकमेकांची काळजी करूनच सुरवात केली जाते आणि हळूहळू ते एकमेकांवर प्रेम करू लागतात. लव्ह मॅरेजच्या तुलनेत जुळवून आणलेल्या अर्थात अरेंज मॅरेजमध्ये करणाऱ्या जोडप्यामध्ये मजबूत नाते आणि प्रेम दिसून येते.

*******

प्रकरण ८ वे

# लग्न जुळवतांना घ्यावयाची काळजी

*लग्न अथवा विवाह हे एक सामाजिक बंधन आहे. भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंब व्यवस्था टिकवण्यामध्ये विवाह संस्थेची महत्वाची भूमिका आहे. अनेक धर्मात हा एक विधी, संस्कार, करार या स्वरूपात पाहिला जातो. विवाहात फक्त एका स्त्री आणि पुरुषाचा संबंध जोडला जात नसून त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबाचा आणि नातलगांचे देखील संबंध जोडले जात असल्याने विवाहाला एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. असे जरी असले तरी विवाह जमणे आणि तो टिकवणे एक तारेवरची कसरत आहे. पूर्वी अल्पवयातच लग्न करण्यात येत असे. लग्न जुळविण्यामध्ये आणि पुर्ण करण्यामध्ये वडीलधाऱ्यांची मुख्य भूमिका असायची. लग्नाची जन्मगाठ स्वर्गातच बांधली गेली आहे. असे मानून त्या काळातील मुले आणि मुली निमूटपणे लग्न मान्य करीत असे. लग्नापूर्वी मुलामुलींना एकमेकांना भेटायला व बोलायलाच काय पण पाहायलाही मिळायचे नाही. लग्न-विधीतसुध्दा एकमेकांशी बोलण्याची मुभा नसायची, पण पाहायला मात्र मिळायचे एवढेच एक समाधान असायचे. दोन कुटुंबांचे पूर्वापर चालत असलेले संबंध असल्याने अल्पवयातच विवाहाची तोंडी बोलणी व्हायची. मात्र, दिवसेंदिवस काळ बदलत आहे. समाजात चौकसपणा वाढला, माणसे पुर्वीपेक्षा अधिक ज्ञानी झाली, मुले आणि मुली उच्च शिक्षीत झाल्यामुळे अपेक्षा सुध्दा वाढल्या आहेत. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे जागतिक स्तरावर करिअरच्या संधी वाढल्या आहेत. आजच्या युगात आणि करिअरचा विचार करून उत्पन्नाचा, शिक्षणाचा विचार करून विवाह ठरायला लागले आहेत. करिअरचे जागतिकीकरण झाल्यामुळे विवाहाचे क्षेत्र सुध्दा विस्तारले आहे. बदलत्या काळानुसार लग्न प्रक्रियेमध्ये फसवेगिरी, मर्यादेबाहेर वाढलेल्या अपेक्षेमुळे अनेक मुला-मुलींचे वय वाढत चालले आहे. अनेक मुला-मुलीचे रूपांतर प्रौढात होत आहे. यामुळे आजच्या काळात लग्न जुळविणे ही एक सामाजिक समस्या निर्माण झाली आहे.*

विवाह हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक कसोटीचा व अत्यानंदाचा अनुभव असतो. विवाह जुळविणे आण तो यशस्वी करणे ही एक कसोटी आहे. सावधानपणे व काळजीपूर्वक निर्णय घेतल्यास तर, दोन्ही पक्ष सुखी होवू शकतात. यामध्ये एक जरी निर्णय चुकीचा झाला तर, तर त्यांचा आयुष्यभर पश्चात्ताप करीत बसावे लागते. विवाह जुळवितांना दोन्ही बाजूंच्या कुटूंबानी योग्य वर आणि वधूची निवड केली तरच यश पदरी पडते. अन्यथा ते लग्न घटस्फोटापर्यंत येऊन ठेपते. जोडीदाराची जात, धर्म, पंथ, प्रांत, देश इत्यादीबाबत पूर्वी पाळली जाणारी बंधने आता आवश्यक

राहिलेली नाहीत. मनाला वाटले व पटले ते करून टाकले असा जमाना आला आहे. सध्याच्या काळात लग्न जुळविण्याच्या संबंधात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

## मुलामुलींच्या वाढत्या अपेक्षा

- आता मात्र परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. लग्न जुळविण्याचे सुकाणू पालकांच्या हातात न राहता मुलामुलींच्या हातात गेले आहे. जर एखादे स्थळ पालकांना पसंत असेल तर, मुलांना पसंत असेलच असे सांगता येत नाही. या कारणांमुळे प्रत्येकांच्या अपेक्षा आणि निवड यामध्ये पालक संकटात आहेत. अपेक्षाची पूर्ती करतांना वय वाढत जाते. वय वाढल्यामुळे उशिरा लग्ने जुळतात व लागतात. त्यात वडीलधाऱ्यांची मर्जी संपादित केली जातेच असे नाही.
- आपल्या जोडीदाराबद्दल प्रत्येकाच्या व प्रत्येकीच्या आपल्या स्वतःच्या अशा अपेक्षा असतात. त्या वास्तवाला धरून असतातच असे नाही. बदलत्या काळानुसार लग्नाकरिता बोहल्यावर चढणाऱ्या तरुण आणि तरुणींनी आपली तेवढी पात्रता नसताना ही अवास्तव अपेक्षा बाळगण्यास सुरवात केली आहे. मी कसाही असलो वा कशीही असले, तरी माझा जोडीदार/ जोडीदारीण सर्वोत्तम, सर्वोत्कृष्ट, अतुलनीयच असायला हवा/हवी, अशीच अपेक्षा असते. आपल्या पाल्याच्या अपेक्षापूर्तीसाठी पालकांनी किती स्थळे पाहायची व किती जोडे-चपला झिजवायच्या याचे काहींना भानच राहीले नाही. अपेक्षाचा शोध घेता वर्षे उलटून जातात आणि त्यातच वय नको तितके वाढत जाऊन रखडत बसायचीही पाळी येते.
- अपेक्षित असलेले एवढे सर्व गुण एकवटलेला तरुण किंवा तरुणी सापडणे कठीणच असते. अशा वेळी तारताम्य बाळगून आपले स्वतःचे रंग, रूप, वय, शिक्षण, कर्तबगारी, कुल-शील घराणे, स्वभाव, गुणसंपन्नता, निर्व्यसनता इ. बाबी लक्षात घेवून आपली अनुरूपता शोधावी. अवास्तवतेला सोडचिठ्ठी देऊन वास्तवतेच्या आधारावरच आपल्या जोडीदाराची निवड करावी. हे सत्य असले तरी त्यांच्या मनाची तयारी होत नसल्यामुळे लग्न जुळण्याचा प्रश्न पुढे ढकलत जातो.

## पालकांच्या अवास्तव अपेक्षा

- मुलीच्या वडिलांच्या डोक्यात नेमके काय चालू आहे याचा ठाव लागत नाही. अनेक लग्न संबंध जमवताना मुली-मुलांबरोबरच दिसण्याची तुलना करतात, अनेकदा पगाराची तुलना करतात, शिक्षणाची तुलना करतात आणि चांगल्या मुलांना नकार देतात. वास्तविक विवाह झाल्यानंतर त्यांचा एक परिवार तयार होणार आहे, एकमेकांना समजून घेणारा, मान आणि मन राखणारा, सुख-दुख

साथ देणारा आणि निर्व्यसनी साथीदार शोधण्याऐवजी आपल्या मुलीला आयुष्यभर खर्चाकरिता पैसा उपलब्ध होणारे एटीएम हवे असते.

- शिक्षण पूर्ण झाल्यावर आणि वर्ष-दोन वर्षांपूर्वी नोकरीला लागलेल्या मुलांकडे गाडी, बंगला, बँक बॅलन्स कुठून येणार? याचाही विचार झाला पाहिजेत. आपल्या वडिलांनी कसे दिवस काढलेत त्यांचे घर, गाडीचे स्वप्न कधी पूर्ण झाले याचा अभ्यास मुलींनी देखील करायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या मुलांना मुलींचे वडील सपशेल नाकारतात. मात्र, नोकरीवाल्या मुलाला घरी शेती आहे का? असा प्रश्नही विचारतात आणि कळस म्हणजे यांची मुलगी शेती काम करणार नाही हे अगोदरच सांगितलेले असते.

- अनेकांचे पगार लग्नानंतर वाढतात. घर, गाडी, बंगला या बाबी होण्यास वेळ लागतो, त्याला वेळच द्यावा लागतो. मुलगा निर्व्यसनी, शुद्ध चरित्राचा सुस्वभावी आहे का? याबाबत अधिक चर्चा आणि चौकशी करणे अपेक्षित आहे. चांगल्या पगाराची नोकरीवाल्याचा शोध घेण्यापेक्षा एखादा व्यावसायिक चांगले पैसे कमवत असेल तर त्याचा देखील विचार झाला पाहिजे.

## लग्न न जुळल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

- भारतीय समाजात लग्नाला अजूनही प्रचंड महत्त्व आहे. मुलाचे किंवा मुलीचे लग्न न झाल्यास किंवा लग्नाला उशीर होत असल्यास लग्नाचा मुलगा/मुलगी, आई-वडिल हे मानसिकदृष्ट्या हताश होतात.

- अशा अवस्थेमध्ये रिकामटेकडे लोक, नातेवाईक आणि शेजारी प्रश्न विचारून मुलींच्या आईवडीलांना हैराण करतात.

## लग्न जुळवितांना होणारी फसवणूक व संबंधित धोके

सध्याच्या काळात संयुक्त कुटूंबपध्द्ती ऐवजी केंद्रीकृत कुटूंबपध्दतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नोकरी निमित्ताने गावातील कुटूंब शहरामध्ये आणि शहरातील कुटूंब राज्याबाहेर आणि देशाबाहेर पोहचले आहे. त्यांमुळे नातेवाईकांच्या माध्यमातून लग्न जुळविण्याचा प्रकार हल्ली मागे पडला असून त्याची जागा वर्तमानपत्रात छोट्या जाहिरातीं, लग्न जुळविणाऱ्या संस्था आणि वेबसाईटने घेतली आहे. अशा प्रकारच्या लग्न जुळविण्याच्या प्रक्रियेमध्ये फसवेगिरीचे धोके मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. मेट्रोमोनिअल वेबसाईडवरुन लग्न जुळविण्याच्या प्रक्रियेत कितीही खात्री करून घेतली असली तरी सर्वच माहिती कळलेली असते असे नाही, यामध्ये कितीतरी माहिती लपवलेली असते. अशा ठिकाणी चौकशी करण्याकरिता ओळखीचे वा नात्याचे जवळपास कोणी नसेल तर, हा धोका कैक पटीने वाढतो. मोठ्या पगाराच्या अमिशाखाली परदेशामध्ये असलेल्या मुलासोबत लग्न

जुळविण्याचा निर्णय घेतल्यास तर, हा धोका मोठ्या प्रमाणात असतो. अशा वेळी लग्न जुळविण्याचा निर्णय घेतांना खूपच काळजी घेणे आवश्यक आहे. आजवर अनेक भारतीय स्त्रियांना परदेशस्थ भारतीयांशी लग्न केल्यावर त्यांना गंभीर समस्या/ अडचणी/ सहन कराव्या लागल्या आहेत. या समस्यांची यादी खूप मोठी आहे.

- लग्नानंतर पती हनीमून उरकून परदेशी रवाना होतो, पत्नीला तिकिट पाठवितो म्हणून सांगतो. प्रत्यक्षात तसे काहीच होत नाही. अनेकदा पत्नी गर्भवती असेल तर हा प्रश्न आणखी बिकट होतो.
- लग्नानंतर पत्नी पतीसमवेत परदेशी जाते, परंतु तिथे तिच्या वाट्याला छळवणूक, हिंसा, मारहाण, कोंडून ठेवणे, उपासमार इत्यादी अनेक दुष्कृत्याला मुलीस सामोरे जावे लागते.
- पत्नीच्या माहेरच्यांकडून हुंडा किंवा तत्सम रक्कम वसूल करण्यासाठी तिला तिच्या मर्जीविरुध्द परदेशात पती वा पतीच्या नातेवाईकांतर्फे ओलीस धरले जाते/ डांबून ठेवले जाते.
- पत्नी पतीच्या घरी सासरी पोहोचते तेव्हा तो तिथे त्याच्या मैत्रिणीबरोबर / जोडीदाराबरोबर राहत आहे असे लक्षात येते. त्याने केवळ आपल्या आईवडिलांच्या म्हणण्याखातर हे लग्न केलेले असते. अशा परिस्थितीत जर पत्नीकडे स्वतःचे आर्थिक स्रोत नसतील व ती पतीवर अवलंबून असेल तर पत्नीपुढे असलेले ते महासंकटच ठरते. तिथे जर तिला काही कायदेशीर मदत/ आधार नसेल, कोणाची ओळख नसेल तर, संकट आणखी वाढते
- कित्येक वेळा लग्नाचे वेळी मुलगा मुलीच्या आईवडिलांना त्याची नोकरी, पगार, लग्नाविषयीचे त्याचे स्टेटस, मालमत्ता यांविषयी खोटी माहिती देतो. त्यामुळे मुलीकडील लोकांची फसवणूक झालेल्याही अनेक केसेस आहेत.
- लग्नानंतर पती परदेशी जातो. पत्नी नंतर जाते. तिथे तिला एअरपोर्टवर आणायला कोणीच आलेले नसते. नवऱ्याने दिलेला पत्ता/ फोन इत्यादी सर्व खोटे असते किंवा तो गायब झालेला असतो. काही केसेसमध्ये पती पत्नीचे सर्व सामान - तिची कागदपत्रे, कपडे, दागदागिन्यांसह ताब्यात घेतो व गायब होतो असेही घडलेले आहे.

या सर्व प्रकारामध्ये मुलांपेक्षा मुलीकडील पक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते आणि त्यांना मनस्ताप सहन करावा लागतो. आर्थिक नुकसान होते ते वेगळेच. या गोष्टी केवळ परदेशामध्येच घडतात असे नाही तर, अशाप्रकारच्या गोष्टी आपल्या देशातही घडल्याची उदाहरणे आहे. त्यामुळे लग्न जुळवितांना दोन्ही पक्षांची काळजी घेणे आवश्यक आहे.

## वधू / वधूच्या कुटुंबियांनी कोणती काळजी घ्यावी

- वर/ वधूच्या कुटूंबियानी लग्न जुळविण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यापूर्वी दोघांचीही आर्थिक स्थिती वैवाहिक स्थिती (अविवाहित/ घटस्फोटित/ विधुर / विभक्त इ.), नोकरीचे तपशील, शिक्षण, पगार, ऑफिसचा पत्ता, कोणत्या कंपनीत नोकरी, त्या कंपनीची स्थिती, इमिग्रेशन स्टेटस, व्हिसाचे तपशील, त्या देशात लग्नाचा जोडीदार नेण्याची परवानगी आहे / नाही इत्यादी माहीती मिळविणे आवश्यक आहे.

- लग्नेच्छुक मुलामुलींना परस्परांना भेटून मोकळेपणाने बोलण्याची, वावरण्याची संधी द्यावी, जेणेकरून भविष्यात प्रश्न टळू शकतात आणि त्यांच्यातील खोटेपणा त्यांच्या बोलण्यातून माहिती मिळविणे शक्य होईल. किमान एकमेकांना त्यांचे स्वभाव पूरक आहेत का यांची माहिती मिळू शकेल.

- भारतात धार्मिक लग्न विधींबरोबरच ते रजिस्टर्ड करण्याची खबरदारी घ्यावी आणि  लग्नाचे फोटोग्राफ्स, चित्रफिती भविष्याकरिता पुरावा म्हणून आपल्याकडे असू द्याव्यात.

- मुलगी ज्या देशात वधू म्हणून रवाना होत असेल त्या देशाचे कायदे, खास करून कौटुंबिक अत्याचाराविरुध्द चे कायदे असतील त्यांच्याबद्दल तिला माहिती असावी. जर अशा अत्याचाराला तिला तोंड द्यावे लागले तर तिला तिथे कोणत्या प्रकारची सुरक्षा /सुविधा मिळू शकते यांसंबधीची माहिती तज्ञाकडून मिळवावी. जेणेकरुन भविष्यात अडचणी निर्माण होणार नाही.

- जर वधू ला असा अत्याचार (शारीरिक/ मानसिक/ वाचिक/ भावनिक/ आर्थिक/ लैंगिक) सहन करावा लागत असेल तर तिने त्याविषयी तिच्या विश्वासातील लोकांना सांगितलेच पाहिजे.

- परदेशी राहणाऱ्या नवविवाहितेने नवऱ्याचे मित्र, शेजारी, नातेवाईक,  पोलिस, भारतीय दूतावासाचे संपर्क तपशील स्वतःजवळ ठेवावेत.. निर्णय घेण्यापुर्वी स्वत:चे सर्वबाजुंनी समाधान करुन घ्या. विषेशतः मुलांचे नातेवाईक, जवळची माणसे यांचे तपशील स्वत:कडे ठेवा.

- तुमच्या सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांच्या (व्हिसा, पासपोर्ट, बँक कागदपत्रे, मालमत्तेची कागदपत्रे, लग्नाचे सर्टिफिकेट, इतर कागदपत्रे) छायांकित प्रती भारतात/ तुमच्या विश्वासाच्या माणसांकडे/ नात्यात ठेवून द्या. या सर्व कागदपत्रांची सॉफ्ट कॉपीही तुमच्याजवळ / तुमच्या विश्वासू व्यक्तीजवळ असू द्यावी.

- तुमच्या नवऱ्याच्या महत्त्वाच्या कागदपत्रांची (व्हिसा, पासपोर्ट, सोशल सिक्युरिटी नंबर, मालमत्तेचे तपशील, व्होटर कार्ड क्रमांक इत्यादी) प्रतही शक्य असल्यास जवळ ठेवा.

**लग्न जमविण्याआधी इतके नक्कीच करा!**

लग्न! प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा, संस्मरणीय विषय आणि तितकाच कसोटीचा निर्णय. लग्न ठरवून केलेले असो वा प्रेमविवाह असो. इंटरनेटवर ठरलेले लग्न असो वा मध्यस्थामार्फत ठरलेले. वधू-वर सूचक केंद्रामार्फत जुळलेले असो. लग्नानंतर अनेकदा समोर अनपेक्षित परिस्थिती येते, अनाकलनीय घटनांना सामोरे जावे लागते, लग्न करताना स्वप्नवत वाटणारे जग अचानक बदलते, संबंधित माणसे बदलतात, अथवा जे आपल्याला लग्नाआधी, लग्न ठरवताना सांगितले जाते, साखरपुडा, सुपारी झाल्यावर दाखवले जाते, त्यामध्ये प्रचंड तफावत असल्याचे प्रत्यक्ष लग्न झाल्यानंतर लक्षात येते. हे टाळण्याकरिता आधीच काळजी घ्या.

- लग्नाबाबतचा कोणताही निर्णय घाईघाईत घेऊ नका, तसेच कोणाच्या दबावाखाली येऊन निर्णय घेऊ नका
- विवाहाचा उपयोग ग्रीनकार्ड मिळवण्यासाठी/ परदेशी स्थायिक होण्यासाठी किंवा अन्य तत्सम फायदेशीर योजनांसाठी करू नका, तशा योजनांना बळी पडू नका.
- लग्नासारखी गंभीर बाब फोन/ इमेल किंवा फेसबुकवरच्या संपर्काने ठरवू नका. प्रत्यक्ष मुलाला/ मुलीला व कुटुंबियांना भेटून, बोलून, इत्यंभूत चौकशी करून मगच काय तो निर्णय घ्या.
- नुसत्या वरवरच्या देखण्या चित्राला भुलू नका. व्यवस्थित चौकशी करा, मगच होकार द्या.
- जेव्हा मॅरेज ब्यूरो/ संकेतस्थळ/ मध्यस्थांमार्फत लग्न ठरते तेव्हा त्यांच्याकडील वधू/ वराचे तपशील बरोबर असल्याची खात्री करून घ्या.
- गुप्तपणे लग्नाच्या वाटाघाटी करणे टाळा. त्या लग्नाबाबत जितक्या लोकांना समजेल तेवढे चांगले. त्यानिमित्ताने मुला/मुलीची खरी माहिती कळायला मदत होते.
- थोडक्या माहितीच्या आधारे परदेशांत लग्न करणे टाळा.
- हुंडा किंवा तत्सम मागण्यांना परदेशस्थ जावई/ मुलीच्या सासरच्या मंडळींनी पुढे केल्यास गप्प बसू नका व त्यांना बळी पडू नका. लगेच संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधा.

- पतीच्या किंवा सासरच्या मंडळींच्या क्रौर्याचे बळी ठरू नका. लगेच संबंधित अधिकार्यांना / क्रमांकांना संपर्क साधा.
- नवरा किंवा सासरच्या मंडळींची बदनामी करणे टाळा, कारण ते तुमच्यावर बदनामीचा दावा ठोकू शकतात. जे वास्तव आहे तेच बोला, आणि योग्य मंडळींसमोर : उदा : वकील, पोलिस, सोशल वर्कर, न्यायालय इत्यादी.
- कोणत्याही कारणास्तव कायदा स्वतःच्या हातात घेणे टाळा, व सूड उगवण्यासाठी अविचारी, हिंसक, बेकायदेशीर कृत्ये करू नका. संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क साधा. खोट्या तक्रारी नोंदवू नका.

**लग्न जुळविण्याकरिता मध्यस्थाचे महत्व**

लग्न जुळविण्याच्या प्रक्रियेमध्ये मध्यस्ताची भूमिका महत्वाची आहे. या मध्यस्थामध्ये मानसोपचार तज्ञ, संमोहन तज्ञ, पारिवारीक लोक, शेजारी किंवा नातेवाईक असे कोणीही असू शकतात. या सर्वाची भूमिका केवळ लग्न जुळविण्याच्यां प्रक्रियेमध्ये महत्वाची नाही तर, लग्नानंतर सुध्दा हे महत्वाचे आहेत. जर लग्नानंतर दोघांमध्ये वाद निर्माण झाल्यास तर, हे वाद टोकाला पोहचण्यापुर्वी मध्यस्थ महत्वाची भूमिका बजावू शकतो. असे वाद झाल्यास मध्यस्थी कोणी नसल्यास तर, मुलगी विषेशतः एकटी पडते व ती कधी कधी मुलांना घेऊन आत्महत्येचे पाऊल उचलते. हे टाळण्याकरिता मध्यस्थी हा असलाच पाहिजे.

**आवश्यकता असेल तर गुप्तहेराची मदत घ्या**

भारतात गेल्या काही वर्षांत विवाहपूर्व आणि विवाहोत्तर मुलांकडील परिस्थितीची तपासणीची मागणी अनेक पटींनी वाढली आहे. विवाहातील फसवणूकीच्या प्रकरणांमध्ये, पोलिस विभाग वैवाहिक विवाद प्रकरणे सोडवण्यासाठी खाजगी तपासकांची मदत घेतली जाते. अलीकडच्या काळात मोठ्या संख्येने वैवाहिक वेबसाइट्स मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या वेबसाइट्स विवाह जुळवितांना अनेक प्रकारची खोटी आश्वासने देतात आणि नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येते. अशा लग्न जुळविण्याच्या प्रकारामध्ये परफेक्ट मॅच म्हणून नजरेसमोर खोटे चित्र उभे करण्यात आले असते. परंतु, खरे चित्र वेगळेच असते. यामुळे निष्पाप मुलीचा बळी जातो आणि आयुष्य बेकार होते. अशा प्रकरणामध्ये मुलांकडील आर्थिक स्थिती, गुन्हेगारी नोंदी, आरोग्यविषयक चिंता, व्यसनाधीनता, पात्रता इत्यादीसारखे महत्त्वाचे तपशील मिळविण्याकरिता खाजगी गुप्तहेर कंपन्यांची मदत घेणे फायदेशीर ठरते आणि भविष्यामध्ये निर्माण होणाऱ्या समस्या टाळता येते. अशी माहिती शोधून देणाऱ्या डिटेक्टिव्ह एजन्सीच्या सेवांचा लाभ घेऊन आपण आपल्या मुला-मुलीचे लग्न जुळवितांना होणारी फसवणूक टाळता येते. अशावेळी वधू किंवा वरांची किंवा संबंधित स्थळाने दाखवली अथवा सांगितली माहितीची पूर्ण

पडताळणी केली जाऊन त्याचा पूर्ण अहवाल आपल्याला मिळतो, जेणेकरून लग्नाबद्दलचा कोणताही निर्णय घेणे आपल्याला सोपे जाते. लग्नाचा प्रचंड खर्च करण्याआधी या सेवांचा लाभ घेणे, काळाची गरज आहे. सत्य माहिती जर पुराव्यानिशी लग्नाआधी कळली, तर मुला-मुलींच्या आयुष्याचे होणारे नुकसान थांबवता येऊ शकते. अशा एजन्सी संबंधित स्थळाची सर्व खरी माहिती पुराव्यानिशी देऊन, आपले नाव गोपनीय ठेवून आपल्याला अचूक निर्णय घ्यायला मदत करतात.

### गुप्तहेरांच्या माध्यमातून कोणती माहिती मिळवाल

- लग्नाकरिता ज्या मुलाची निवड करण्यात आली आहे. तो मुलगा जी नोकरी करतो किंवा व्यवसाय करतो ही माहिती त्याने दिलेल्या माहितीप्रमाणे आहे का? त्यांसंबंधी खरी माहिती मिळविणे.
- या व्यक्तीला दारूचे, तंबाखु व सिगारेट चे व्यसन आहेत का ? याची माहिती काढणे. कारण दारूच्या व्यसनामुळे कितीतरी मुलींचे संसार उघड्यावर पडले. तसेच पती दारु पीत असल्यामुळे संसारात रोजच भांडण होतात. या भांडणामुळे लहान मुलांच्या मनावर होणाऱ्या परिणामुळे संसार धोक्यात आले आहे. याकरिता खरी माहिती मिळविणे.
- लग्न जुळविण्याच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे दोघांच्याही विचारांत असलेली तफावत असणे. ही सर्वात मोठी अडचण असते. जेव्हा पती पत्नीच्या विचार-भिन्नता असेल तर, असे दाम्पत्य कधीच सुखी वैवाहिक जिवन जगू शकत नाही. विचार भिन्न असल्यामुळे वाद होतात व ते वाद कोणत्याही शिगेला पोहचतात. म्हणून लग्नापूर्वी दोघांनीही आपण कशाप्रकारचे व्यक्ती आहोत असे लिहून ते एक दुसऱ्याकडे द्यावे जेणेकरून लग्न झाल्यानंतर अडचण यायला नको. ही माहिती गुप्तहेराच्या माध्यमातूच मिळू शकते.

वरील सर्व मुद्दे माझ्याकडे आलेल्या केसस्टडीच्या माध्यमातून घेतलेले आहेत. मी वैवाहिक जीवनातील समस्यावर अनेक विषयावर जोडप्यांना समुपदेशन करतो. तेव्हा त्यांनी दिलेल्या उत्तारातून मला जाणवले की, जर त्यांच्या आयुष्यातील काही मुद्दे लग्नापुर्वीच तपासले गेले असते तर, आज त्यांच्या आयुष्यामध्ये आजचे प्रश्न निर्माण झाले नसते.

### मुलांकडील व्यवसायाची तपासणी न करता विवाह पक्का केला

आदिवासी समाजाची चांगली शिकलेली मुलगी तिला दोन बहिणी, शेजाऱ्यांकडून एका मुलाची पाहणी झाली. परंतु, मुलाबद्दल माहिती देताना शिक्षणाबद्दल व व्यवसायाबद्दल खोटे सांगीतले. घरी ट्रक आहे असे सांगण्यात

आले. मुलीच्या वडिलांनी कोणतीही चौकशी न करता मुलीचे लग्न लावून दिले. लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी  मुलीला सर्व माहिती खोटी असल्याचे कळल्यानंतर आपली फसवणूक झाली असे तिच्या लक्षात आले. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी मुलगा आपल्या आईवडीलांना पैसे मागत होता. त्यामुळे दोघांमध्ये वाद चालू झाला व असे करता करता एका वर्षाच्या काळात दोघामध्ये वाद वाढले आणि मुलीला घराबाहेर काढले. तेव्हा ती दोन महिण्यांची गरोदर होती आणि त्यानंतर त्या दोघांमध्ये घटस्फोट झाला. वरिल केस वरून हे समजते की शहानिशा न करता लग्न जोडल्यामुळे मुलीचे शारिरीक आणि मानसिक नुकसान तर, होतेच तसेच समाजात सुध्दा तिची मानहानी होते. म्हणूनच लग्न जोडतांना इन्व्हेस्टीगेशन एजंटच्या माध्यमातून मुलाच्या माहितीचा तपास करणे आजच्या काळात आवश्यक आहे.

**केसस्टडी**

**मुलाला मानसिक आजार असल्याचे लपविण्यात आले.**

- एक मुलगी खुप हुषार होती. आईवडीलांनी कोणतीही चौकशी न करता तिचे लग्न लावून दिले. तिला पंधरा दिवसात कळले की, मुलगा मानसिक आजाराने ग्रसित आहे. फसवणूक झाल्यामुळे घटस्फोट घेवून परत आली. आज ती चाळीस वर्षाची आहे. अजून लग्न न झाळ्यामुळे डिप्रेशनमध्ये आहे.
- एका मुलीचे लग्न झाले. तिला मुलगा तेवढा पसंत नव्हता. सासु-सासऱ्यांचा त्रास, नवऱ्याचा आधार नाही. त्यामुळे ती पुढे मानसिक आजाराने ग्रस्त झाली. अशा स्थितीत तिला एक मुलगा झाला. मुलगा झाल्यानंतर तिला या नैराश्याच्या त्रासामुळे तिच्यामध्ये पोस्टस्पार्टम डिप्रेशन हा आजार झाला. यामुळे ती सतत भांडायची, चिडायची. घटस्फोट झाला. साडेतिन वर्षाचे बाळ आईपासून वेगळे आहे.
- एका केसमध्ये आईवडीलांच्या संमतीने लग्न लावून दिले. सासरकडच्या मंडळीच्या नकारात्मक वागणुकीमुळे तिला मानसिक आजार झाला. डिलीव्हरीमुळे हा आजार आणखी वाढला त्यामुळे ती वेड्यासारखी करू लागली. ती वेडी आहे म्हणून तिला घटस्फोट दिला. तिच्याकडून मुलगा दुरावल्या गेला. आता तिला माहेरी मानसिक आजाराचे औषध चालू आहेत आणि माझ्याकडे सुद्धा संमोहनाच्या माध्यमातुन समुपदेशन सुरू आहे.

मित्रहो, डिलीव्हरी नंतर जर बाळाच्या आईला मानसिक त्रास होत असेल तर तिचा काहीही दोष नसतो. ती जी काही चिडचिड करते, भांडण करते, ते केवळ हार्मोन्समध्ये झालेल्या बदलामुळे. भूतकाळातील नकारात्मक घटनाच्या परीणामुळे अशी परिस्थिती निर्माण होते आनि मानसिक आजार निर्माण होतात. जर जोडीदाराने पतीने अशा वेळी

आपल्या पत्नीच्या आजारामध्ये तिला मानसिक आधार  दिल्यास तर, पत्नीला मानसिक आजारातून बाहेर काढता येते. अशा परिस्थितीत जोडीदारास घटस्फोट न देता मानसिक आधार दिल्यास तर, आपल्या पत्नीचे व मुलाचे आयुष्य सुखी होवू शकते.

## लग्न जुळल्यानंतर खालील गोष्टी टाळाव्यात

- **लग्न जुळल्यानंतर मोबाईल वर बोलतांना मर्यादा सांभाळा :** लग्न जुळल्यानंतर कृपया मुलामुलींना मोबाईलवर बोलण्यास मोकळीक देवू नये. तसेच एकमेकांत एकट्याने बाहेर फिरण्यास पाठवु नये. तसे झाल्यास एकमेकांच्या लहानसहान बाबी एकमेकांना सहजेतेने सांगून जातात आणि त्याच्या परिणामातून अनेक लग्न तुटल्याची उदाहरणे माझ्याकडे आहेत.
- **प्रिवेडींग व्हिडीओ शुटिंग शक्यतोवर टाळा :** आजच्या लग्नपध्दतीमध्ये नवीन फॅड म्हणजे प्रिवेडिंग शुटिंग होय. या शुटिंगच्या क्लिप मुलाकडे असल`तर, लग्न तुटले तर त्या आक्षेपार्य व्हिडीओचा फायदा घेऊन बरेच मुले मुलींना ब्लॅक-मेल करून तिचे पुढे लग्न होण्यामध्ये अडथळा निर्माण करतात. तेव्हा त्यामध्ये सावधानता बाळगा किंवा शक्यतोवर प्रिवेडिंग शुटिंग टाळा.
- **लग्नाअगोदरचे प्रेमसंबंधाची माहिती सांगू नये :** लग्न जुळल्यानंतर नवीन मुलाला मुली आपल्या प्रेमसंबंधाची माहिती प्रामाणिकपणे सांगतात, ती त्यांची सर्वात  मोठी चुक असते. अशा घटनेमुळे मुलांच्या मनात संशय निर्माण होतो आणि हे संशयाचे बीज त्याच्या मनात कायमस्वरुपी राहते. सर्वांना माझे हेच सांगणे आहे. कधीच चुकुनही प्रेमसंबंध होते हे सांगु नये. त्याचा भावी आयुष्यावर खुप वाईट परिणाम होतो.

## केसस्टडी

कारण एक नुकतेच दहा दिवसांपूर्वी लग्न झालेले जोडपे माझेकडे आले. त्यांचे लग्न जुळल्यापासून बोलणे भेटणे सुरू होते. सगळेकाही व्यवस्थित होते. परंतु मुलाच्या संस्कारात असे होते की त्याला कोणतेही पुर्व प्रेमसंबंध नसणारी बायको पाहिजे होती. तशी ती होतीही. परंतु त्याचे मनात ती गोष्ट असल्यामुळे त्यांनी तिला विचारले तिने नाही म्हटले. परंतु त्याने रागवत चिडून खुप तिला मानसिकरित्या फोर्स केला, तेव्हा तिने चिडुन काहीही नसतांना 'हो माझा बॉयफ्रेंड होता' असे सांगीतले. त्यानंतर लग्न झाले. त्याचे मनात ही गोष्ट होती. लग्नानंतर तो विचार त्याचे मनात फिरू लागला व तो डिप्रेशनमध्ये गेला. अवघ्या दहा दिवसांत संसार उध्वस्त झाला.  या सर्व गोष्टीवरुन असे लक्षात येती की, आपण आपल्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतो, तेव्हा अशा गोष्टी शक्यतोवर टाळाव्यात.

*******

प्रकरण ९ वे

# कायद्याच्या दृष्टीने विवाहाचे महत्व व महिलांचे अधिकार

*हिंदू धर्मात विवाहाला विशेष महत्व आहे. हिंदू धर्मातील १६ संस्कारांपैकी विवाह हा सर्वात महत्वाचा संस्कार समजला जातो. हिंदू धर्मात असे संबोधले जाते की विवाह हा मानवी आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. हिंदू विवाहाची व्याख्या करीत असताना असे संगितले जाते की, हा एक धार्मिक संस्कार आहे, ज्यामध्ये संतती आणि लैंगिक सुखाच्या तसेच शारीरिक, सामाजिक आणि आध्यात्मिक गरजांसाठी एक स्त्री आणि पुरुष कायमस्वरूपी नातेसंबंधात बांधले जातात. प्राचीन काळी विवाहासाठी मुलीची संमती घेतली जात नसे. मुलीचे वडील तिला न विचारता किंवा मुलीचा सल्ला न घेता तिचा विवाह ठरवीत असे आणि मुलीला ते स्वीकारून सदर व्यक्तीशी विवाह करणे बंधनकारक होते. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने सन १९५४ मध्ये हिंदू विवाह कायदा मंजूर केला आणि या कायद्यानुसार भारतीय विवाह पध्दतीला कायदेशीर मान्यता देण्यात आली. या कायद्यानुसार लग्न आणि लग्नांनंतर निर्माण होणाऱ्या समस्यांना दोन्ही पक्षाला कायदेशीर न्याय मिळावा यादृष्टीने तरतुदी करण्यात आले आहे.*

हिंदू विवाह कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जोपर्यंत विवाह योग्य विधींसह आणि योग्य स्वरूपात केला जात नाही तोपर्यंत या कायद्याच्या कलम ७(१) नुसार त्याला मान्यता दिली जाऊ शकत नाही. कलम ७ मधील उप-कलम (२) असे सांगते की, या संस्कारामध्ये सप्तपदी समाविष्ट आहे. वर आणि वधूने एकत्रित सप्तपदी पूर्ण केल्यानंतरच विवाह पूर्ण होतो. एकूणच सर्वोच्च न्यायालयाने हिंदू विवाहाला संस्कार म्हटले आहे आणि सप्तपदीला बंधनकारक ठरविले आहे. या कायद्यानुसार हिंदू विवाह पध्दतीने खालील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

## विवाह करण्याकरिता कायदेशीर अटी कोणत्या?

हिंदू विवाह होण्यापूर्वी हिंदू विवाह कायदाच्या कलम नं. ५ प्रमाणे खालील शर्तींची पूर्तता झाली पाहिजे.

- वराचे किमान वय वय २१ वर्षे व वधूचे वय १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.
- विवाहसमयी वधूवरांस अगोदरचा पती किंवा अगोदरची पत्नी असता कामा नये.

याचाच अर्थ कोणत्याही पुरुषाला एका वेळी एका पत्नीपेक्षा अधिक पत्नी असणार नाहीत वा कोणत्याही पत्नीला एकाच वेळी एकापेक्षा अधिक पती असू शकत नाहीत.

- विवाहाच्या समयी वधूवरांपैकी कोणीही मनोदौर्बल्यामुळे विवाहास समंती देण्यात असमर्थ असता कामा नये, किंवा संमतीसाठी समर्थ असल्यास मनाच्या असमतोलपणामुळे विवाह करण्यास व प्रजोत्पादनास समर्थ असता कामा नये, अथवा त्याला व तिला वारंवार बुद्धिभ्रमाचे किंवा अपस्माराचे झटके येत असता कामा नयेत.
- वधूवर हे भाऊबहिण, मामा भाची अशा प्रतिषिद्ध नात्यामध्ये असता कामा नयेत.
- उपरोक्त अधिनियमाच्या कलम नं. ७ प्रमाणे हिंदू विवाह हा वधूवरांपैकी एकालासुध्दा लागू असलेल्या रूढींना समंत असतील असे विधी करून पूर्ण करता येतो. परंतु जर अशा विधीमध्ये सप्तपदीची अंतर्भाव असेल, तर मात्र वधूवरांनी सातवे पाऊल एकत्र टाकेपर्यंत विवाह पूर्ण व बंधनकारक होणार नाही.

**हिंदू विवाह अवैध कधी होतो -**

- विवाहासाठी आवश्यक असलेल्या तरतुदींची पूर्तता झाली नाही तर असा विवाह अवैध मानला जातो. खालील परिस्थितीं मध्ये विवाह अवैध होतो -
- पती अथवा पत्नी विवाहित असताना जर दुसरा विवाह केला असेल, तर असा दुसरा विवाह अवैध मानला जातो.
- पती-पत्नी कायद्यामध्ये दिलेल्या प्रतिबंधित नातेसंबंधांमधील असल्यास त्यांच्यामधील विवाह अवैध मानला जातो.
- विवाहाच्या वेळेस पती अथवा पत्नी मानसिक दृष्ट्या सक्षम नसल्यास.
- विवाह करताना फसवणूक करण्याच्या उद्देशाने महत्त्वाची माहिती लपवली असल्यास किंवा विवाह जोर - जबरदस्तीने झाला असल्यास किंवा पती अथवा पत्नी विवाह संबंध ठेवण्यास सक्षम नसल्यास.
- पत्नी विवाहाच्या वेळेस त्रयस्थ व्यक्ती पासून गर्भवती असल्यास व ही माहिती पतीपासून लपवली असल्यास, विवाह झाल्यापासून १ वर्षाच्या आत पती कोर्टात दावा दाखल करून विवाह रद्द बातल करून घेऊ शकतो.

अशा सर्व परिस्थितीमध्ये न्यायालयाच्या मदतीने विवाह रद्दबातल होतो.

## कायदेशीर विवाहामध्ये नोंदणी प्रमाणपत्राचे महत्व

विवाह प्रमाणपत्र हे असे प्रमाणपत्र आहे जे पती पत्नीमधील नातेसंबंध सिद्ध करते. लग्नाशी संबंधित कोणत्याही कायदेशीर कामासाठी विवाह प्रमाणपत्र अनिवार्य आहे. विवाह आणि खास विवाह कायद्यांनुसार जिल्हा विवाह निबंधकांकडून विवाह प्रमाणपत्र दिले जाते.

## विवाह नोंदणी प्रमाणपत्रे फायदे

- विवाहाचे प्रमाणपत्र हे सामाजिक सुरक्षा, खासकरुन विवाहित महिलांमध्ये आत्मविश्वास प्रदान करणारे दस्तऐवज आहे.
- विवाह प्रमाणपत्र, पत्नी / पतीसाठी पासपोर्ट सेवेसाठी, व्हिसासाठी आवाहन करताना त्याचा वापर चालू आहे.
- विवाहाचे प्रमाणपत्र हे एक दस्तऐवज असून तो लग्न झाल्याचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे.
- जेव्हा ठेवीदार किंवा इन्शुअरर नामनिर्देशनाविना मरण पावतो किंवा अन्यथा कौटुंबिक पेन्शन, बँक ठेवी किंवा जीवन विमा लाभांचा फायदा घेण्यास पात्र ठरतो.
- विवाह प्रमाणपत्र म्हणजे विवाह नोंदणीचा पुरावा.
- वर्क परमिट किंवा दीर्घ मुदतीच्या निवास व्हिसावर परदेशात काम करणारा नवरा किंवा पती या बाबतीत विवाह प्रमाणपत्रात मदत केली जाते आणि पत्नीनेही त्यात सामील व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. कोणतेही परराष्ट्र दूतावास किंवा वाणिज्य दूतावास विवाह जोडीदारास लग्नाच्या प्रमाणपत्रात पुराव्यांशिवाय व्हिसा देत नाही.
- घटस्फोट, कायदेशीर वेगळेपणा, पोटगी किंवा मुलांचा ताबा घेण्याच्या प्रकरणांमध्ये न्यायालये लग्नाचे प्रमाणपत्र पाहण्याचा आग्रह धरू शकतात.

## कायदेशीर लग्नाची नवीन पध्दती कोर्ट मॅरेज

भारतामध्ये पार पडणाऱ्या विवाहाचे हिंदू विवाह कायदा १९५५ किंवा विशेष विवाह कायदा १९५४ अंतर्गत नोंदणीकृत केले जाऊ शकतात. २००६ पासून सर्वोच्च न्यायालयाने विवाह नोंदणी अनिवार्य केली आहे, जेणेकरुन महिलांचे हक्क सुरक्षित राखले जाऊ शकतील. कोर्ट मॅरेजला या कायद्यानुसार मान्यता आहे. कोर्ट मॅरेज हे कोणत्याही धर्म, पंथ किंवा जातीच्या प्रौढ स्त्री-पुरुषांमध्ये होऊ शकते. कोणत्याही विदेशी व्यक्तीचे आणि त्या व्यक्तीसोबत लग्न करणाऱ्या भारतीय व्यक्तीचे ही कोर्ट मॅरेज होऊ शकते. कोर्ट मॅरेजमध्ये कोणत्याही प्रकारची भारतीय पारंपारीक पद्धत अवलंबली जात नाही. फक्त या

कोर्ट मॅरेजकरता वर-वधूला विवाह निबंधकासमोर अर्ज सादर करावा लागतो. आधुनिक पध्दतीने नोंदणी पध्दतीने विवाह करण्याची प्रथा सुरु झाली आहे. याकरिता विवाह करण्याकरिता जोडप्याला नोंदणीसाठी विवाह अधिकाऱ्यासमोर उपस्थित राहणे बंधनकारक असते. तरच विवाह नोंदणी शक्य आहे. अशा प्रकारच्या विवाहाकरिता तुम्ही प्रौढ असाल आणि कोर्ट मॅरेजसाठी घालून दिलेले नियम तुम्ही पाळले असतील, तर इतर दोन साक्षिदाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टींची आवश्यकता नसते. याकरिता खालील अटीचे पालन करणे आवश्यक आहे.

- विवाह करणाऱ्या जोडप्यांपैकी कोणाचाही पूर्वी विवाह झालेला नसावा. जर झाला असे तर त्यांचा कायदेशीर घटस्फोट झालेला असावा.
- परस्पर नात्यामध्ये हा विवाह होऊ शकत नाही, म्हणजेच आत्या, बहीण इत्यादी. हा नियम फक्त हिंदू समाजाला लागू आहे. लग्नाच्या वेळी, वधू आणि वर दोन्ही पक्षांनी त्यांची वैध संमती म्हणजेच 'कायदेशीर तयारी' देण्यास सक्षम असावे. अर्थात दोघांनीही या कायदेशीर प्रक्रियेत स्वेच्छेने सहभागी व्हावे.
- या विवाहाकरिता पुरुषाचे वय २१ वर्षांपेक्षा जास्त आणि महिलेचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे. या दाम्पत्याच्या होणाऱ्या बाळासाठी दोघे ही शारिरिकरित्या तंदुरुस्त असले पाहिजेत. याशिवाय दोघेही मानसिकदृष्ट्या स्थिर असले पाहिजेत.
- कोर्ट मॅरेज करण्याकरिता संबंधित जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्याकडे लग्नासाठी इच्छुक असलेल्या दोघांपैकी एकाने आवश्यक अटीसह अर्ज करणे आवश्यक आहे. दोघांपैकी एकाने माहिती दिल्याच्या ३० दिवस त्या जिल्ह्याच्या क्षेत्रात वास्तव्य करणे हे बंधनकारक असेल.
- जिल्ह्य़ातील विवाह अधिकारी, ज्यांच्या समोर ही माहिती जारी करण्यात आली होती, ते ही माहिती प्रसिद्ध करतात. नोटीसची एक प्रत कार्यालयातील एका विशिष्ट ठिकाणी आणि एक प्रत जिल्हा कार्यालयात जेथे विवाह करणारे पक्ष कायमचे रहिवासी आहेत, तेथे प्रकाशित केली जाते.
- संबंधित जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्यासमोर कोणीही हा आक्षेप न घेतल्यास तर, विवाह अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, दोन्ही पक्ष आणि तीन साक्षीदार या विवाह घोषणापत्रावर स्वाक्षरी करतात. त्यावर विवाह अधिकाऱ्याची स्वाक्षरीही असते.
- विवाह अधिकारी विवाह प्रमाणपत्र पुस्तिकेमध्ये एका प्रमाणपत्राची नोंद करतात आणि दोन्ही पक्षांनी आणि तीन साक्षीदारांनी स्वाक्षरी केल्यानंत जोडप्याला विवाह प्रमाणपत्र प्रदान करतात. हे प्रमाणपत्र न्यायालयीन विवाहाचा एक निर्णायक पुरावा आहे.

- कोर्ट मॅरेज केल्यानंतर तुम्हाला एक वर्षापर्यंत घटस्फोट घेता येत नाही. अर्थात, विवाह झालेल्या दोघांपैकी कोणीही १ वर्षाची मुदत संपण्यापूर्वी घटस्फोटासाठी न्यायालयात याचिका दाखल करू शकत नाही.

## लग्नानंतर विवाहितेला मिळणारे कायदेशीर अधिकार

लग्नानंतर स्त्रीला तिच्या आई-वडिलांचे घर सोडून पतीच्या घरी जावं लागते आणि आयुष्यभर त्याच ठिकाणी पतीच्या सोबत राहावे लागते. पतीच्या घराला आपले घर मानावे लागते आणि त्याच्या कुटूंबाशी एकरुप व्हावे लागते. अशा परिस्थितीत महिलांना कोणते अधिकार प्राप्त होतात. पती आणि सासरच्या संपत्तीत आपला किती अधिकार आहे याची जाणीव महिलांनी ठेवायला हवी. भारतात महिलेला लग्नानंतर पुढील अधिकार प्राप्त होतात.

- **पतीच्या संपत्तीवर पत्नीचा हक्क :** लग्नानंतर पतीच्या संपत्तीवर पत्नीचा पूर्ण अधिकार असतो. याचे दोन पैलू आहेत जे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आपल्याकडे पत्नी ही पतीची अर्धांगिनी समजली जाते. त्यामुळे जर पतीने अशी संपत्ती स्वतः कमावली असेल तर त्यावर पत्नीचा आणि त्याच्या मुलांचा त्यावर पहिला अधिकार असतो. जर ती व्यक्ती मृत्यूपत्राशिवाय मरण पावली असेल, तर त्याची संपत्ती ही त्याची पत्नी आणि मुलांमध्ये समान वाटली जाते. जर एखाद्या व्यक्तीने मृत्यूपत्रात एखाद्याला आपला वारस बनवले तर संपत्ती मृत्यूपत्रामध्ये नमूद केलेल्या वारसांकडे जाते.
- **सासरच्या संपत्तीवर स्त्रीचा हक्कः** जर संपत्ती वडिलोपार्जित असेल आणि पतीचा मृत्यू झाला तर त्या संपत्तीवर महिलेचा अधिकार राहणार नाही. पतीच्या निधनानंतर स्त्रीला सासरच्या घरातून हाकलून देता येत नाही. पतीच्या मृत्यूनंतर सासरच्या मंडळींना त्या महिलेला पोटगी द्यावी लागेल. पोटगी किती असावी. हे न्यायालय, ती महिला आणि तिच्या सासरच्या लोकांच्या आर्थिक परिस्थितीच्या आधारे ठरवले जाते. जर त्या महिलेला मुले असतील तर त्यांना वडिलांच्या वाट्याची संपूर्ण मालमत्ता मिळेल. विधवा महिलेने दुसरे लग्न केले तर तिला सासरच्या मंडळीकडून मिळणारी पोटगी थांबते.
- **महिलांचा संपत्तीचा अधिकार** :हिंदू उत्तराधिकार कायद्याच्या कलम १४ आणि हिंदू विवाह कायद्याच्या कलम २७ अंतर्गत, महिलेला लग्नापूर्वी, त्या दरम्यान आणि लग्नानंतर भेटवस्तू (स्त्रीधन) म्हणून मिळालेल्या प्रत्येक गोष्टीवर (दागिने आणि रोख रकमेसह) विवाहितेचा पूर्ण अधिकार असतो.
- **पतीच्या घरी राहण्याचा अधिकारः** एका विवाहित स्त्रिला तिच्या सासरच्या घरात किंवा आपल्या पतसोबत घरी राहण्याचा पूर्ण हक्क आहे. परिस्थिती कशीही असली आणि तिचा नवरा मरण पावला असला तरी पत्नी आपल्या

सासरच्या घरी राहू शकते. जर हा विषय घटस्फोटापर्यंत पोचला असेल तर पत्नी तोपर्यंत नवऱ्याच्या घरी राहू शकते जोपर्यंत तिची दुसरीकडे राहण्याची काही सोय होत नाही. जर स्त्रीला त्याच घरात रहायचे असेल तर ते देखील तिच्या कायदेशीर अधिकारात आहे. हिंदू विवाह अधिनियम १९९५ च्या कलम १३ अन्वये पतीने व्यभिचार, क्रूरता, शारीरिक किंवा मानसिक छळ केला असल्यास पत्नी नवऱ्याच्या सहमतीविनाही घटस्फोट घेऊ शकते. यासह महिला आपल्या पतीकडून देखभाल शुल्काची मागणीही करू शकते. 'इंडियन पिनल कोड' कलम १२५ अन्वये, एक पत्नी आपल्यासाठी आणि आपल्या मुलासाठी नवऱ्याकडून पैशांची मागणी करू शकते. खासकरून पती तिच्यापेक्षा जास्त पैसा कमवत असेल.

- **स्त्रीधन व मुलांच्या कस्टडीचा अधिकार :** हिंदू विवाह कायदा १९५६ च्या कलम १४ आणि हिंदू विवाह कायदा १९९५ च्या कलम २७ अंतर्गत एखादी स्त्री आपले स्त्रीधन हक्काने आणि मालकीची हक्काने मागणी करू शकते. या अधिकाराचे उल्लंघन झाल्यास या कायद्याच्या कलम १९ अ अंतर्गत तक्रार दाखल करू शकते. एका महिलेला आपल्या मुलाचा ताबा मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. विशेषतः जर मुल ५ वर्षांपेक्षा लहान असेल. तसेच जर ती सासरचे घर सोडून जात असेल तर कोणत्याही कायदेशीर आदेशाशिवाय ती आपल्या मुलांना आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकते. यासोबतच समान कस्टडीचा हक्क मिळाला असला तरी घरात वाद उद्भवल्यास स्त्री आपल्या मुलाची कस्टडी कायमची आपल्याकडे ठेवू शकते.
- **गर्भपात करण्याचा अधिकारः** यासोबतच एका महिलेला तिच्या गर्भात असलेल्या बाळाचा गर्भपात करण्याचाही अधिकार असतो. यासाठी तिला तिच्या सासरच्या किंवा तिच्या पतीच्या संमतीची आवश्यकता नाही. The Medical Termination of Pregnancy Act, 1971 अनुसार, एखादी स्त्री कधीही गर्भधारणा संपवू शकते, पण यासाठी गर्भधारणेचा कालावधी २४ आठवड्यांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. काही विशेष प्रकरणांमध्ये स्त्री २४ आठवड्यांनंतरही गर्भपात करू शकते. यासाठी भारतीय न्यायालयाने तिला विशेष अधिकार दिला आहे.
- **संपत्तीचा अधिकारः** The Hindu Succession Act, 1956 च्या कायद्यात २००५ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार मुलगी विवाहित असो वा नसो, तिला तिच्या वडिलांच्या मालमत्तेत इतर अपत्याच्या बरोबरीचा वाटा मिळवण्याचा अधिकार आहे. यासोबतच महिला तिच्या माजी पतीच्या मालमत्तेवर आपला हक्क सांगू शकते. पण तिच्या पतीने तिला आपल्या मालमत्तेतून बाद करण्याचे मृत्यूपत्र बनवले नसेल तरच हे शक्य आहे. सोबतच जर एखाद्या महिलेच्या नवऱ्याने

घटस्फोट न घेता दुसरे लग्न केले तर, त्या परिस्थितीत पतीच्या संपूर्ण मालमत्तेवर पहिल्या पत्नीचा हक्क असतो.

- **पोटगी मागण्याचा हक्क :** भारतामध्ये कुटुंबातील स्वावलंबी नसलेल्या महिलांकरिता वेगवेगळ्या कायद्याअंतर्गत पोटगी मागण्याची तरतूद आहे. 'हिंदू विवाह कायदा', 'हिंदू दत्तक आणि पोटगी कायदा' हे विशेष कायदे तर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ या विशेष कायद्यांमध्ये पोटगीच्या तरतुदी दिलेल्या आहेत. पत्नी, अज्ञान मुलगा-मुलगी, अविवाहित मुलगी, अविवाहित, शारीरिक किंवा मानसिक दुर्बलतेमुळे स्वत:चे पालन-पोषण करू शकत नसेल तर, अशा महिलेस घटस्फोटाच्या प्रकरणात पोटगी मागण्याचा अधिकार आहे. ती व्यक्ती पोटगी देण्यासाठी सक्षम असली पाहिजे किंवा तिच्याकडे उदरनिर्वाहाची पुरेशी साधने असली पाहिजेत. पती-पत्नी दोघांच्याही आर्थिक स्थितीच्या आधारावर महिलेस पोटगी देण्याचा निर्णय घेतला जातो. घटस्फोटावेळी वन टाईम सेटलमेंटही करता येते. त्यामध्ये मासिक भत्त्याचाही समावेश होऊ शकतो. घटस्फोटानंतर जर मुले आईसोबत राहत असतील तर पतीला अधिक पोटगी मंजूर केली जाते. घटस्फोट झाल्यास पतीच्या मालमत्तेवर पत्नीचा अधिकार नसतो. महिलेच्या मुलांना त्यांच्या वडिलांच्या संपत्तीवर पूर्ण अधिकार असतो. जर पती-पत्नी संयुक्तपणे मालमत्तेचे मालक असतील, तर त्या प्रकरणात मालमत्ता समान प्रमाणात विभागली जाते.

### पती किंवा पत्नींस दुसरेलग्न करता येते का?

अनेकदा अनेकांच्या आयुष्यात अशी परिस्थिती निर्माण होते ज्यामुळे त्यांना आपला जोडीदार जिवंत असतानाही दुसरे लग्न करावे लागते. ही परिस्थिती फार वेळा जेव्हा पती, पत्नी वेगवेगळे किंवा एकमेकांपासून दूर राहत असताना निर्माण होते. काही ठराविक प्रथा-परंपरा सोडल्या तर पती किंवा पत्नी जिवंत असताना घटस्फोट दिल्याशिवाय दुसरे लग्न करणे कायद्यानुसार दंडनीय गुन्हा मानला जातो. विवाह हा विषय वैयक्तिक कायद्याशी संबंधित आहे. हा कायदा लोकांच्या खासगी प्रकरणात लागू होतो. हा कायदा धर्म किंवा समाजाचा कायदा असतो जो लोकांना त्यांच्या खासगी प्रकरणांसाठी देण्यात आला आहे. भारतामध्ये सामान्यपणे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा अनेक धर्माचे लोक राहतात. शिख, बौद्ध, जैन यांना हिंदू धर्मात गणले जातात. मुस्लिम आणि ख्रिश्चन यांना वेगळा धर्म मानले जाते. हिंदू धर्मासाठी हिंदू विवाह १९९५ तर मुस्लिम धर्मीयांसाठी त्यांचा पर्सनल लॉ आहे.

### दुसऱ्या विवाहासंबंधी कायद्यातील तरतुदी

भारतात दोन प्रकारे लग्न होतात. एक म्हणजे पर्सनल लॉ अंतर्गत आणि दुसरा म्हणजे विशेष विवाह कायदा, १९५६ अंतर्गत होतो. या दोन्ही कायद्यात दुसरे लग्न

करणं दंडनीय गुन्हा मानले जाते. हिंदू विवाह कायदा १९९५ च्या कलम १७ मध्ये दुसऱ्या लग्नासंबंधी शिक्षेचा उल्लेख आहे. जेव्हा एखादी व्यक्ती ज्याचा पती किंवा पत्नी जिवंत आहे आणि तरीही दुसरे लग्न केले तर त्याला दोषी मानले जाते. भारतीय दंड संहिता, १८६० च्या ४५ अंतर्गत कलम ४९४ नुसार कोणत्याही व्यक्तीने आपला पती किंवा पत्नी जिवंत असतांना घटस्फोट न घेता दुसरे लग्न केल्यास तर त्यास सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. पण जर एखाद्या धर्मात दुसऱ्या लग्नाला मान्यता असेल तर हा कायदा लागू होत नाही. मुस्लिम समाजामध्ये दुसरे लग्न वैध विवाह मानण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना हा कायदा लागू होत नाही. पण महत्वाचे म्हणजे सुप्रीम कोर्टाने दुसरे लग्न क्रूरता असल्याचे मत नोंदवले आहे. त्यामुळे पतीने दुसरा विवाह करणे हा पत्नीसाठी क्रूरपणा मानले जाऊन भारतीय दंड संहितेचे कलम ४९८(अ) अंतर्गत शिक्षा ठोठावली जाऊ शकते.

### कोण तक्रार करु शकतो

भारतीय दंड संहितेच्या कलम ४९४ ला वेगळे स्वरूप देण्यात आले आहे. या कलमांतर्गत दुसरे लग्न हा दखलपात्र गुन्हा मानला जातो.  हा गुन्हा दखलपात्र असण्याचा अर्थ असा आहे की या कलमाखाली थेट पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करता येत नाही आणित्या व्यक्तीला अटकही केली जात नाही. मात्र पिडीत व्यक्तीला या गुन्ह्याची तक्रार करता येते.

- जेव्हा एखादी व्यक्ती दुसरा विवाह करेल तेव्हा पीडित पक्ष म्हणजे  पती किंवा पत्नीच त्याबद्दल तक्रार करू शकते. इतर कोणी तक्रार करु शकत नाही.  जर एखाद्या पुरुषाने आपली पत्नी जिवंत असतानाही दुसरा विवाह केला असेल, तर त्याची पहिली पत्नी पतीच्या विरोधात दुसऱ्या विवाहाविरुद्ध दंडाधिकाऱ्यांसमोर तक्रार करू शकते.
- या विवाहाला कोणत्याही प्रकारे कायदेशीर मान्यता नसते. असा विवाह केल्यास तो पूर्णपणे रद्दबातल ठरतो आणि त्याला कोणतीही वैधानिक मान्यता मिळत नाही. परंतु भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणात पत्नीच्या बाबतीत नम्रता दाखवून दुसऱ्या महिलांचा  पोटगीचा अधिकार असल्याचे मान्य केले आहे.
- जर एखाद्या पुरुषाची पत्नी जिवंत असेल आणि या विवाहाला पहिल्या पत्नीची सहमती असेल तरीही  दुसरा विवाह कोणत्याही परिस्थितीत वैध ठरत नाही. दोन्ही व्यक्ती विवाहाच्या वेळेस अविवाहित, घटस्फोटीत अथवा विधुर असेल तरच हा विवाह कायदेशीर वैध ठरतो.

*******

प्रकरण १० वे

# लग्नानंतरची नाती आणि जबाबदारी

*इंग्रजीमध्ये सासरच्या माणसांना 'इन लॉ' असे म्हणण्याची पद्धत आहे. जोडीदाराचा भाऊ/ बहीण म्हणजे आपले 'ब्रदर इन लॉ' किंवा 'सिस्टर इन लॉ', आई-वडील म्हणजे 'मदर / फादर इन लॉ' म्हणजेच प्रत्यक्ष रक्ताच्या नात्याने नव्हे, तर कायदेशीर विवाह झाल्याने कायद्याच्या बंधनातून झालेले 'कायदेशीर भाऊ/ बहीण/ आई/ वडील अशी नाती निर्माण होतात. भारतीय समाजात कौटुंबिक पार्श्वभूमीचे विवाहाच्या वेळी फारच महत्त्व आहे. लग्न, म्हणजे केवळ 'राजाराणीचा संसार' नसून अनेक नात्यांची निर्मिती तर, अनेक प्रकारच्या जबाबदारीचा संमुच्चय असतो. लग्न म्हणजे मुलांबरोबर मुलीसाठी खूप मोठा बदल असतो. ज्या घरात जन्मापासून घरात आपले घर समजून आयुष्य काढले ते सोडून दुसऱ्याच घराला आपले म्हणून जीवन सजवायच असते. माहेरचे बंध-पाश तोडून सासरच्या पद्धती, प्रथा, पुन्हा एकदा नव्याने शिकायच्या. आपल्या घरातला सवयीचा दिनक्रम सोडून नव्या घराच्या नव्या दिनक्रमाची सवय लावून घ्यायची. अगदी छोटे छोटे बारकावे पाहायचे आणि अंगीकारायचे. जुन्या माहेरच्या नात्यांची आपल्या आयुष्यातील भूमिका मर्यादित होणार, हे स्वीकारायचे आणि नव्या नात्यांच्या घडवणुकीकडे लक्ष द्यायचे, यासाठी मनाची तयारी करणे खूपच आवश्यक असते. लग्नानंतर दोघांच्याही आयुष्यात कोणते बदल होणार आणि कोणती जबाबदारी येणार याची थोडीशी कल्पना मिळवणे, त्यासाठी आपली मानसिक तयारी करणे महत्त्वाचे ठरते*

तुमचा प्रेमविवाह असो वा अरेंज मॅरेज असो, पण लग्नानंतर नात्यामध्ये काही बदल होणे हे विधिलिखीतच आहे. लग्नानंतर नवऱ्याच्या स्वभावापासून प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धतीपर्यंत सर्वच गोष्टींमध्ये प्रचंड फरक पडण्यास सुरुवात होते. लग्न हे असे एक नाते आहे जे खूपच समजुतदारपणे आणि कर्तव्यनिष्टतेने पार पाडावे लागते. लग्न हे  प्रेम पूर्णत्वास नेण्याचा शेवटचा दगड आहे. त्यांनतर प्रेमाला ओहटी सुरु होते. लग्न झाल्यानंतर खूप गोष्टी हळू हळू बदलू लागतात आणि त्या नात्याची व्याख्याही त्यासोबत बदलते. लग्नानंतर निर्माण झालेल्या कुटुंबीयांची जबाबदारी, प्रेमाच्या नात्यात खरे उतरण्याची परिक्षा, संसारातील आर्थिक ताळमेळ साधणे, संसारातील कर्तव्ये पार पाडणे, करियर सांभाळणे ही तारेवरची कसरत सुरु होते. या सर्व संघर्षाला तोंड देण्याची मानसिक तयारी लग्ना अगोदर निर्माण झाली तर, तुम्ही या सर्व गोष्टींशी आपोआप तयारी करू लागता.

- **नव्या नात्यांचा स्विकार करण्याची मानसिकता :** आपल्याला आवडो वा ना आवडो, विवाहानंतर आपल्या सभोवताली आपोआपच अनेक नाती तयार होतात. लग्नानंतर लग्न झालेल्या कुटुंबात आपण सून/जावई म्हणून प्रवेश करतो. या नात्या बरोबरच आपल्याला सासू/ सासरे मिळतात. त्याव्यतिरिक्त लग्न झालेले जोडपे कुणाचे तरी काकी/ मामी/ वहिनी किंवा जिजाजी आपोआपच होऊन जातात. सुरुवातीला आपल्यासाठी वधू आणि वरांकडील अनेक नाती निर्माण होतात. ही सर्व नाती दोघांच्याही वागण्या/ बोलण्यावर किंबहुना संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकीत असते. त्याचप्रमाणे ही नाती तुमच्या संसारावर, पती-पत्नीच्या नात्यावर विशेष परिणाम करीत असते आणि या नात्याची काळजी घेणे ही आपलीच जबाबदारी असते आणि या नात्याचा स्विकार करण्याकरिता आपली मानसिक तयारी आवश्यक असते.
- **नात्यांतील अपेक्षा पुर्ण करण्याची मानसिकता:** नव्याने आलेल्या सुनेच्या बाबतीत घरातल्या प्रत्येक व्यक्तीच्या विविध अपेक्षा असतात. 'सूनबाई आल्या की सकाळी दोनदा चहा मागितल्यावर कोणाच्या कपाळावरची आठी पाहायला नको! ती देईल!' 'वहिनी आल्या की ती माझा अभ्यास घेईल' किंवा 'मग आम्ही दोघी सिनेमाला जाऊ शकू' इथपर्यंतच्या अनेक स्वप्नांची मालिका कुटूंबातील प्रत्येकाने तयार केलेली असते. कोणी तरी आपल्याला मोकळा वेळ मिळवून देईल, आपली जबाबदारी, काम वाटून घेईल, अशा अनेक अपेक्षा नव्याने आलेल्या नात्यामध्ये निर्माण होतात आणि या अपेक्षांची सर्वांचीच पूर्ती करणे आपल्याला शक्य नसते. पण, त्यांच्या किमान अपेक्षा पुर्ण करण्याकरिता आपली मानसिक तयारी आवश्यक असते. तेव्हाच आपण नवीन नाती निभावण्यास सक्षम ठरतो.
- **आपल्या स्वप्नांना आवर घालण्याची मानसिकता :** अपेक्षा-प्रतिअपेक्षांच्या गोंधळात प्रत्यक्ष पतीच्या आपल्या नवपरिणीत पत्नीकडून काय अपेक्षा आहेत, ते विचारात घेणे राहून जाते. पती-पत्नी दोघेही समजूतदार असले, मोठ्या, नांदत्या कुटुंबात आलेले असले तर त्यातून एकमेकांच्या चुटपुटत्या भेटींची मजा अनुभवतात. नवीन लग्नानंतर एकांत मिळावा, स्वातंत्र्य असावे अशी अपेक्षा असते. भविष्याविषयी विशेषतः नोकरी-व्यवसायातील महत्त्वाकांक्षा, परदेशात वास्तव्याची इच्छा, आर्थिक गुंतवणुकीविषयी काही अपेक्षा या साऱ्यांची सांगड घालावी लागते. नवीन जोडपे एकमेकांशी कसे वागते आणि बोलते याकडेही घरातल्या सगळ्यांचे बारीक लक्ष असते. अशा वेगवेगळ्या दडपणाखाली आधी पती-पत्नीचेही नाते सुरु होत असते. तर, दुसरीकडे नव्याने सुरू होत असलेल्या नात्याला करिअरमध्ये यशाची शिखरे खुणावत असतात आणि याकरिता आपली भावनिक, मानसिक तयारी करण्याची आपल्यावर जबाबदारी असते.

## लग्नानंतर पती पत्नीच्या नात्यात होणारा बदल

लग्नानंतर आपले नाते अधिक इंन्ट्रेस्टिंग होते पण ब-याच गोष्टी अशाही असतात ज्याचा आपण स्वप्नातही विचार केलेला नसतो. लग्नाआधी जोडप्याच्या असलेल्या इच्छा, आशा-आकांशा, स्वप्न ही काही वेगळीच असतात पण लग्नानंतर ती पूर्ण न झाल्याची रुखरुख मनास लागते. दोघांचीही जगण्याची पद्धत लग्नानंतर पूर्णतः बदलून जाते. आपण बऱ्याच महिलांना असे बोलताना ऐकतो की लग्नानंतर आमचे पतीदेव पूर्णच बदलले आहेत. आता त्यांच्याजवळ माझ्यासाठी जराही वेळ नाहीये. बऱ्याच मुलींचा किंवा मुलांचा हा समज असतो की लग्नाआधी प्रेमात जसे सगळे सुरु होते अगदी तसंच लग्नानंतर देखील सुरु रहावे पण असे काहीही घडत नाही. लग्नानंतर जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांचे ओझे वाढल्यामुळे आणि त्या गोष्टींच खूप बदल झाल्याने प्रत्येक जोडप्याला आपल्या छंद आणि शांततेने सुरु असलेल्या जीवनाशी थोडीफार तडजोड करावी लागते. नवऱ्याला जॉब किंवा व्यवसाय करतानाच कुटुंबीयांकडेही लक्ष द्यावे लागते. तसेच पत्नीला सासू सासरे, मुले बाळे, एकत्र कुटुंबांत राहत असेल तर संपूर्ण कुटुंबीयांची काळजी घेण्यापासून घरातील सर्वच गोष्टींकडे अगदी बारकाईने लक्ष द्यावे लागते. त्यामुळे लग्नानंतर प्रत्येकांच्या जबाबदारीमध्ये वाढ होते.

- **कामाचे विभाजन :** संशोधनातील माहितीनुसार, पती-पत्नी जरी नोकरी करीत असले तरी, यादरम्यान बहुतांश वेळा घरातील बहुतांशी कामे महिलांनाच करावी लागतात. स्वाभाविक यामुळे महिलांवरच कामाचा अधिक ताण निर्माण होतो. यामध्ये महिलांनीच घरातील सर्व काम करावित अशी कुटुंबीयांची अपेक्षा असते. यामुळे महिला जास्त त्रासलेल्या असतात. घरातील कामांमध्ये पतीची मदत मिळावी, अशी प्रत्येक स्त्रीची इच्छा असते. यामुळे तुम्ही देखील तुमच्या जोडीदाराला घरातील कामांमध्ये नक्की मदत करा.
- **आर्थिक जबाबदारी:** तुमच्या घरामध्ये एक माणूस खर्च करणारा तसंच एक बचत करणारा असेल तर कोणत्या प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात, हे तुम्हाला माहिती असेलच. पैसा जमा करणं आणि योग्य पद्धतीने गुंतवणूक करणे एखाद्या व्यक्तीसाठी महत्त्वाचे असू शकते, पण दुसऱ्या व्यक्तीस याची अजिबात काळजी नसते; अशीही उदाहरणे पाहायला मिळतात. पैशावरून जोडप्यांमध्ये मोठे वाद होत असल्याने वैवाहिक जीवनात कित्येक समस्या निर्माण होतात. हे नुकसान टाळण्यासाठी दोघांनी एकत्रित आर्थिक बाबींशी संबंधित निर्णय घ्यावा.
- **मुलांचं संगोपन:** घरामध्ये मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या संगोपनाची जबाबदारी केवळ महिलेचीच नसते. पतीनंही आपल्या मुलाचे योग्य पद्धतीने पालन-पोषण करावे, अशी महिलांची इच्छा असते. उदाहरणार्थ बाळ रात्री

उठल्यानंतर पतीनंही त्याला झोपवण्याचा प्रयत्न करावा. यामुळे तुमच्या पत्नीची झोप पूर्ण होण्यास मदत मिळेल.

- **लैंगिक संबंध:** प्रत्येकाची लैंगिक आवश्यकता वेगवेगळी असते. काही लोकांना जोडीदारासोबत लैंगिक संबंध करणं पसंत असते. पण काही जण या गोष्टीशिवायही जगू शकतात. पण लैंगिक संबंधांमुळे काही जोडप्यांमध्ये टोकाचे वाद होत असल्याचं आढळलं आहे. उदाहरणार्थ पतीने लग्नानंतर लैंगिक संबंध ठेवणे कमी केल्यास पत्नीला मुळीच आवडत नाही. यावरून वाद घालण्याऐवजी दोघांनी ठरवून एकमेकांच्या जवळ येण्याचा प्रयत्न करावा.

- **प्रत्येकाची काळजी घेणे:** लग्नापूर्वी तुम्हाला आपल्या इच्छेनुसार जगण्याचे स्वातंत्र्य होते, परंतु लग्नानंतर तुम्हाला तसे करणे शक्य नाही. तुमच्यासाठी तुमच्या आनंदापूर्वी तुमच्या कुटूंबांचा आनंद महत्त्वाचा असतो. लग्नानंतर मुलगी आपल्या वागण्याने सर्वांच्या हृदयात स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करते. तसेच, सर्वांना आनंदी ठेवण्यासाठी आणि सर्वांची काळजी घेण्यासाठी तुम्हाला खूप कष्ट करावे लागतील. लग्नाआधी मित्रांसोबत बाहेर जाण्याचा विचार करावा लागणार नाही. तुम्ही तुमच्या पालकांना तुमच्या मित्रांसोबत बाहेर जाण्यास सांगितले असेल, पण लग्नानंतर मैत्री मागे राहते. विशेषतः मित्रांसोबत लेट नाईट पार्टीला किंवा दोन-तीन दिवसांच्या टूरवर जाणे शक्य होत नाही. कुठे जायचे असेल तर जोडीदारासोबतच आणि नव्याने निर्माण झालेल्या कुटूंबांच्या संमतीने जावे, अशी अपेक्षा असते.

- **निर्णयांमध्ये नवीन कुटूंबाची स्वीकृती :** हा देखील एक महत्वाचा बदल आहे जो लग्नानंतर मुलीच्या आयुष्यात येतो. लग्नापूर्वी तुम्हाला काही गोष्टींमध्ये तुमच्या आई-वडिलांची परवानगी आवश्यक असली तरी लग्नानंतर प्रत्येक लहान-मोठ्या निर्णयात तुमचा जोडीदार सहभागी असतो. जर तुम्हाला स्वतःसाठी काही करायचे असेल तर तुम्हाला त्याबद्दल तुमच्या जोडीदाराशी बोलणे आवश्यक आहे. तसेच, त्याच्या संमतीनंतरच तुम्ही कोणतेही पाऊल उचलू शकाल.

- **जीवनशैली बदल:** लग्नानंतर प्रत्येक मुलीची जीवनशैली बदलते. अनेक भारतीय घरांमध्ये सुनेसाठी एक प्रकारची संहिता असते. उदाहरणार्थ, घरातील सून साडी किंवा सूटशिवाय काहीही घालत नाही. यामुळे तुमचा पेहराव बदलतो. याशिवाय खाण्याच्या सवयींमध्येही अनेक बदल होतात. तुम्हाला आवडणारा पदार्थ तुमच्या सासरच्या घरातही सगळ्यांनाच आवडला पाहिजे असे नाही, अशा परिस्थितीत तुम्हाला जुळवून घ्यावे लागेल. एवढेच नाही तर लग्नानंतर मुलीच्या झोपण्याच्या आणि उठण्याच्या वेळेत बदल होतो. असे पाहिले तर त्याचे आयुष्य पूर्णपणे बदलून जाते.

- **सुनेची जबाबदारी पार पाडणे :** जेव्हा एखादी मुलगी लग्न होऊन नवऱ्याच्या घरी जाते तेव्हा तिचे नाते केवळ तिच्या आयुष्याच्या जोडीदाराशीच नाही तर सासरच्यांशीही जोडले जाते. मुलीच्या सासूला तिच्या सुनेकडून काही अपेक्षा असतात. तसेच दीर आणि नणंद यांच्याची त्यांच्या वहिनीसाठी काही अपेक्षा असतात. सुरुवातीला तुम्हाला या सर्व गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. तुमच्या आवडीच्या नसलेल्या काही गोष्टीही तुम्हाला कराव्या लागतील. सून म्हणून तुमच्यावर अनेक जबाबदाऱ्या असू शकतात.
- **पतीशी समूजदारपणे वागणे :** जर तुमचे लग्न जुळले असेल, तर तुम्हाला तुमच्या पतीसोबत राहण्यासाठी, त्याचे वागणे आणि मार्ग समजून घेण्यासाठी वेळ लागतो. तुमच्या दोघांचे व्यक्तिमत्त्व आणि आवडीनिवडी जुळत नसतील, पण तुम्हाला त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागेल.
- **काम आणि वैयक्तिक जीवन संतुलित करणे :** लग्नाआधी काम करत असाल तर तितकीशी जुळवाजुळव करायची गरज नसते. कारण तुमची आई घरात कुटुंबाची काळजी घेते. पण लग्नानंतर तुम्हाला तुमच्या कामासोबतच तुमच्या वैयक्तिक आयुष्याचा समतोल साधावा लागेल. नोकरीबरोबर कुटुंबाची काळजी घेणे, घरातील कामे करणे, सासू-सासऱ्यांची काळजी घेणे इत्यादी कामे करावी लागतील. यासाठी तुम्ही या सर्व गोष्टी कशा करायच्या हे आधीच ठरवा.
- **वेळेचा अभाव :** लग्नानंतर नवविवाहित जोडप्याला एकटे राहण्याची संधी मिळत नाही. त्यांचा वैयक्तिक वेळ कमी होते. आजूबाजूला लोक असतात. जर तुम्हाला स्वतःसाठी थोडा वेळ काढायचा असेल, तर तेही कठीण होऊ शकते. यासाठी तुम्ही मानसिकदृष्ट्या तयार असले पाहिजे.

## लग्नानंतर मुलींना संसारात येणाऱ्या समस्या

लग्न म्हणजे दोन जिवांचे मिलन. दोन भिन्न स्वभावाच्या व्यक्ती एकत्र येतात आणि नाते तयार होते. दोन भिन्न व्यक्तीमत्व असूनही त्यांना एक बनवते. जेव्हा एक मुलगा आणि मुलगी लग्न करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात खूप मोठा बदल होतो. विशेष करुन मुलींच्या आयुष्यात खूप मोठे बदल होतात. नवे घर, नवी माणसे आणि आपले आई-वडिल सोडून मुलीला दुसऱ्याच्या घरी जावे लागते. अशामध्ये तिला नव्याने निर्माण झालेल्या नात्यांमध्ये आयुष्य काढावे लागते तसेच सासरची सर्व माणस आपली करुन घ्यावी लागतात. या सर्व गोष्टी होत असताना आणि नव्या आव्हानांना तोंड देताना तिला अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागते. अशा परिस्थितीत तिला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या संर्व समस्यांना तोंड देत तिला पुढील आयुष्य पूर्ण करावे लागते.

- **सुनेची जबाबदारी पार पाडणे :** ज्यावेळी मुलगी लग्न होऊन आपल्या घरी जाते, तेव्हा तिच्या समोर सुनेची जबाबदारी पार पाडणे हे सर्वात मोठे आव्हान असते. तसेच नवऱ्याची जबाबदारी, सासू-सासरे आणि घरचे दीर-जाव यांचा मान सन्मान. त्यांच्या आवडीनिवडी या सर्व गोष्टी जबाबदारीने पार पाडाव्या लागतात. तसेच घरातील मंडळींना देखील अनेक गोष्टींची सुनेकडून अपेक्षा असते. ते देखील सांभाळणे फार कठिण होते. अशा एक ना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

- **पतीच्या आवडीनिवडी जपणे:** अनेकदा आपल्याला ज्याच्यासोबत आपणास आयुष्य काढायचे आहे, त्याच्या आवडीनिवडी आपणास माहिती नसतात. त्यात लग्न घरच्यांनी ठरवून दिलेले असेल तर ते अधिकच कठिण होते. अशा व्यक्तीच्या आवडीनिवडी आणि स्वभाव समजवून घेण्यास थोडा वेळ लागतो. असे देखील होऊ शकते की, त्यांच्या आवडीनिवडी तुमच्या सोबत जुळत नसतील, तरी देखील स्वतःच्या स्वभावाला मुरड घालून तुम्हाला पतीशी जुळवून घेणे गरजेचे असते. अन्यथा सुरवातीपासुनच संघर्षाला सुरवात होते.

- **निर्णयांमध्ये नवीन कुटंबाची स्वीकृती :** लग्नानंतर मुलीच्या आयुष्यात होणारा महत्वाचा बदल म्हणजे कोणत्याही निर्णयामध्ये कुटूंबाची स्विकृती घेणे. लग्नापूर्वी तुम्हाला काही गोष्टींमध्ये तुमच्या आई-वडिलांची परवानगी आवश्यक असली तरी लग्नानंतर प्रत्येक लहान-मोठ्या निर्णयात तुमचा जोडीदार सहभागी असतो. जर तुम्हाला स्वतःसाठी काही करायचे असेल तर तुम्हाला त्याबद्दल तुमच्या जोडीदाराशी बोलणे आवश्यक आहे. तसेच, त्याच्या संमतीनंतरच तुम्ही कोणतेही पाऊल उचलू शकात.

- **जीवनशैलीत बदल:** लग्नानंतर प्रत्येक मुलीची जीवनशैली बदलते. अनेक भारतीय घरांमध्ये सुनेसाठी एक प्रकारची संहिता असते. उदाहरणार्थ, घरातील सून साडी किंवा सूटशिवाय काहीही घालत नाही. यामुळे तुमचा पेहराव बदलतो. याशिवाय खाण्याच्या सवयींमध्येही अनेक बदल होतात. तुम्हाला आवडणारा पदार्थ तुमच्या सासरच्या घरातही सगळ्यांनाच आवडला पाहिजे असे नाही, अशा परिस्थितीत तुम्हाला जुळवून घ्यावे लागेल. एवढेच नाही तर लग्नानंतर मुलीच्या झोपण्याच्या आणि उठण्याच्या वेळेत बदल होतो. असे पाहिले तर त्याचे आयुष्य पूर्णपणे बदलून जाते.

- **कामासोबत वैयक्तिक आयुष्याचा समतोल राखणे :** तुम्ही लग्नापूर्वी नोकरी करत असाल तर तुम्हाला तितकीशी जुळवून घेण्याची गरज नसते. कारण आई ही संपूर्ण घराची आणि कुटुंबातील सर्व सदस्यांची काळजी घेते आणि जबाबदारी सांभाळत असते. जेव्हा तुम्ही लग्नानंतर नवीन घरात प्रवेश करता तेव्हा, तुम्ही नोकरी करत असाल आणि तुम्हाला घर सांभाळणे थोडे कठिण जाते. अशावेळी नोकरी, घर, संसार आणि घरातील सर्व सदस्यांची काळजी हे सर्व सांभाळणे

थोडे कठिण जाते. लग्नानंतर तुम्हाला वैयक्तिक आयुष्यासोबतच तुमच्या कामाचा समतोल साधावा लागतो. नोकरीबरोबरच घरातील कामे आणि सासू-सासरे यांची काळजी घेणे इत्यादी गोष्टींची काळजी घ्यावी लागते. यासाठी तुम्ही या सर्व गोष्टी कशा करायच्या हे आधीच ठरवायला हवे. अन्यथा या सर्व कसरती पार पाडणे कठिण होऊन बसते.

- **एकमेकांसाठी वेळ काढणे महत्त्वाचे:** अनेकदा असे होते की, लग्नानंतर संपूर्ण कुटुंबात रहावे लागते. अशावेळी कपल्सना एकमेकांना वेळ देता येत नाही. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. पण, एकमेकांना वेळ देणे फार महत्त्वाचे आहे. कारण यामुळे दोघांमध्ये वाद होण्याची देखील शक्यता असते. त्यामुळे सर्व गोष्टी सांभाळून एकमेकांना वेळ देणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

## वैचारिक बदलाची गरज

संसार हा मानला तर, संघर्ष, नाहीतर स्वर्ग आहे.  हे सर्व तुमच्या हाती आहे की, तुम्ही संसारातील समस्यांचा कशाप्रकारे सामना करतात. काही जोडपी लग्नानंतर काहीच काळातच वादाची शिकार होतात तर काही जोडपी नाते घट्ट ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपल्या इच्छांचा त्याग  करुन तडजोड करतात. लग्नानंतरचे सुरुवातीचे दोन वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. या सुरुवातीच्या काळात काही जोडपी एकमेकांना समजून घेण्यासाठी व खुश राहण्यासाठी एकमेकांच्या जास्तीत जास्त सहवासात राहतात तर, काही जोडपी जबाबदाऱ्या व कर्तव्याच्या ओझ्याखाली दबून गेल्यासारखी राहू लागतात. परंतु, एक मात्र सत्य  संसारातील सर्व समस्यांवर तुम्हाला दोघांनाच मार्ग काढावयाचा असतो. त्यावर एकमेकांवर विश्वास ठेवून तुम्ही काय विचार करतात यावरच तुमचे यश अवलंबून आहे.  या विचारामध्ये पुढील मुद्यांचा समावेश केला तर, तुम्ही तुमचा संसार नक्कीच स्वर्ग बनवू शकता.

- **सर्वांशी प्रेमाने वागा:** लग्नानंतर पहिले दोन वर्षे प्रत्येक जोडपे आपले नाते घट्ट करण्यासाठी प्रयत्नशील असतात यात काहीच शंका नाही. या काळात पती-पत्नी एकमेकांना तसेच  नव्याने निर्माण झालेल्या नात्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. याच काळात त्यांना एकमेकांच्या माहित नसलेल्या सवयी देखील त्यांना कळतात. प्रेमविवाह केलेल्या जोडप्यांना एकमेकांमधील चांगल्या-वाईट सवयी माहित असतात तर अरेंज्ड मॅरेजमध्ये याच्या एकदम उलट असते. अशावेळी आपल्या जोडीदाराची किंवा नव्याने निर्माण झालेल्या नात्यातील एखादी सवय खटकू लागल्यास त्यावरुन वाद घालत बसण्यापेक्षा प्रेमाने संवाद साधा व समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा.

- **नात्याची सुरुवात सकारात्मकतेने करा :** प्रत्येक नात्यांमध्ये  चांगल्या आणि काहीशा मनाला न पटणाऱ्या गोष्टी असतात. पण सुरवातीलाच तुम्ही त्यांच्या

मनाला न पटणाऱ्या गोष्टीं केल्या की, वैचारिक संघार्षाला सुरवात होते, त्यांपेक्षा आपण आपल्या विचारांना मुरड घालून नाते टिकविण्याचा प्रयत्न केल्यास तर, संघर्ष टाळता येतो. याकरिता प्रत्येक नात्यांची सुरवात सकारात्मक विचारांनी करा. यामुळे आपल्या जोडीदाराच्या मनात आपली चांगली प्रतिमा निर्माण करू शकाल. यामध्ये एकमेकांसोबत आनंदाने जीवन जगण्याचा व एकत्र काही नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळते. यामुळे तुमच्या सकारात्मक विचाराचा परिणाम तुमच्या कुटूंबावर झालेला दिसून येईल.

- **नात्यातील रोमांस जिवंत ठेवा:** लग्न झाल्यानंतरचा काही काळ हा हनिमून असल्यासारखा असतो. हनीमून काळ संपल्यानंतर काही जोडप्यांना पुन्हा एकदा पहिल्यासारखे जीवन रटाळ वाटू लागते. काही जोडपी हे विसरुनच जातात की सांसारिक जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यासोबतच रोमांस जिवंत ठेवणेही गरजेचे असते व हे शक्यही होऊ शकते. याकरिता तुम्ही दोघांनीही समस्याचे ओझे डोक्यावर घेण्यापेक्षा आनंदाने आयुष्य जगण्यावर भर द्या. एकमेकांना वेळ दिल्याशिवाय आणि आनंदाचे देवाण घेवाण केल्याशिवाय रोजच्या रटाळवाण्या जीवनात काहीतरी नाविन्यपूर्ण अनुभवता घेता येत नाही.

- **संवाद कायम राखा:** लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात अनेक जोडपी विविध कारणांमुळे एकमेकांशी संवाद साधणं टाळतात. जे की त्यांच्या संसारात गैरसमजांना निमंत्रण देऊ शकतं. संवाद आटल्यास पुढे जाऊन नातं खिळखिळं होऊ शकतं हे अनेक जोडपी विसरुनच जातात. त्यामुळे या काळात दूर पळण्यापेक्षा, वाद घालण्यापेक्षा, संवाद टाळून रुसून बसण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याचा प्रत्येक जोडप्याने प्रयत्न करावा. संवाद ही सुखी नात्याची पहिली पायरी असते जी पार करणं सोपं नसतं.

- **एकमेकांना वेळ द्या:** लग्नानंतरचा सुरुवातीचा काळ असा असतो ज्यामध्ये तुम्ही नातं घट्ट करण्यासोबतच एकमेकांच्या मनात आपला आदर रुजवू शकता. बहुतांश जोडपी लग्न झाल्यानंतर ऑफिसच्या कामात स्वतःला जुंपून टाकतात याचा प्रभाव नव्याने सुरु झालेल्या सांसारिक आयुष्यावर पडू शकतो. यामुळे एकमेकांना जाणून घेण्याची संधीच मिळत नाही व यामध्ये एकमेकांविषयी चुकीचे समज बनवून पार्टनर तसं वागू लागण्याची शक्यता अधिक असते. शिवाय आपल्यासाठी जोडीदाराला वेळच नाही ही भावना मनात असुरक्षितता व नकारात्मक भावनांना खतपाणी घालू शकते. म्हणून लग्नाच्या सुरुवातीलाच नाही तर आयुष्यभर आपल्या जोडीदाराला भरपूर वेळ द्या व नाते. सजीव ठेवण्याचा प्रयत्न करा.

*******

**प्रकरण ११ वे**

# लिव्ह इन  रिलेशनशीप नव्या युगातील नाते

*आजही भारतीय समाजव्यवस्थेत विवाहसंस्थेला पूर्वीइतकेच महत्त्व आहे. परंतु, आधुनिक युगामध्ये नव तरुण लिव्ह इन'कडे आकर्षित होताना दिसत आहे.  समाज व्यवस्थेचे आधुनिकीकरण आणि व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि आर्थिक आत्मनिर्भरतेमुळे आजच्या युवा युवतीने लग्नाचे ओझे स्विकारण्याऐवजी लिव्ह इन रिलेशनशीपचा मार्ग स्विकारला आहे आणि भारतातसुध्दा उच्च आर्थिक समुदायातील गटामध्ये अशा प्रकारे स्त्री-पुरुषांनी एकत्र राहण्याच्या प्रकारला सुरवात झाली आहे.  अर्थातच जे समाजात  घडते त्याचे प्रतिबिंब कायदा आणि  पर्यायाने न्यायव्यवस्थेतसुध्दा दिसून येते. भारतात लिव्ह इन  रिलेशनशीपवर असा कोणताही कायदा नाही. अशा प्रकारातील विवाहाच्या संबंधात निर्माण झालेल्या प्रश्नावर  सर्वोच्च न्यायालय आणि राज्यातील उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या माध्यमातून भारतात अशा प्रकारातील विवाहाच्या संबंधात कायद्याची एक रुपरेषा तयार झाली आहे आणि उत्तराखंड राज्याने सर्वात प्रथम या विवाहाच्या संबंधात कायदा तयार केला आहे. भारतीय संविधानाने मिळालेल्या अधिकारानुसार अठरा वर्ष पूर्ण झालेली कोणतीही व्यक्ती आपल्या पार्टनरसोबत लग्न न करता राहू शकते. मुलगा आणि मुलगी किंवा समलैंगिक पार्टनर्स देखील लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहू शकतात. लग्न न करता एकत्र राहण्याच्या पद्धतीला 'लिव्ह इन रिलेशनशिप' असे म्हटले जाते. आणि ही बाब भारताच्या भारतीय सर्वोच्च न्यायालय मान्य केली असल्यामुळे या संबंधाला एक प्रकारे कायदेशीर मान्यता दिली आहे.*

## सर्वोच्च न्यायालयाची नियमावली

सर्वोच्च न्यायालयाने  २०१३ मध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांकरिता एक नियमावली तयार केली आहे. या नियमावली अनुसार, दीर्घकाळापासून एखादे जोडपे एकत्र राहत असतील आणि त्या नात्याला टिकाऊ स्वरुप असल्यास तर, ते नाते पती पत्नी असल्याचे ग्राह्य धरले जाईल. याचा कालावधी न्यायालयाद्वारे ठरवण्यात येईल. जर रिलेशनशिपमध्ये असलेले दोघेही एकत्र राहून आर्थिक व्यवहारांसोबत इतर व्यवहार करत असतील, तर ते कपल लिव्ह इनमध्ये आहे असे म्हटले जाईल. मुंबईसारख्या महानगरांमध्ये बहुतांश लोक लिव्ह इनमध्ये राहणे पसंत करतात. काही सेलिब्रिटी सुद्धा लग्नाच्या बंधनात न अडकता लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत आहेत. लिव्ह इन रिलेशनशिप म्हणजे काय? सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार,  दोन प्रौढ (मुलगा आणि मुलगी) लग्न

न करताही स्वतःच्या इच्छेने कौटुंबिक-वैवाहिक जीवन जगू शकतात. विधीमंडळ लिव्ह इन रिलेशनशिपलाही वैध मानते, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. २०१३ मध्ये सुप्रीम कोर्टाने लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. यानुसार, जे संबंध प्रदीर्घ काळापासून सुरू आहेत, ते टिकून राहण्यासाठी पुरेसे असावेत, हे न्यायालय ठरवेल. जर दोन्ही भागीदार त्यांची आर्थिक आणि इतर प्रकारची संसाधने आपापसात दीर्घकाळ वाटून घेत असतील, तर या नात्याला लिव्ह-इन देखील म्हटले जाईल. याकरिता न्यायालयाने खालील नियमावली जाहीर केली आहे.

१. कोणतीही विवाहित व्यक्ती लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहू शकत नाही.
२. सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, लिव्ह-इन रिलेशनशिप आता भारतात बेकायदेशीर नाही.
३. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या दोन पौढ व्यक्ती लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असू शकतात.
४. जर विवाहित व्यक्ती लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असेल तर ते कायद्यानुसार चुकीचे असेल.
५. विवाहित व्यक्ती पती किंवा पत्नीपासून घटस्फोट घेतल्यानंतरच लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहू शकते.
६. लिव्ह-इन मॅरेजमध्ये राहणाऱ्या जोडप्यास मुले होऊ शकतात, परंतु ते मूल दत्तक घेऊ शकत नाहीत.
७. लिव्ह-इनमध्ये जन्मलेल्या मुलांना सर्व कायदेशीर अधिकार मिळतात.

**अशा जोडप्याला खालील अधिकार प्राप्त होतात.**

- **शारीरिक संबंध ठेवण्याचा अधिकार :** लिव्ह-इन रिलेशनशिपच्या कायदेशीर मान्यतेनुसार, दोन्ही व्यक्तिंमध्ये लैंगिक संबंध ठेवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. रिलेशनशिपमध्ये लैंगिक संबंध ठेवण्याची इच्छा आणि मुले न होण्याच्या दोन्ही अटीवर अवलंबून असते. महिलांच्या सुरक्षेचा विचार करून काही लिव्ह-इन रिलेशनशिप कायदे करण्यात आले आहेत. यासह, केवळ सेक्ससाठी एखाद्या मुलीसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर पुरुष तिला सोडू शकत नाही. तसे केल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या महिलांना ते सर्व कायदेशीर अधिकार आहेत, जे भारतीय पत्नीला घटनात्मकदृष्ट्या दिलेले आहेत.
- **घरगुती हिंसाचारापासून संरक्षण:**लिव्ह-इनमध्ये राहिल्यानंतर जर एखादा मुलगा त्या मुलीला सोडून गेला, तर तिला वरील सुविधा मिळण्यासाठी न्यायालय काम करेल. यासाठी पीडित मुलीला लिव्ह इनमध्ये असल्याचा

पुरावा, विशेषतः आर्थिक व्यवहारांचे कागद न्यायालयासमोर सादर केले असता त्या व्यक्तीला घरघुती हिंसाचार कायद्याअंर्तगत संरक्षण मिळू शकते.

- **फसवणूकीविरुध्द संरक्षण :** जर कोणी पुरुष लिव्ह इन रिलेशनमध्ये राहत असेल तर त्याने पत्नी प्रमाणेच त्या महिलेची सर्व जबाबदारी घेणे आवश्यक आहे. तसेच, जर तुम्ही फसवणूक न करता, म्हणजे परस्पर संमतीने संबंध तोडले तर न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे दंड आकारला जाऊ शकतो.

- **न्यायालयीन संरक्षण :** ज्या प्रमाणे विवाहीतेला घटस्फोट घेण्यासाठी न्यायालयात अर्ज करावा लागतो, त्याप्रमाणे लिव्ह अँण्ड रिलेशनशीपमध्ये ब्रेकअप झाल्यानंतर जोडप्याला घटस्फोट घेता येतो आणि पुरुषांना पोटगी म्हणून ठराविक रक्कम महिलेस द्यावी लागते. रिलेशनशिपमध्ये असलेले कपल ब्रेकअप करुन नाते संपवण्याचा निर्णय घेत असतील, तर त्यांना न्यायालयामध्ये जावे लागेल. त्यांना न्यायालयाद्वारे मिळालेल्या निर्णयानुसार दंड भरावा लागू शकतो.

- **पोटगी मागण्याचा अधिकार :** जर एखादी स्त्री काही दिवस सोबत राहिल्यानंतर पुरुषापासून विभक्त झाली आणि देखभालीची मागणी करत असेल तर ते चुकीचे ठरेल. पोटगीसाठी, लिव्ह-इन रिलेशनशिप अनेक वर्षांसाठी असावी. त्यांच्यासाठी एकाच छताखाली एकत्र राहणे आणि शारीरिक संबंध ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. भागीदाराच्या मृत्यूनंतर पोटगी दिली जाणार नाही. जर रिलेशनशिपवर प्रश्न निर्माण झाल्यास तर, लिव्ह-इन सिद्ध करण्याकरिता तुमच्याकडे ठेवा. भाडे करार, संयुक्त बँक खाते, भागीदारी व्यवसाय किंवा जैविक मुलाचे तपशील इत्यादी महत्त्वाची कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

- **महिला जोडीदाराची देखभाल करणे :** सर्व वैयक्तिक कायद्यांतर्गत महिलांना पालनपोषणाचा अधिकार देण्यात आला आहे, मात्र लिव्ह-इन रिलेशनशिप कोणत्याही धर्माने मान्य केलेली नाही, त्यामुळे या नात्यात गुंतलेल्या महिलेला धर्मातून कोणतीही सूट मिळत नाही. परंतु महिलेच्या कायदेशीर हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयाने तिला गुन्हेगारी प्रक्रिया कायद्याच्या कलम १२५ अंतर्गत अधिकार दिले आहेत जेणेकरून ती स्वतःला हिंसाचारापासून वाचवू शकेल.

- **मुलांशी संबंधित अधिकार :** जर भागीदार बऱ्याच काळापासून एकमेकांसोबत राहत असतील तर त्यांना मूल होऊ शकते परंतु दत्तक घेता येत नाही. लिव्ह-इन विवाहातून जन्मलेल्या मुलांना विवाहातून जन्मलेल्या मुलांप्रमाणेच हक्क मिळतात आणि हिंदू विवाह कायद्याच्या कलम १६ मध्ये या अधिकारांचा उल्लेख आहे.

- **मुलाचा ताबा:** वेगवेगळ्या धर्मात मुलाच्या ताब्याबाबत वेगवेगळे नियम आहेत, जसे हिंदूमध्ये, वडील मुलाला ठेवतात आणि मुस्लिमांमध्ये, वडील मुलाच्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त असतात.
- **अपत्याला संपत्तीचा अधिकार :** लिव्ह इन रिलेशनमध्ये जन्माला आलेल्या मुलांनाही वडिलांच्या संपत्तीत हक्क मिळेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. २००९ मध्ये केरळ उच्च न्यायालयाने दिलेला एक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. न्यायालयाने तरुणाला त्याच्या वडिलांच्या मालमत्तेत हक्क मान्य केला नव्हता कारण त्याच्या पालकांचे लग्न झाले नव्हते आणि ते लिव्ह इन मध्ये राहत होते. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. जर स्त्री आणि पुरुष दीर्घकाळ एकत्र राहत असतील, तर ते लग्न मानले जाईल आणि या नात्यातून जन्मलेल्या मुलांनाही वडिलांच्या मालमत्तेत हक्क मिळेल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

## लिव्ह इन रिलेशनशिप योग्य की अयोग्य

भारतीय समाज हा पुरुषप्रधान समाज आहे आणि हे विवाहसंबंध म्हणजे त्याच पुरुषप्रधान समाजाची संकल्पना आहे ज्यात सर्व हक्क फक्त पुरुषांनाच मान्य आहेत आणि ठरवले जातात. यामुळेच पतीपत्नीच्या या नात्यांमध्ये स्त्रियांची भूमिका नगण्य असून पुरुषांचे वर्चस्व नेहमीच अधिक राहीले आहे. लैंगिक संबंध पती पत्नीच्या संबंधातील एक नैसर्गिक धागा आहे आणि विवाह म्हणजे या लैंगिक संबंधांचे सामाजिकीकरण आहे. बदलत्या काळानुसार प्रत्येक क्षेत्रात बदल होत गेले आणि आपला समाजही यापासून दूर राहीलेला नाही. बदलत्या सामाजिक विचारातील बदलांमुळे स्त्री-पुरुषांचा परस्परच्या संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत गेला. लिव्ह इन रिलेशनशीप हे आधुनिक समाजाने निर्माण केलेले समाजव्यवस्थेचे नवीन वैचारिक प्रारुप आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत प्रत्येकाची स्वतःची विचारसरणी आहे. समाजातील परंपरावादी लोक या नात्याच्या विरोधात आहेत तर, काही आधुनिक विचारसणीच्या लोकांनी या व्यवस्थेचा स्विकार केला आहे. भारतीय विचारसरणीनुसार, लग्न करुन सामाजिक मान्यता मिळाल्यानंतरच स्त्री-पुरुषांना एकत्र राहण्याचा अधिकार आहे. लग्न न करता एकत्र राहणे आणि लैंगिक संबंध प्रस्तापित करणे हे समाज मान्यतेच्या विरोधात आहे. बदलत्या काळानुसार स्त्री-पुरुषांनी लिव्ह-इन रिलेशनशिपकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलत आहे.

## लग्न आणि लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये फरक

- **विवाह:** विवाह सामाजिक आणि कायदेशीररित्या स्वीकारला जातो आणि दोन भागीदारांमधील एक करार आहे आणि दोन्ही भागीदारांची एकमेकांबद्दल कायदेशीर कर्तव्ये आहेत. लग्नादरम्यान दोन जोडीदारांमध्ये वाद झाले तर ते

सोडवण्यासाठी वेगवेगळे नियम बनवले जातात. जर पत्नी स्वतःची देखभाल करू शकत नसेल तर कलम १२५ मध्ये एक नियम आहे ज्यानुसार तिला अतिरिक्त मेन्टेनन्स मिळू शकते.

- **लिव्ह इन रिलेशनशिपः** या संबंधामध्ये असा कोणताही कायदा नाही जो अविवाहित जोडीदारांना एकमेकांना बांधू शकेल, त्यामुळे या प्रकरणात भागीदार त्यांना पाहिजे तेव्हा एकमेकांना सोडून जाऊ शकतात. या नात्याची कोणतीही कायदेशीर व्याख्या नाही, त्यामुळे या प्रकारच्या नात्याची कायदेशीर स्थिती देखील पुष्टी केलेली नाही. प्रौढ आणि कुमारी पुरुष आणि प्रौढ आणि कुमारी स्त्री यांच्यातील घरगुती संबंध आहे आणि ते त्यांच्या स्वतःच्या इच्छेनुसार लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहतात.

## लिव्ह इन रिलेशनशिपचे फायदे आणि तोटे

भारतात लिव्ह इन रिलेशनशिपची संस्कृती फार वेगाने वाढत आहे. आजकाल आपल्या घरापासून दूर राहिलेल्या मित्र अथवा पार्टनर्स लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणे पसंद करतात. त्याचसोबत लिव्ह इन रिलेशनशिप बद्दल खुलेआम चर्चा केली जाते. परंतु जसे लिव्ह इन रिलेशनशिपचे फायदे आहेत, त्याचप्रमाणे त्याचे नुकसान सर्वाधिक आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपबद्दल अनेकदा लोकांच्या मनात गैरसमज असतात. प्रत्येकाला वाटते की, हे सिनेमात दाखवतेय तितके सोपे आहे पण, तस नाही. लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत पूर्णवेळ असाल असे सामान्यतः मानले जाते. या नात्याला रोमान्ससाठी जास्त वेळ देवू शकता. पण ही विचारसरणी बदलण्याची गरज आहे. दोन लोक एकमेकांसोबत कोणत्याही नात्याने सोयीस्करित्या एकत्र राहत असतील तरीही त्यांच्या नातेसंबंधामध्ये बांधिलकी असतेच. प्रत्येक नात्यामध्ये फायदे आणि तोटे असताच. त्याला टाळता येत नाही. हाच नियम लिव्ह इन रिलेशनशिपला लागू होतो.

### लिव्ह इन रिलेशनशिपचे फायदे

- **लग्नाचा निर्णय घेण्यास अधिक वेळ मिळतो :** प्रेम प्रकरणामध्ये तुम्हाला एकमेकांसोबत वेळ घालविण्याकरिता मर्यादा येतात. रिलेशनशिप असतांना जोडप्यांना अधिक वेळ मिळतो. त्यामुळे जोडप्याला लग्नाचा योग्य निर्णय घेण्यास मदत होते. हे जोडप्यांना त्यांच्या नात्यातील बारकावे शोधण्यासाठी मदत करतात. तुम्ही एकमेकांना किती ओळखता, एकमेकांना किती समजता, समजून घेता, हे सगळं तुम्हाला लिव्ह-इनमध्ये असताना कळते. तुम्ही लिव्ह-इनमध्ये राहण्याचा विचार करत असाल, तर हे फायदे आणि तोटे लक्षात ठेवा. याचा कदाचित तुम्हाला फायदा होईल.

- **एकमेकांना समजून घेण्यास वेळ मिळतो.** : डेट आणि मूव्ही मीटिंगमध्ये तुम्ही एकमेकांना कितीही ओळखत असला तरी लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये तुम्हाला एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत होते. एकमेकांचे आवडते खाद्यपदार्थ, आवडता चित्रपट आणि संगीत विषयातील आवड यांसारख्या बारकावेही तुम्ही जाणून घेवू शकता. एकाच घरात राहिल्याने जोडप्यांना एकमेकांच्या सवयी, जीवन आणि बरेच काही जाणून घेण्यास मदत होते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचा सर्वाधिक मोठा फायदा असतो की, पार्टनर्स एकमेकांना उत्तमपणे समजून घेऊ शकतात. दोघे ही आनंदाने राहू शकतात. त्याचसोबत जेव्हा त्यांना वाटेल तेव्हा परिवाराच्या परवानगीने लग्न सुद्धा करु शकतात. या व्यतिरिक्त लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहताना तुमचे एकमेकांसोबत पटले नाही तर तुम्ही एकमेकांपासून विभक्त होऊ शकता. यासाठी त्यांना कायदेशीर लढाईला सामोरे जावे लागत नाही.
- **खर्च कमी होतो :** तुम्ही विचार करत असाल की, एक व्यक्ती वाढली तर खर्च कसा कमी होईल आणि वाढेल. परंतु तुम्ही एकत्र राहत असाल तर खर्च वाढणार नाही तर खर्च विभागला जातो, ज्यामुळे तुमचा दोघांचा फायदा होतो. तुम्ही घर भाडे, वीज बिल आणि घरगुती उपयोगिता बिले शेअर करू शकता.
- **तुम्हाला कंटाळा येणार नाही :** आठवड्याच्या शेवटी तुमच्या खोलीत एकटे पडून तुम्हाला कंटाळा आला असेल तेव्हा तुमच्या भावना समजू शकतो. त्यामुळे अशावेळी तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत फिरत असाल तर कंटाळा येण्याची शक्यता कमी असते. कारण तुम्हाला दोघांनाही एकमेकांची साथ आवडते. तुम्हाला आवडत असलेल्या प्रत्येक गोष्टी एकमेकांच्या सोबतीने करु शखता.

**लिव्ह इन रिलेशनशिपचे तोटे** -

- **लग्नानंतरचा उत्साह कमी होऊ शकतो :** तुम्ही लिव्ह-इन नंतर लग्न करण्याचा विचार करत असाल तर हे फक्त तुमच्यासाठी आहे. कधी-कधी एकत्र राहण्यामुळे लग्नानंतर तुमच्या नात्यात मिळणारी छोटीशी सरप्राईज हिरावून घेतली जाते. लिव्ह इन रिलेशनशिपमुळे लग्नानंतरचा उत्साह कमी होऊ शकतो.
- **भांडणे वाढू शकतात:** २४ तास एखाद्याच्या सोबत राहणे म्हणजे दुरावा निर्माण होतो. पण कधी-कधी एकाच व्यक्तीसोबत राहून तुम्ही नाराज आणि चिडचिड करता, त्यामुळे भांडणे होतात तर कधी नाते तुटते.

- **फसवणूक होण्याची शक्यता जास्तः** अनेकवेळा असे घडते की, जेव्हा जोडीदारावर तुम्ही विश्वास ठेवता आणि तुम्ही त्याच्यासोबतचे नाते पुढे नेले नाते, तेव्हा अशा नात्यात बांधिलकीचा हेतू नसतो. त्यामुळे जर तुमच्या पार्टनर लिव्ह-इन रिलेशनशिपनंतर ब्रेकअप झाला तर, अशा नात्यामध्ये खूप तणाव आणि नैराश्याचा सामना करावा लागू शकतो. अशा नात्यामध्ये मुलींना अनेकदा या समस्येचा सामना करावा लागतो.

- **पार्टनर सोडून जाण्याची भिती :** लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणे म्हणचे लग्न केलेच पाहिजे असे नाही. काहीवेळेस एकमेकांची वागणूक पटली नाही तर त्यामुळे पार्टनर तुम्हाला कधी सोडून जाईल याची भीती मनात असते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहताना जर मुलं जन्माला घातल्यास तर ही भिती मोठ्या प्रमाणात वाढते. कारण समाजात अशा मुलाला स्विकार करताना विचार करतात.

*******

प्रकरण १२ वे

# विवाहबाह्य संबंध विवाहीत जीवनातील समस्या

*विवाहीत जीवनामध्ये नवरा-बायकोच्या नात्यात प्रेम, काळजी, जिव्हाळा व विश्वास असणे महत्त्वाचे आहे. नात्यात प्रामाणिकपणा असेल, तर ते नाते अधिक काळ टिकते. 'लव्ह मॅरेज' असो की 'अरेंज मॅरेज' असो; हल्ली विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण वाढले आहे. विवाहित असताना पुरुष किंवा स्त्री अन्य पुरुष किंवा स्त्रीबरोबर संबंध ठेवत असेल, तर त्याला विवाहबाह्य संबंध म्हणतात. कोणतेही नाते मजबूत करण्यासाठी सर्वात आधी त्यात प्रेम असायला हवे. लग्न करताना नवरा-बायको एकमेकांवर खूप प्रेम करण्याची आणि एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतात आणि तसा प्रयत्न देखील करतात. पण असे असले तरी देखील आयुष्यात बऱ्याचदा अशा काही गोष्टी घडतात, ज्यामुळे लोक लग्न झाल्यानंतर सुध्दा दुसरा जोडीदार शोधतात किंवा नकळत त्याच्या प्रेमात पडतात. अशा व्यक्तीबद्दल आपूलकी वाटू लागते. आजच्या काळात महिला किंवा पुरुष तासनतास कामात घराबाहेर असतात. अशावेळी त्यांच्यासोबत काम करणारा त्यांचा सहकारी त्यांच्यासोबत जास्त वेळ घालवतो. ज्यामुळे त्या व्यक्तीकडे आकर्षित होऊन अनेक लोक विवाह बाह्य संबंध ठेवतात. विवाहित असताना पुरुष किंवा स्त्री अन्य पुरुष किंवा स्त्रीबरोबर संबंध ठेवत असेल, तर त्याला विवाहबाह्य संबंध म्हणतात. विवाहबाह्य संबंध लव्ह मॅरेज किंवा अरेंज मॅरेज या दोन्ही प्रकारांत दिसून येतात. विशेष म्हणजे विवाहबाह्य संबंध फक्त शारीरिक संबंधाशी निगडित नाहीत. एखादी व्यक्ती जेव्हा भावनिकदृष्ट्या समोरच्या व्यक्तीबरोबर कनेक्ट असेल, तर ते नातेसुद्धा विवाहबाह्य संबंधात असू शकते.*

## विवाहबाह्य संबंधांचे कारणे

बदलाच्या जीवन शैलीत आणि जीवघेण्या स्पर्धेच्या काळात लोकांना रिलेशन मध्ये राहणे आवडते. कारण मानवी शरीराची महत्वाची निकड म्हणजे सेक्स असून विवाहित जीवनात ही माणसाची सेक्सची गरज भागली नाही की, माणसे विवाह बाह्य प्रेम संबंध ठेवतात. लोक विवाह बाह्य संबंध का ठेवतात अशा विवाह बाह्य संबंध ठेवण्याच्या कारणांचा शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

- **लग्नाआधीचा भूतकाळः** लग्नाच्या अगोदर कोणाचे तरी कोणावर प्रेम असतेच असते. काही कारणामुळे आपण आपल्या प्रेयसी व प्रियकरा सोबत विवाह करू शकत नाही अशा वेळी ती दोन माणसे आपल्या प्रिय लग्नाआधीच्या जोडीदाराला गुप्तपणे भेटून आपसात सुख दुःख वाटत असतात. तसेच त्या दोन युगुलांची

लग्नाअगोदर पासून जर लैंगिक संबंध प्रस्तापित झाले असेल तर, ती वीण लग्नच काय अन्य कोणत्याही बंधनाने उसवू शकत नाही. म्हणून विवाहित स्त्री किंवा पुरुष यांच्या आयुष्याच्या भूतकाळात काय घडले आहे हे विवाह बाह्य संबंधाचे ठोस कारण होऊ शकते.

- **वैवाहिक जीवन सुखी नसणे :** निसर्ग सगळ्यांना एक सारखे बनवत नाही त्यामुळे काही वैवाहिक जोडप्यांमध्ये लैगिक समस्या असतात त्याचे पर्यावसन विवाह बाह्य प्रेम संबंधात होते. यात ते संबंध ठेवण्याऱ्या लोकांना दोषी मानता येत नाही. कारण माणसाच्या आयुष्यात सेक्स नावाची पण एक भूक असते ही गोष्ट आपण मानली पाहिजे. त्यामुळे विवाह बाह्य संबंधांना कोणीही रोखू शकत नाही. म्हणून यातून होणाऱ्या विघातक कृतींना रोखणे देखील तितकेच महत्वाचे आहे.
- **मानसिक एकटेपण :** माणूस हा समाजशील प्राणि आहे त्याच्या आयुष्यातील बाब म्हणजे त्याला कोणाच्या तरी आधाराची आवश्यकता असते. म्हणूनच माणसाने एकटेपणाला घालवण्यासाठी बऱ्याच वेळा विवाहबाह्य संबंध जोडल्याचे आपणास पाहण्यास मिळते. तर वैवाहिक जोडीदार आपल्या पासून दूर राहत असल्यास संभोगाचे विचार मनात येऊन सुद्धा वैवाहिक व्यक्ति विवाह बाह्य संबंधांकडे वळू शकतो.
- **शारीरिक आवश्यकता :** माणसाला एखाद्या आजाराने ग्रासलेले असेल तर माणूस खंगत जातो. त्याचे शारीरिक आणि मानसिक स्वाथ्य बिघडते. त्याच प्रमाणे मानवी शरीराला सेक्सची आवश्यकता असते. सेक्सच्या आवश्यकतेची पूर्तता झाली नाही कि माणसे विवाह बाह्य संबंधांकडे वळतात.
- **नात्यातील भावनिक दुरावा:** जर नात्यात प्रेम किंवा कोणताही उत्साह नसेल, तर स्वत:ला आनंदी ठेवण्यासाठी काही लोक विवाहबाह्य संबंधात अडकतात. जर नवरा-बायकोच्या नात्यामध्ये शारीरिक संबंध चांगले नसतील, तर शारीरिक इच्छा पूर्ण करण्यासाठी काही जण विवाहबाह्य संबंध ठेवतात.अनेकदा नात्यात सर्व ठीक असताना नवरा-बायको भावनिकदृष्ट्या एकमेकांच्या तितकेसे जवळ नसतात. अशा वेळी मनात सुरू असलेली घालमेल आणि भावना व्यक्त करण्यासाठी व्यक्ती भावनात्मक आधाराच्या शोधात असतात. याच नादात व्यक्ती अनेकदा विवाहबाह्य संबंध ठेवू शकते. त्यामुळे एकमेकांना वेळ द्या.
- **आर्थिक निर्बलता :** अनेकदा पैशांच्या कमतरतेमुळे मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. अशा वेळी नात्यामध्ये अनेक गोष्टींवरून भांडणे होऊ शकतात. याच कारणामुळे कधी कधी व्यक्ती आर्थिक आधाराच्या शोधात विवाहबाह्य संबंधाकडे वळते.

**विवाहबाह्य संबंधाचे प्रकार**

विवाह बाह्य संबंधाच्या नात्यात प्रेमापेक्षा फसवणूक जास्त असते. लग्न होऊनही दुसऱ्याशी शारीरिक संबंध ठेवणे हे नैतिक मूल्यांच्या आधारावर समर्थनीय ठरू शकत नाही. असे केल्याने तुम्ही एकमेकांच्या नजरेत लबाड-फसवणूक करणारे सिद्ध होतात. अशा फसवणुकीमुळे तुमाच्यावर भविष्यात एकटे राहण्याची पाळी येवू शकते. तुमच्या पहिल्या जोडीदाराला कायदेशीररित्या घटस्फोट दिल्यानंतर तुम्ही असे नाते ठेवत असाल तर ठीक मात्र, सोबत राहणाऱ्या जोडीदाराची फसवणूक करून तुम्ही असे नाते ठेवत असाल तर, ही शुद्ध फसवणूक आहे. ही केवळ  जोडीदारांचीच नव्हे तर, स्वतःची सुध्दा फसवणूक असते. पहिल्या जोडीदारासोबत घटस्फोट घेतल्यानंतर तुम्ही दुसरा जीवनसाथी निवडू शकता. कोणत्याही कारणांने पुरूष आणि महिलेकडे एकत्र असल्यानंतर समाजात आजही चुकीच्या दृष्टीनेच पाहिले जाते. पण आता लग्न झालेली स्त्री आणि पुरूष एकत्र अधिक काळ दिसत असतील तर त्यांच्या संबंधात चर्चा रंगू लागतात. रिलेशनशिप तज्ज्ञाच्या मतानुसार केवळ शरीरसंबंधासाठी नाही तर अनेक गोष्टींसाठी विवाह बाह्य संबंधाचे हे नाते निर्माण होत असून ही नाती पुढील प्रकारातील आहे.

- **भावनिक गुंतागुंतीचे नातेः** या प्रकारातील नाते हे मैत्रीने सुरू होते आणि मैत्रीपेक्षाही त्यात भावनिक गुंतागुंत अधिक असते. चुकीच्या लग्नात अडकलेल्या मुलामुलींच्या बाबतीत हा प्रकार मोठ्या प्रमाणात घडताना दिसून येते. घटस्फोटाच्या अनेक कारणांपैकी हे कारण ठरताना दिसून येते. बऱ्याचदा ऑफिसमध्ये अशा प्रकारचे अफेअर अधिक प्रमाणात दिसून येते.
- **रोमँटिक अफेअरः** लग्न झालेल्या व्यक्तीशिवाय एखाद्या व्यक्तीबद्दल आपुलकी, प्रेम आणि आकर्षण वाटायला लागल्यानंतर या पद्धतीचे अफेअर होताना दिसते. एखाद्या व्यक्तीबद्दल काळजी, आपुलकी आणि प्रेम वाटायला लागल्यानंतर स्वतःच्या मनावर ताबा न राहता त्या व्यक्तीकडे आकर्षित होतात आणि दोघांमध्ये प्रेम निर्माण होवून अशा प्रकारातील अफेअर निर्माण होते.
- **लव्ह ॲडिक्ट अफेअरः**  अशा पद्धतीच्या एक्स्ट्रा मॅरिटल अफेअरमध्ये लग्नात आपल्या जोडीदाराकडून व्यक्ती समाधानी नसते. जोडीदाराकडून प्रेमच मिळत नाही अशी भावना या व्यक्तीच्या मनात पक्की होते आणि मग एखाद्या व्यक्तीकडून भावनात्मक प्रेम मिळायला लागल्यावर त्या व्यक्तीकडे अधिक आकर्षण  निर्माण होते. हे अफेअर शारीरिक आणि भावनात्मक दोन्ही पद्धतीचे असते.
- **रिव्हेंज अफेअरः** एक्स्ट्रा मॅरिटल अफेअरच्या यादीत हे सर्वात धोकादायक अफेअर आहे. ज्या व्यक्ती आपल्या नात्यात असुरक्षितता सतत डोक्यात ठेवतात त्यांच्या बाबतीत हे अधिक घडते. अनेकदा अशा नात्यातून खून होतात अथवा त्रासदायक गोष्टी समोर घडताना दिसतात. कोणत्या तरी तिसऱ्या व्यक्तीसाठी अशा पद्धतीने सूडबुद्धीने नाती निर्माण केली जातात जे सर्वच बाबतीत धोकादायक ठरू शकते.

- **एक्झिट स्ट्रटेजी अफेअरः** प्रेमात कोणी असा विचार करतं का असा सामान्य माणसांना प्रश्न पडतो. पण काही माणसं ही सर्व काही स्ट्रॅटेजी आखून करत असतात. लग्न अथवा एखाद्या नात्यातून बाहेर पडण्यासाठी अशा पद्धतीचे अफेअर करण्यात येते. यामध्ये आपण काय करत आहोत याची पूर्ण जाणीव व्यक्तीला असते. मुद्दाम अफेअर करून मुद्दाम पकडले जाणे नको असलेल्या नात्यातून बाहेर पडण्यासाठी योग्य ठरते.

## विवाहबाह्य संबंध व न्यायालयीन निर्णय

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्यायाधीश एम. खानविलकर, आर. एफ. नरीमन, डी. वाय. चंद्रचूड आणि इंदू मल्होत्रा आदी पाच सदस्यांच्या खंडपीठाने विवाहबाह्य संबंधाबाबत २०१८ मध्ये महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालामध्ये दिलेल्या निर्णयानुसार पुरुष आणि स्त्री दोन्ही समान आहेत. त्यामुळे विवाहबाह्य संबंधात पती हा पत्नीचा मालक होऊ शकत नाही, असे सांगतानाच विवाहबाह्य संबंध (व्यभिचार) हा गुन्हा नाही. हा अपराध होऊ शकत नाही, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. व्याभिचाराला गुन्हा ठरवणारे भारतीय दंड संहितेचे कलम ४९७ ही कोर्टाने अवैध ठरवले आहे.

### न्यायनिर्णयातील मुद्दे

- समाजाच्या इच्छेनुसार महिलांना विचार करण्यास सांगता येऊ शकत नाही. संसदेनेही महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कौटुंबीक हिंसाचाराविरोधी कायदा मंजूर केला आहे. त्यामुळे पती कधीही पत्नीचा मालक होऊ शकत नाही, असं न्यायालयाने स्पष्ट केले आहे.
- व्यभिचार हा गुन्हा नसला तरी विवाहबाह्य संबंधाच्या कारणाने स्त्री किंवा पुरुष दोघांनाही घटस्फोट घेता येऊ शकतो, असे न्यायमुर्ती मिश्रा यांनी स्पष्ट केले.
- न्यायाधिश चंद्रचूड यांच्या मते, हे कलम स्त्रियांची मानहानी करणारे आहे. हे कलम महिलांची लैंगिक पसंती रोखणारे असल्यामुळे ते असंविधानिक आहे. लग्नानंतरही स्त्रियांना त्यांच्या लैंगिक पसंतीपासून रोखता येणार नाही, अस, त्यांचे मत आहे.
- व्यभिचार हा गुन्हा नाही. मात्र या कारणाने जर तुमच्या पार्टनरने आत्महत्या केली तर त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येऊ शकतो, असेही न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयात स्पष्ट केले.
- निकालात सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांनी म्हटले आहे की, भारताने ब्रिटनने केलेल्या कायद्याचा मोठा भाग स्वीकारला आहे. मात्र, ब्रिटननेच विवाहबाह्य संबंध कधी गुन्हा मानला नाही. जगभरात बहुतांश देशांनी विवाहबाह्य संबंध गुन्हेगारीच्या

श्रेणीतून बाहेर ठेवले आहेत. चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, ब्राझील आणि युरोपीय देशांतही असे संबंध गुन्हा नाही. हा गुन्हा ठरवणे म्हणजे समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे.

- पतीने दुसऱ्या महिलेसोबत शरीर संबंध ठेवले तर त्या पुरुषाची पत्नी पती किंवा संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल करू शकत नाही. तशी या कायद्यात तरतूद नाही. परंतु पतीने व्याभिचार केल्याच्या आरोपावरून ती घटस्फोट घेऊ शकते, मात्र तक्रार नोंदवू शकत नाही.
- सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. ए. एम. खानविलकर यांच्या मतानुसार पुरुषाच्या मनाप्रमाणे किंवा समाजाला वाटते तसे वागण्यास महिलेला बाध्य करता येत नाही. पती काही आपल्या पत्नीचा मालक नाही असा भ्रम संपवण्याची वेळ आली आहे. पती-पत्नीच्या नात्यात नैतिक कटिबद्धतेला छेद गेला की वैवाहिक जीवन उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत जीवनसाथीला माफ करून कुणी सोबत राहतो, तर कुणी घटस्फोट मागतो. अशा वेळी विवाहबाह्य संबंधांसाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षेमुळे वैवाहिक जीवनातील दरी भरून निघू शकत नाहीत.
- न्या. डी. वाय. चंद्रचूड यांच्या मतानुसार कलम ४९७ महिलेच्या यौन स्वायत्ततेला रोखतो. विवाहानंतर या स्वायत्ततेपासून वंचित ठेवता येणार नाही. गुन्हेगारीचा कायदा घटनात्मक नैतिकतेनुसार असायला हवा. हा जुना कायदा वैवाहिक संबंधात असमाधानी, नाराज असलेल्यांना शिक्षा करतो. म्हणूनच हा मनमानी कायदा महिलांच्या भूमिकेबाबत लैंगिक रुढीवादावर आधारित आहे.
- न्या. आर. एफ. नरिमन यांच्या मते कलम ४९७ मधील उणिव ही आहे की, विवाहित व्यक्ती एखाद्या अविवाहित किंवा विधवा महिलेशी संबंध ठेवून वैवाहिक जीवनातील पावित्र्य नष्ट करू शकतो. पतीच्या परवानगीने ठेवले जाणारे संबंध गुन्हा मानला जात नाही. परंतु हे वैवाहिक जीवनातील पावित्र्य नाही. यात महिलेची प्रतिष्ठा जपण्याचे उपाय नाहीत.
- न्या. इंदू मल्होत्रा यांच्या मते, असे संबंध हा जीवनसाथी किंवा कुटुंबाशी केलेला एक नैतिक घोटाळा आहे. मात्र, अशा संबंधांना गुन्हेगारी न्यायाच्या कक्षेत उभे करावे इतका याचा समाजावर परिणाम होतो का? थेट समाजावर परिणाम होत असेल तर अशी कारवाई योग्य ठरते. कलम ४९७ महिला म्हणजे पतीची संपत्ती असल्याचे सांगते. पुरुषांना हा कायदा मनमानी अधिकार देतो.

## विवाहबाह्य संबंधाचे परिणाम

कोणावर प्रेम करणे हे चुकीचे नाही, परंतु , लग्न होऊनही दुसऱ्याशी शारीरिक संबंध ठेवणे हे नैतिक मूल्यांच्या आधारावर समर्थनीय ठरू शकत नाही. नात्याचा परिणाम केवळ तुमच्या वैयक्तिक संबंधावर होत नसून, तुमच्या संपूर्ण कुटूंबाला या संबंधाचे परिणाम भोगावे लागतात. तुम्ही या नात्याबद्दल किती गंभीर आहात, यावर ती परिणामकता अवलंबून असते. त्यांची परिणामकता खालील घटकांना मोजावी लागते.

- **जोडीदाराची फसवणूक :** विवाह बाह्य संबंधामुळे तुम्ही तुमच्या जोडीदाराची एकप्रकारे लबाड-फसवणूक करणारे सिद्ध होऊ शकता. तुमच्या पहिल्या जोडीदाराला कायदेशीररित्या घटस्फोट दिल्यानंतर तुम्ही असे नाते ठेवत असाल तर ठीक मात्र, आपल्या सोबत राहणाऱ्या जोडीदाराला अंधारात ठेवून असे नाते ठेवत असाल तर, ती आपल्या जोडीदाराची फसवणूक ठरते.
- **आर्थिक ताण आणि कायदेशीर समस्या :** जेव्हा घटस्फोट झालेला नसतानाही, जी व्यक्ती आपल्या मित्र किंवा मैत्रीणीसोबत विवाहबाह्य संबंध ठेवतो किंवा रिलेशनशिपमध्ये राहत असेल तर, घटस्फोटानंतर तुम्हाला आर्थिक संकटातून जावे लागू शकते. जर तुम्ही पैशाने श्रीमंत असाल तर ठीक आहे, अन्यथा तुम्हाला अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.
- **मुलांचे भविष्य धोक्यात :** जर तुम्हाला पहिल्या पत्नीपासून अपत्य असेल, तुम्ही बाप झाला असाल आणि त्यानंतर तुमचे विवाहबाह्य संबंध असेल तर, त्यांचे परिणाम तुमच्या कुटूंबियांसोबत तुमच्या निष्पाप मुलांनाही भोगावे लागतात. यामुळे कुटुंबात कलह निर्माण होतो. त्याचा परिणाम तुमच्या मुलाच्या भविष्यावर होतो.

**केस स्टडी**

याबाबतची एक केस माझ्याकडे आली. मनोज नावाच्या मुलाचे कल्पना नावाच्या मुलीवर प्रेम होते. त्याचे दुसरीकडे लग्न झाले. लग्न झाल्यानंतरही त्याचे कल्पनासोबत प्रेमप्रकरण चालू राहीले. त्यानंतर घरामध्ये भांडणे. बायकोला मारहाण इत्यादी प्रकार सुरु झाले. शेवटी त्याचा परिणाम घटस्फोटामध्ये झाला. १२ वर्षाचा मुलगा वडिलाकडे गेला आणि साडेतीन वर्षाचा मुलगा आईकडे गेला. या अवस्थेमध्ये आईवडील आणि दोन मुले यां चौघांनाही मानसिक आणि सामाजिक नुकसान सहन करावे लागले. एक मुलगा आईपासून दुरावला आणि दुसरा मुलगा वडिलापासून. त्यानंतर झालेला मानसिक आणि आर्थिक ताप वेगळाच. या चार जणाच्या नात्यामध्ये कोणीही सुखी नाही. तेव्हा जर तुमचे विवाहबाह्य संबंध असेल तर, वेळीच संपवा परंतु, इतर कोणालाही त्याचे परिणाम भोगण्यास भाग पाडू नका.

*******

प्रकरण १३ वे

# घटस्फोट आधुनिक काळातील समस्या

*विवाह हे भारतातील जोडप्यांमधील एक पवित्र नाते आहे आणि म्हणूनच आमच्याकडे विवाह सोहळ्यादरम्यान पाळल्या जाणाऱ्या धार्मिक नियम आणि तत्त्वांनुसार लग्न करण्याची एक विस्तृत प्रक्रिया आहे. हे नाते इतके विशेष आणि महत्त्वाचे मानले गेले आहे की एखाद्याने लग्न करावे आणि आयुष्यभर लग्न टिकवून ठेवण्याची देवाची इच्छा म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या हे मानले गेले आहे. जसजसे जग बदलत जाते, तसतसे प्रत्येक गोष्टीचे तत्वज्ञान बदलत आहे. हिंदू धर्मात लग्न म्हणजे साता जन्माची सोबत मानले जाते. पत्नी आपल्या पतीच्या दिर्घायुष्याकरिता व्रत करते. शिक्षणाचा दर्जा, व्यक्ती स्वातंत्र्याचे महत्व आणि आर्थिक स्वातंत्र्याच्या काळात हे सर्व विचार मागे पडले आहेत. भारतातील विवाह प्रथा जोडप्यांमध्ये नाते निर्माण करणारा एक पवित्र संस्कार मानला जातो. जेव्हा स्त्री-पुरूष विवाहाच्या माध्यमातून एकत्रित येतात तेव्हा, कुटुंब निर्माण होते. परंतु काही वेळा कुटूंबांतर्गत व्यवहार किंवा कुटुंबबाह्य परिस्थितीमुळे पती-पत्नीच्या नात्यामध्ये अंतर पडते आणि परस्पर संबंधात विसंवाद निर्माण होतो. जेव्हा पती-पत्नी नात्यामध्ये राहणे अशक्य होऊन जाते तेव्हा विवाहविच्छेदाने वा घटस्फोटाने पती-पत्नीचे नाते संपुष्टात येते. स्त्रीच्या आयुष्यात घर हे केंद्रस्थानी असल्याने घराचा त्याग, नवऱ्याने टाकून देणे (परित्यक्ता), घटस्फोट घेणे, बहुतांश स्त्रियांना स्विकारणीय नाही. आपल्याकडे विवाह सोहळ्यादरम्यान पाळल्या जाणाऱ्या धार्मिक विधी असून यातून निर्माण झालेले नाते हे विशेष महत्त्वाचे मानले गेले आहे. जसजसे जग बदलत गेले, त्या प्रमाणात जगाचे जगण्याचे तत्वज्ञान सुध्दा बदलले आहे. त्याचा परिणाम सामाजिक विघटनावर सुध्दा झाला आहे. घटस्फोट हा त्याचाच एक परिणाम आहे. पुर्वीच्या समाज व्यवस्थेमध्ये घटस्फोटाचे प्रमाण बरेच कमी होते. बहुतेक लोकांना सामाजिक बदनामीपासून दूर राहण्यासाठी घटस्फोटाची केस दाखल करणे आवडत नव्हते परंतु, आज आर्थिक स्वातंत्र्य, व्यक्तीस्वातंत्र्याचा विस्तार आणि उंचावलेला शिक्षणाचा दर्जा यामुळे आजच्या आधुनिक समाजामध्ये घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे आणि हा घटस्फोटचा परिणाम त्या नात्यामधून निर्माण झालेल्या पिढीवर होत आहे. याला वेळीच आवर घालणे आवश्यक आहे.*

विवाहाने स्त्री-पुरूष पती-पत्नी या नात्याने एकत्रित येतात व कुटुंब निर्माण होते. परंतु काहीवेळा कुटुंबातर्गत व्यवहार किंवा कुटुंबबाह्य परिस्थितीमुळे पती-पत्नीच्या नात्यामध्ये अंतर पडते. परस्पर संबंधात विसंवाद निर्माण होतो. पती-पत्नी नात्यामध्ये राहणे अशक्य होऊन जाते. तेव्हा विवाहविच्छेदाने वा घटस्फोटाने पती-पत्नीचे नाते संपुष्टात येते. कुटुंब विघटन घडून येते. स्त्रीच्या आयुष्यात घर हे केंद्रियस्थानी

असल्याने घराचा त्याग, नवऱ्याने टाकून देणे (परित्यक्ता), घटस्फोट घेणे, बहुतांश स्त्रियांना स्विकारणीय नाही. जेव्हा पतीला घटस्फोट हवा असतो त्यावेळी भारतीय स्त्रीच्या मनोरचनेचा विचार करता ती कोणत्याही परिस्थितीत घटस्फोटास तयार होत नाही. अशावेळी पतीकडून पत्नीला मारहाण, छळ सुरू होतो. घटस्फोटाच्या कारणास्तव समाजात कौटुंबिक हिंसाचाराच्या, पतीच्या क्रूर वागणुकीच्या घटनांमुळे समाजातील घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे.

भारतात जगाच्या तुलनेत घटस्फोटाचे प्रमाण हे तुलनेने कमी आहे. जवळपास १000 विवाहामागे ११ विवाह मोडतात. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात घटस्फोटाचे प्रमाण कमीत कमी आहे. पण भारतात अजूनही अधिकृत आकडेवारीची नोंद ठेवली गेली नाही. अमेरिकेत घटस्फोटाचे प्रमाण ५0% तर भारतात १.१% आहे. पण १९९० नंतर जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे भारतात मेट्रो व अर्ध नागरी शहरी भागात घटस्फोटाचे प्रमाण वाढत चाललेले आहे. ते फक्त उच्च वर्ग व मध्यवर्गातच आहे. साधारणपणे घटस्फोट हे लग्नानंतर पहिल्या किंवा तिसऱ्या वर्षात ८५% होतात. वयोगट हा २५ ते ३५ मध्ये ७0% आहे. हिंदूस्थान टाइम्सच्या एका वृत्तात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. चांदनी तुगनैत यांनी पती-पत्नी मध्ये घटस्फोट होण्याचे वेगळे होण्याची काही सामान्य कारणे सांगितली आहेत.

- **विवाहबाह्य संबंध:** नातेसंबंध आणि लग्नानंतर लोकांची फसवणूक होते तेव्हा खूप वाईट वाटते. घटस्फोटाची अशी अनेक प्रकरणे आहेत की, ज्यात पती/पत्नीपैकी एका जोडीदाराने फसवणूक केल्यामुळे त्यांच्यात घटस्फोट घडून आला आहे. अशा परिस्थितीत एकदा विश्वास उडाला की, पुन्हा अशा जीवनसाथीवर विश्वास ठेवणे कठीण होऊन बसते. आजच्या काळातील बहुतेक घटस्फोट हे विवाहबाह्य संबंधांमुळे झाल्याचे आढळून येत आहे.
- **धार्मिक मतभेद:** आजकाल इतर धर्मातील विवाहामुळे घटस्फोटाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेकवेळा असे दिसून आले आहे की दुसऱ्या धर्मात लग्न केल्यानंतर जोडीदारावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकला जातो किंवा एकमेकांच्या धर्माबाबत नेहमीच वाद होतात. त्यामुळे भविष्यात एकत्र राहणे कठीण होऊन शेवटी नाते घटस्फोटापर्यंत पोहोचते.
- **जोडीदारावरील संशय:** लग्नानंतरची मानसिक वर्तणूक खूप महत्त्वाची असते. पती किंवा पत्नी आपल्या जोडीदाराबाबत खूप संशयी असतात असे अनेक प्रकरणांमध्ये दिसून आले आहे. दिवसभर ते त्याच्यावर संशय घेतात. त्यांच्या प्रत्येक कामात हस्तक्षेप करतात. ते ऑफिसमध्ये असोत किंवा बॉससोबत असोत, त्यांच्या जोडीदाराला सर्व काही माहित असणे आवश्यक असते. त्यामुळे पुढे दोघांमध्ये दुरावा निर्माण होतो आणि हळूहळू नाते संपूष्टात येते.

- **जोडप्यांमध्ये जवळीकता नसणे :** जर्नल फॉर सेक्स अँड मॅरिटल थेरपीमध्ये घटस्फोटावर एक अभ्यास प्रकाशित झाला आहे. या अभ्यासासाठी २३७१ घटस्फोटित लोकांची मुलाखत घेण्यात आली. या जोडप्यांना विचारण्यात आले की, घटस्फोटामागील सर्वात मोठे कारण काय आहे? अभ्यासाचा निकाल धक्कादायक होता. जवळपास निम्म्याने (४७ टक्के) घटस्फोटासाठी प्रेम आणि जवळीक नसणे हे कारण सांगितले होते. तसेच असे आढळून आले की, एक किंवा दोन्ही भागीदारांचे त्यांच्या जोडीदारावरील प्रेम कमी झाले आहे.

- **व्यसनग्रसत्ता :** मद्यपान हे कौटूंबिक विनाशाचे एक महत्वाचे कारण मानले जाते. आजकाल नव तरूणांमध्ये दारूच्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. त्यांचा परिणाम कुटूंबव्यवस्थेवर होत असून दारूमुळे अनेक कुटूंब उध्वस्थ होत आहे आणि त्याचे रुपांतर घटस्फोटामध्ये होत आहे.

- **कुटूंबातील आर्थिक समस्या:** असे अनेकवेळा दिसून आले आहे की जर एखादा जोडीदार त्याच्या/तिच्या करिअरमध्ये अधिक यशस्वी होतो. मग इतरांचे मन inferiority complex ने भरून जाते. अशा स्थितीत नात्यात दुरावा निर्माण होतो आणि परिणाम घटस्फोटापर्यंत पोहोचतो. इतकेच नाही तर खर्च आणि बचतीच्या सवयीही काही वेळा घटस्फोटाचे कारण बनतात. कारण अनेक भागीदार गरजेपेक्षा जास्त खर्च करण्याच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. अशा परिस्थितीत, भविष्याची चिंता आणि वाचवण्याची सवय समोरच्या व्यक्तीला त्रास देते आणि घटस्फोटाचे कारण बनते. आज कुटूंबात पती आणि पत्नी दोन्ही अर्थाजन करतात. महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्यामुळे आपण दुसऱ्यावर अवलंबून नाही अशी भावना प्रबळ होते. जर कुटूंबातील प्रमुख पत्नीपेक्षा कमी पैसा मिळवित असेल तर, त्यांच्यात वाद निर्माण होतो आणि अहंकार वाढत जावून दोघांमध्ये संघर्ष निर्माण होतो. शेवटी त्याची परिणीती घटस्फोटामध्ये होते.

- **पती-पत्नीमधील लैंगिक समस्या :** लैंगिक अनुकूलतेचा अभाव हे देखील घटस्फोटाचे एक प्रमुख कारण मानले जाते. अनेक वेळा स्वारस्य नसणे किंवा कोणत्याही प्रकारचे लैंगिक विकार लपवणे हे देखील घटस्फोटाचे कारण म्हणून समोर आले आहे. या आधारावर न्यायालयाकडून घटस्फोट देखील दिला जातो.

- **कौटुंबिक हिंसाचार किंवा क्रूरता :** काही दशकांपूर्वी अतिशय सामान्य समजल्या जाणाऱ्या महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराने आता महिलांविरोधात आवाज उठवायला सुरुवात केली आहे आणि हिंसक संबंधातून बाहेर पडण्याची भूमिकाही घ्यायला सुरुवात केली आहे. प्रत्येक धोका पत्करायला ती तयार झाली आहे. कौटुंबिक न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार हे घटस्फोटाचे प्रमुख कारण मानले आहे. पुरेशा पुराव्यांसह अनेक कलमात अशा घटना गुन्हा मानला गेला आहे.

- **स्वाभिमान दुःखावल्यास :** नातेसंबंधात स्त्री-पुरुष दोघांनाही समान अधिकार असतात, पण समाजाच्या रूढीवादी विचारसरणीला अजूनही हे मान्य नाही. जिथे पती आपल्या पत्नीला स्वतःहून हीन समजतो आणि तिचा अपमान करण्याची एकही संधी सोडत नाही. पतीच्या अशा स्वभावामुळे बायकोचा स्वाभिमान सतत दुखावलेला जातो. यामुळे स्त्री उद्ध्वस्त होते. खूप प्रयत्न करूनही परिस्थिती सुधारत नाही तेव्हा एक वेळ अशी येते की तिला घटस्फोटाचा निर्णय घ्यावा लागतो.
- **आधुनिकीकरण व आर्थिक स्वातंत्र्य :** आधुनिक काळात स्त्रियांना स्वातंत्र्य, सामाजिक मूल्यातील परिवर्तन, आर्थिक स्वातंत्र्य, कौटुंबिक तणाव, विरोधी स्वभाव, जीवन पद्धतीत भिन्न इ. घटस्फोटाच्या पारंपारिक कारणापेक्षा आधुनिक कारणाचा ऊहापोह महत्त्वाचा आहे. त्यात नोंदणी विवाह, जोडीदाराची निवड पसंतीनुसार, स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन, स्त्री-पुरुष समान हक्काची संकल्पना, परस्परविरोधी स्वभाव, आवडी-निवडी, स्व-सन्मान, आत्मविश्वास, माहिती-तंत्रज्ञान, वाढता व्यापार, कामाच्या वेळेतील बदल, घटस्फोटिताकडे बघण्याचा समाजाचा बदलता दृष्टिकोन इ. आज घटस्फोट ही व्यक्तिची केवळ वैयक्तिक बाब बनली आहे. आर्थिक स्वयंपूर्णता, विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांना मिळत असलेली संमती (औपचारिक) विवाह न करता एकत्र राहणे यास कायद्याची मान्यता, विभिन्न जीवनशैली, आंतरराष्ट्रीय विवाह, इगो व विसंगत अनुरूपता, एकल पालकत्व, बदलती लैंगिक भूमिका, लिंगभावाबद्दलची जागरुकता, सुरक्षित स्त्री जीवन इ. अनेक कारणांमुळे घटस्फोट घेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.
- **मानसिक शोषण करणे :** लग्नानंतर स्त्रीच्या अनेक जबाबदाऱ्या वाढतात यात शंका नाही, मात्र हे ओझे तिच्यावर टाकणे चुकीचे आहे. कुटंबांतील आचार आणि विचार याचा पत्नीवर घरातील कामाचा मानसिक तणाव निर्माण होतो. कालांतराने या दबावातून त्यांच्या वैयक्तिक तणाव निर्माण होता. पत्नीचा सतत मानसिक छळ सतत होत असेल तर, त्याचा एक परिणाम घटस्फोटाच्या रूपात समोर येतो.
- **जबरदस्तीने विवाहः** पूर्वीच्या काळात  जेव्हा दोन व्यक्तींची पसंती विचारात न घेता आईवडील विवाह लावून देत असे. असा विवाह आताच्या विचारानुसार जबरदस्तीचा विवाह असायचा. परंतु, त्या काळातील पिढी जुळवून घेऊन आपला संसार करीत असे. कारण त्याकाळी सर्व निर्णय पालक घेत असे आणि मुले फक्त त्या निर्णयांचा आदर करत असे. आजच्या पिढीला निवड आणि व्यक्ती स्वातंत्र्याची जाणीव आहे. म्हणूनच सक्तीचे लग्न आजच्या व्यक्तीच्या मानसिकतेत बसत नाही. जर अशा प्रकारचा विवाह झाल्यास तर, त्यांचा विवाह संपवण्यावर भर आहे  हे एक भारतातील घटस्फोटाचे भक्कम कारण आहे.

- **बदलती जीवनशैली आणि दृष्टिकोन :** समाजाच्या आधुनिकीकरणामुळे, एखाद्या व्यक्तीच्या इतरांबद्दलचा दृष्टीकोन दर्शविण्याच्या पद्धतीमध्ये मोठा बदल झाला आहे. लग्नात, दोन व्यक्ती वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून येत असल्याने, ते कोणत्याही किंमतीत सर्वकाही सामावून घेण्याच्या स्थितीत नसतील. जर त्यांच्या जीवनात आणि गोष्टींबद्दलच्या दृष्टिकोनात मोठा फरक असेल तर ते तडजोड करू इच्छित नाहीत आणि अशा प्रकारे ते विवाह कधी सौहार्दपूर्णपणे तर कधी संमतीशिवाय संपवण्याचा निर्णय घेतात. हे घटस्फोटाचे सर्वात मोठे कारण म्हणून समोर आले आहे.
- **संवादाची समस्या :** या अभ्यासात, घटस्फोटाचे दुसरे सर्वात मोठे कारण उघड झाले ते म्हणजे एकमेकांशी साधत असलेल्या संवादाची समस्या होय. ४४ टक्के लोकांनी घटस्फोटासाठी आपापसात झालेल्या संभाषणाबाबत समस्या मांडल्या आहेत. याचाच अर्थ अनेकवेळा मुलगा आणि मुलगी यांच्या बोलण्याची पद्धत वेगळी होती. त्यामुळे त्यांच्यातील संवाद कमी होऊ लागला आणि त्याचा परिणाम म्हणून दोघातील ते अंतर घटस्फोटात रुपांतर होण्याची शक्यता असते.
- **अपमानास्पद नातेसंबंधः** आजही दुःखाची गोष्ट म्हणजे, अनेक जोडप्यांना अनेकदा भावनिक आणि शारीरिक शोषणालाही सामोरे जावे लागते. यामुळे अनेक जोडप्यांमध्ये घटस्फोटही होत आहेत. घटस्फोटाच्या कायदेशीर तरतुदींमध्येही त्याचा समावेश करण्यात आला आहे. कोणत्याही कारणास्तव गैरवर्तन किंवा अपमानास्पद संबंध खपवून घेऊ नका आणि नातेसंबंधातून सुरक्षितपणे बाहेर पडण्याचा सल्लाही रिलेशनशिप तज्ज्ञ देतात.
- **फसवे लग्न :**जुन्या काळात, लग्न ही दोन्ही पक्षांच्या नातेवाईकांचा समावेश असलेली एक लांब प्रक्रिया असायची. मी अनेक प्रकरणांमध्ये पाहिले आहे की, जोडपे सोशल मीडिया किंवा मॅट्रिमोनिअल साइट्सवर भेटतात आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला परंतु नंतर लक्षात येते की, जी माहिती इंटरनेटवर दिलेली आहे ती संपूर्ण चुकीची आहे. तेव्हा आपणास फसवणूक झाल्याचे लक्षात येते. ही फसवणूक हे घटस्फोटाचे एक कारण आहे. याकरिता मेट्रोमिनिअल साईटवर लग्न करण्यापुर्वी दक्षता घ्या.
- **सोशल मीडियाचा वाढता प्रभाव :** आज कौटूंबिक जीवनामध्ये व्हॉटस्ॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामसह अनेक सामाजिक माध्यमाने प्रवेश केला आहे. या सोशल मीडियाच्या ॲपमुळे नवरा-बायकोमधील संवाद दुरावत चालला असून, अनेकांचे वैवाहिक आयुष्य मोबाईलमुळे उद्ध्वस्त होत आहे. पोलीस विभागाने सुरु केलेल्या भरोसा सेलच्या अहवालामध्ये सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे नवरा-बायकोच्या नात्यामधील वाद घटस्फोटापर्यंत पोहचत असल्याचे म्हटले आहे. नवरा-बायकोमधील बहुतांश वादाला मोबाईल हेच कारण बनले आहे.

अनेक तक्रारींमध्ये सतत फोनवर बोलणे, सोशल मीडियावर जास्त वेळ घालविणे, या सर्व कारणांमुळे वाद होत आहेत. यापूर्वी हुंडा, घरगुती हिंसाचार, दारूडा पती, अनैतिक संबंध ही कारणे घटस्फोटासाठी दिली जात होती. हायटेक युगात आणि बहुतांश जोडपी उच्चशिक्षित असतानासुद्धा सोशल मीडियासारखे कारण घटस्फोटासाठी कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येत आहे. तेव्हा मोबाईलचा आवश्यकतेपेक्षा अधिक वापर करु नका.

- **नमते न घेण्याचा परिणाम :** लग्नापुर्वी प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असतो. यावेळी १००% आपण आपले निर्णय घेवू शकतो. लग्नानंतर पत्नीचे आपल्या जिवनात पदार्पण होते, तेव्हा आपल्या जिवनाच्या विचाराचे विभाजन होवून त्यांचे प्रमाण ५०% राहते. या काळात आपण प्रत्येक निर्णय पत्नीच्या कलेने घेतो. कधीकधी इच्छा नसतांनाही आपण आपल्या विचाराला मारून नेतो. जेव्हा आपल्या आयुष्यामध्ये मुलांचा प्रवेश होतो. तेव्हा, दोघांच्याही संपूर्ण ईच्छा आकांक्षा आणि महत्वाकांक्षा मुलांच्या भोवती असतात तेव्हा आपण मुलांच्या भवितव्याकरिता आपल्या प्रत्येक गोष्टीसोबत तडजोड करतो. पण, जेव्हा आपल्या पैकी कोणी आपल्या आयुष्यात नमते घेण्यास तयार नसतो तेव्हा वाद निर्माण होतात आणि ही परिस्थिती घटस्फोटावर येवून पोहचतो.

## घटस्फोटानंतर कुटूंबावर होणारा परिणाम

आधुनिक काळात कौटुंबिक तणाव अधिक प्रमाणात आढळून येत असून त्यांचा परिणाम पती-पत्नीच्या संबंधावर होत असतो. कुटुंब विघटन ही एक सामाजिक प्रक्रिया आहे, ती कौटुंबिक तणाव, परित्याग व नंतर घटस्फोट या अवस्थेतून जात असते. घटस्फोट ही कुटुंब विघटनाची अवस्था असून घटस्फोटानंतर कायदेशिररित्या कुटुंब व विवाह संपुष्टात येतो. मागील दशकात भारतीय सामाजिक व्यवस्थेत जागतिकीकरण, आधुनिकीकरण व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे बदल होत आहे. याचा परिणाम विवाहसंस्था व कुटुंबसंस्थेवरही होत आहे. या घटस्फोटाचा परिणाम खालील घटकांवर होत आहे.

- **मुलांच्या अवस्थेवर परिणाम:** जुडिथ वॉलरस्टीन यांनी कुटुंब आणि कुटुंबांच्या राष्ट्रीय सर्वेक्षणाचा वापर करून विवाह, घटस्फोट आणि आनंद यांच्यातील संबंधांचे विश्लेषण केले आणि असे आढळले की घटस्फोट घेतलेले कूटूंब एकत्र राहणाऱ्यांपेक्षा जास्त आनंदी नव्हते. एका व्यापक-आधारित अभ्यासातून असेही दिसून आले आहेत की, जे मुले त्यांचे पालक गमावतात अशा मुलाच्या शैक्षणिक, वर्तणूक आणि मानसिक समस्यांचा समावेश अधिक असतो.

- **विकास आणि वर्तन :** लहान वयात घटस्फोटामुळे प्रभावित झालेल्या मुलावर नंतरच्या आयुष्यात बराच सामाजिक प्रभाव असतो. प्रचंड संशोधनात, अनेकांनी असे निरीक्षण केले आहे की त्यांच्या पालकांच्या घटस्फोटाचा अनुभव घेतल्यानंतर मुले

एकटे पडतात. तणावाच्या प्रमाणामुळे मुले लवकर निर्णय घेतात की त्यांना त्यांच्यापेक्षा वेगाने वाढण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यामध्ये अकाली प्रौढत्व निर्माण होते. पालकांच्या घटस्फोटामुळे मुलांचा भविष्यातील नातेसंबंधातील आत्मविश्वास कमी होतो. सदैव विवाहित पालकांच्या मुलांच्या तुलनेत, घटस्फोटित पालकांच्या मुलांचा घटस्फोटाबाबत अधिक सकारात्मक दृष्टीकोन असतो.

- **मानसिक आरोग्यावर परिणाम :** मानसशास्त्रज्ञांच्या मते, विवाहित पालकांच्या मुलांपेक्षा घटस्फोटित पालकांच्या मुलांना वर्तणुकीशी संबंधित समस्या जास्त असतात आणि अखंड कुटुंबातील मुलांपेक्षा अत्याचाराला बळी पडण्याची शक्यता जास्त असते. कधीकधी अशा मुलाला विसंगत पालकत्वाचा सामना करावा लागतो, ज्यामुळे प्रत्येक पालक दुसऱ्याला कमजोर करू शकतात. या संघर्षांमुळे, पालक मुलाच्या गरजा पूर्ण करू शकत नाहीत, ज्यामुळे मुलाच्या सर्वांगीण कल्याण आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.

- **शारीरिक स्वास्थ्यावर परिणाम :** २०१५ च्या एका लेखाने क्लिनिकल चाइल्ड अँड फॅमिली सायकोलॉजी रिव्ह्यू मधील २००२ च्या लेखाच्या घटस्फोटित पालकांच्या मुलांच्या आरोग्याच्या विविध परिणामांवर चर्चा करतात. या अहवालानसुार घटस्फोटित कुटुंबातील लोकांमध्ये कधीही घटस्फोट न घेतलेल्या लोकांपेक्षा मद्य आणि इतर पदार्थांचे सेवन करण्याचे प्रमाण जास्त आहे. अशा कूटूंबातील मुलांना नैराश्याचा दीर्घकालीन धोका जाणवतो. घटस्फोटित किंवा विभक्त पालकांची मुले देखील उच्च दराने औपचारिक मानसोपचार घेतात. अशा कुटूंबातील मुलांमध्ये आत्महत्या, तीव्र संसर्गजन्य रोग, पाचक रोग, परजीवी रोग, श्वसन रोग आणि गंभीर दुखापतींमुळे मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते. घटस्फोटित पालक असल्याने मुलांमध्ये संधिवात होण्याचा धोका पुढील आयुष्यात वाढू शकतो आणि प्रौढ वयात ऑक्सिटोसिन संप्रेरकाची पातळी कमी होऊ शकते.

## घटस्फोट आणि कायदा

हिंदू विवाह कायदा, १९५५ नुसार कलम १३ ब अंतर्गत परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याची प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. कलम १३ ब (१) नुसार, पती-पत्नी एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळ जर एकमेकांपासून दूर राहिलेले असतील आणि ते आता एकत्र राहण्यास तयार नसतील किंवा त्यांना एकमेकांच्या सहसंमतीने वेगळे व्हायचे असल्यास दोन्ही पक्ष जिल्हा न्यायालयात घटस्फोट घेण्यासाठी अर्ज दाखल करू शकतात.

- कलम १३ ब (२) नुसार, सहमतीने घटस्फोट घेण्यासाठी याचिका दाखल केल्यानंतर दोन्ही पक्षांना घटस्फ्फोटाचा निर्णय मिळवण्यासाठी ६ ते १८

महिन्यांचा प्रतीक्षा कालावधी दिला जातो. या सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पती-पत्नीला घटस्फोटाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी आणि दाखल केलेली याचिका माघारी घेण्यासाठी देण्यात येतो.

- न्यायालयाने दिलेला कालावधी उलटून गेल्यानंतर आणि दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर जर न्यायालयाचे समाधान झाले असेल तर न्यायालय घटस्फोटाचा निकाल देऊ शकते. पण, लग्नानंतर निदान एक वर्ष झाले असेल तरच या तरतुदी लागू होतात.
- व्यभिचार, क्रूर वागणूक, परित्याग, धर्मपरिवर्तन, वेडेपणा, कुष्ठरोग, गुप्तरोग झाल्यास आणि फसवणूक इत्यादी कारणांखाली पती-पत्नीला घटस्फोट मिळण्यास अर्ज करता येतो.
- जर एखाद्या महिलेस हालअपेष्टा किंवा विकृतीचा सामना करावा लागत असेल तर अनुच्छेद १४२ अंतर्गत लग्नाच्या कालावधीला एक वर्ष पूर्ण झाले नसले तरी घटस्फोट मिळण्याची तरतूद आहे. अशा प्रकरणात हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३ ब (२) अंतर्गत, सहा महिन्यांचा प्रतीक्षा कालावधीदेखील माफ केला जातो.
- ज्या पती-पत्नींना घटस्फोट हवा असतो ते कौटुंबिक न्यायालयात दाद मागू शकतात. ही प्रक्रिया बरीच वेळकाढू आणि लांबलचक असते, ज्यामुळे कौटुंबिक न्यायालयांमध्ये अशाच प्रकारची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. जर पक्षकारांना त्वरित घटस्फोट हवा असेल तर ते सर्वोच्च न्यायालयात अपील करून घटनेच्या अनुच्छेद १४२ नुसार लग्न रद्दबातल ठरविण्यासंबंधी दाद मागू शकतात.
- हिंदू विवाह कायदा कलम १४२ च्या पोटकलम १ नुसार, घटस्फोटाच्या संबंधात कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे. घटस्फोटाच्या कोणत्याही प्रकरणात निर्णय घेण्याचा अधिकार या न्यायालयास आहे.

### घटस्फोट घेतल्यानंतर महिलांना मिळणारा आधिकार

- **वडिलोपार्जित मालमत्तेवर हक्क :** घटस्फोट घेतल्यानंतरही महिलांना त्यांच्या वडिलोपार्जित मालमत्तेवर म्हणजे वडिलांच्या संपत्तीवर पुरुषांप्रमाणे समान अधिकार देण्यात आले आहेत.
- **घटस्फोटानंतर पोटगी मागण्याचा हक्क :** जर एखाद्या महिलेने तिच्या पतीपासून घटस्फोट घेतला असेल तर, तिला पतीकडे भरणपोषणाचा खर्च मागण्याचा हक्क आहे. हे देखील पती-पत्नी दोघांच्या आर्थिक परिस्थितीच्या आधारावर ठरवले जाते. घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये, मासिक देखभाल व्यतिरिक्त, एक वेळ सेटलमेंट पर्याय देखील उपलब्ध आहे. घटस्फोटानंतर मुले आईसोबत राहत असतील तर पतीलाही त्यांची देखभाल करावी लागते.

- **घटस्फोटीत स्त्रीचा पतीच्या संपत्तीवरील हक्क :** घटस्फोट झाल्यानंतर पत्नीचा पतीच्या संपत्तीवर कोणताही अधिकार नसतो. मात्र, वडिलांच्या संपत्तीवर महिलेच्या मुलांचा पूर्ण अधिकार कायम असतो. जर पती-पत्नीची कोणतीही सामायिक मालमत्ता असेल ज्यामध्ये ते दोघेही मालक असतील तर ती समान प्रमाणात विभागली जाते.

**पती-पत्नीची सहमती असेल तर लगेच घटस्फोट**

२०२१ सालच्या अमित कुमार विरुद्ध सुमन बेनिवाल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. ज्या पती-पत्नीचे घटस्फोट घेण्यावर एकमत झालेले आहे किंवा लग्न पुढे नेण्यास दोघेही असमर्थ आहेत, अशा जोडप्यांना सर्वोच्च न्यायालयातून घटनेच्या अनुच्छेद १४२ अनुसार थेट घटस्फोट मिळू शकतो. काही विवाहांमधील संबंध इतके ताणले गेलेले असतात की त्यात सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता संपलेली असते, अशा विवाहातील जोडप्यांचे जर घटस्फोट घेण्यावर एकमत झालेले असेल तर त्यांना कौटुंबिक न्यायालयात पाठविण्याची गरज नाही. कौटुंबिक न्यायालयांमध्ये निकाल लागण्यासाठी ६ ते १८ महिन्यांची वाट पाहावी लागते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजय किशन कौल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दिलेला निकाल महत्त्वपूर्ण ठरतो. ज्या विवाहातील नात्यामध्ये कोणतीही सुधारणा होण्याची थोडीही शक्यता नाही, अशा विवाहांना सर्वोच्च न्यायालय रद्दबातल ठरवू शकते. असे मत खंडपीठाने व्यक्त केले.

*******

प्रकरण १४ वे

# सुखी जीवनाचा कानमंत्र

*हिंदू धर्मानुसार विवाह ही एक सामाजिक व्यवस्था आहे. ज्यामध्ये दोन व्यक्तीनी आयुष्यभर एकत्र राहण्याचा आणि कुटुंब सुरू करण्याचा निर्णय घेतला जातो आणि अशा प्रकारे एकत्र राहण्याला शासनाचे कायदे, नियम, रीतिरिवाज, समजुती आणि परंपरा यांची मान्यता असते. वैवाहिक जीवनात दोन व्यक्ती एकमेकांच्या बंधनात अडकतात. प्रत्येक सुख-दु:खात सोबत उभे राहतील या वचनाने. एकमेकांच्या उणीवा बाजूला ठेवून एकमेकांसोबत आयुष्य जगतात. तर हिंदू धर्मात विवाहाचा संबंध केवळ एका जन्माचा नाही तर सात जन्मांचा मानला जातो. लग्नात साता जन्मांच्या हाणाभाका घेतल्या जातात. श्री श्री रविशंकर म्हणतात की लग्न करून कुटुंब सुरू करण्यापेक्षा आनंदी राहणे महत्त्वाचे आहे. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही एखाद्याशी लग्न करून आनंदी होऊ शकता, तर नक्कीच लग्न करा. पण जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही अविवाहित जास्त आनंदी राहू शकता, तर तुम्ही लग्नाशिवाय आयुष्य जगू शकता. श्री श्री रविशंकर यांचे मते, लग्न करायचे किंवा न करायचे हा निर्णय पूर्णपणे तुमच्यावर अवलंबून आहे. आजचे आधुनिकीकरणे, आर्थिक संपन्नाना आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामध्ये काम करणाऱ्या तरुणांचा लग्नावर विश्वास नाही. यातून लिव्ह इन रिलेशनशिप, जुळत नसेल तर. घटस्फोट घ्या आणि विवाह बाह्य संबंधाचे प्रकार निर्माण झालेले आहेत. यामुळे कित्येक विवाह भंग होत आहे. विवाह भंग होताच त्यामधून नवनवीन प्रश्न निर्माण होत आहे. हे प्रकार टाळण्याकरिता विवाह टिकविणे आवश्यक आहे आणि*

## पूर्वी विवाह यशस्वी का व्हायचे?

पुर्वी घरातील वडीलधारी माणसे पुढाकार घेऊन लग्न ठरवत असे. आणि मुलगा, मुलगी ते मान्य करायचे. त्यांना कोणीही त्यांची पसंती विचारात नसे. याकाळात घरातील वडीलधारी व्यक्तींचा धाक असल्यामुळे एकत्र कुटुंब पद्धतीमुळे अनेक कुटुंबे एकत्र राहत होती. संसारामध्ये काही अडचणी आल्यास तर, वडीलधाऱ्याचे त्यांना मार्गदर्शन लाभत होते, संकटसमयी कुटुंबाची मदत मिळत होती. याकाळामध्ये पतीपत्नी सुध्दा एकमेकांना सांभाळून घेत असे. तडजोड तसेच समजुदारपणामुळे आधी विवाह यशस्वी होत असे. आधी मुलींना एवढे स्वातंत्र्य नसल्यामुळे पती हाच परमेश्वर अशी पत्नीची भावना असे. काळाच्या ओघात हळू हळू प्रगती झाली आणि मुलींना देखील शिक्षण मिळू लागले. आता तर त्या नोकरी देखील करतात. मुली स्वतः च्या पायावर उभ्या आहेत आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र

आहेत. संसार म्हटला कि चढ उतार हे आलेच. याला दोघांनी एकत्र तोंड दिले पाहिजे. ही भावना मागे पडत चालली आहे. आजच्या तरुणांना लग्नाच्या कित्येक वर्षांनी मुले बाळे झाल्यावर वेगळे कसे व्हावेसे वाटते आहे. आपले लग्न टिकवणे आणि यशस्वी करणे हे आपल्याच हातात आहे.

## हल्ली लग्न जास्त काळासाठी का टिकत नाहीत

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक मोठा निर्णय असतो आणि याच उद्देशाने आपलेपालक लग्न जुळवून देतात आणि दोघांच्याही मनाप्रमाणे खर्च करतात. जोडीदार उत्तम मिळाला की, संसार हा चांगलाच होणार याचे समाधान पालकांना असते. पुढे संसारात येणारी व्यवधाने पार करत संसार टिकवणे हे प्रत्येकाचे काम असते. पूर्वी लग्नात कितीही बाधा आली तरी लग्न टिकवण्याचे दोन्ही पक्षाकडून प्रयत्न केले जात असे. आता दिवसाला जेवढी लग्न होत नाहीत, त्याहून दुप्पट घटस्फोटाच्या केसेस वाढल्या आहेत. यामागे खालील कारणे महत्वाची आहेत.

- **समजुतपणाच्या ठिकाणी अहंकारामध्ये वाढ :** हल्ली नात्यात प्रेमापेक्षा अहंकार महत्वाचा झाला आहे. जोडीदाराने फक्त आपल्याला आदर द्यावा. असे प्रत्येकाला वाटते. अहंकारामध्ये वाढ झाल्यामुळे आहे त्या परिस्थितीत खूश राहण्यापेक्षा एकमेकांचा अपमान करण्यावर भर दिला जात आहे. समजुतदारपणाचा अभाव असल्यामुळे कधी ही नाती तुटण्यापर्यंत येते हे कुणालाही कळत नाही. त्यामुळे नात्यात इगोला जास्त काळासाठी थारा देऊ नका. जर तुम्ही इगो जपलात तर त्याचा त्रास तुम्हाला पुढील आयुष्यासाठी होईल. पुर्वी कितीही भांडण झाली तरी, घरात आणि एकाच छताखाली राहत असल्यामुळे ते सर्व एकमेकांना समजून घेत होते. आता अशी परिस्थिती आली की, पटकन सोडून जाणे किंवा दुरावा ठेवणे खूप लोक पसंत करतात. त्यामुळे नात्यात दुरावा यायला सुरुवात होते. काही गोष्टी या सामुपचाराने आणि बोलून सोडवता येतात. उदा. एखाद्या भांडणातून जर कोणावर हात उचलणे झाले असेल तर पटकन संसार मोडणे किंवा कोणाचीही बाजू ऐकून न घेणे यामुळेही लग्न टिकवणे कठीण जाते.
- **ऐकून न घेण्याची वृत्ती:** हल्ली कोणाच्याही कुटुंबात एक ते दोन अपत्य असतात. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना लाडात (मुलगा-मुलगी) वाढलेले असतात. जेव्हा ही मुलगी लग्न होवून दुसऱ्या कुटूंबात जाते तेव्हा, घर सोडल्यानंतर नवीन नात्यामध्ये एडजस्टमेंट करण्यास तयार नसते आणि आपल्या आईच्या घरचे कौतुक करते. यामुळे वाद वाढत जातात. दोन्ही पक्ष ऐकूण घेण्यास तयार नसेल तर, वाद विकोपाला जातात. शेवटी लग्न संपुष्टात येते.

- **मुलीच्या संसारात पालकांचा वाढता सहभागः** आपल्या पाल्याचा विचार करण्यात पालक कुठेही कमी पडत नाहीत. पण हल्ली खूप पालकांचा मुलीच्या किंवा मुलाच्या संसारात मर्यादेपेक्षा अधिक हस्तक्षेप होतांना दिसून येतो. असेच व्हायला हवे. त्याने अमुक करायला हवे. असे म्हणत पालक जोडप्यांमध्ये बरेच गैरसमज निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. जी दुर्दैवाची गोष्ट आहे. पण या कारणामुळे देखील हल्ली अनेक लग्न सुरुवातीच्या काही काळातच तुटायला सुरुवात होते.

## सुखी वैवाहिक जीवन हवे असेल तर खालील नियम पाळा

वैवाहिक जीवन सुखाचे आणि समाधानाचे असावे असे प्रत्येकालाच वाटत असते. मात्र लग्नानंतर प्रत्येकाकडे जीवन सुखी आणि आनंदी करणारं 'सिक्रेट' असेलच असे नाही. अनेकांच्या आयुष्यात लग्नाआधी आणि नवीन लग्न झाल्यावर भरभरून वाहणारे प्रेम काळाच्या नकळत ओघात कधी कमी होत जाते हे दोघांनाही कळत सुद्धा नाही. जेव्हा याची जाणीव होते तेव्हा, मात्र फार उशीर झालेला असतो. यासाठीच आयुष्यभर संसार सुखाचा करण्याकरिता आपल्या दैनंदिन जीवनात अगदी काही सोप्या आणि छोट्या छोट्या गोष्टी करून आपण आपले वैवाहिक जीवन आनंदी करू शकतो.

- **जोडीदाराचे मनापासून कौतुक करा :** कौतुक ऐकायला कोणाला नाही आवडत? घरातल्या अगदी लहान बाळापासून ते वयोवृद्ध व्यक्तीपर्यंत सर्वांनाच आपलं कौतुक व्हावं असं वाटत असतं. जोडीदार अथवा पार्टनर तुमच्या आयुष्यातील एक महत्त्वाची व्यक्ती आहे. जोडीदाराचे वेळोवेळी कौतुक केल्यामुळे एकमेकांमधील प्रेम अधिक दृढ होत जाते. बाहेर परिस्थिती कशीही असली तरी घरातून आणि विशेषतः आपल्या पार्टनरकडून मिळणारी कौतुकाची थाप काम अधिक चांगले करण्याची ऊर्मी मनात निर्माण करते. मग ते तुमचा आवडता पदार्थ तयार करणं असू दे किंवा ऑफिसमध्ये मिळालेले एखादे छोट्या यशाचे मनापासून कौतुक करायला मुळीच विसरू नका. मात्र लक्षात ठेवा कौतुक असे कौतूक मनापासून करा वरवर केलेले कौतुक समोरच्या व्यक्तीच्या मनापर्यंत जाऊन कधीच भिडत नसते. यासाठी त्या कौतुकामध्ये तुमच्या मनातील प्रेम आणि जोडीदाराबद्दल वाटणारा आदर त्यात जोडलेला असायला हवा.
- **लाईफ पार्टनरचे चांगले श्रोते व्हा :** जेव्हा जेव्हा तुमच्या दोघांमध्ये एकाला व्यक्त होण्याची गरज असेल तेव्हा दुसऱ्याने त्याच्यासाठी चांगला श्रोता होणे गरजेचे आहे. या एकाच गोष्टींवर आज अनेक कुटुंब सुखाने संसार करत आहेत. सुखी वैवाहिक जीवनाचं हे एक गुपितच आहे असं म्हणायला काहीच हरकत नाही. जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीचं म्हणणं कान देऊन ऐकता तेव्हा त्या व्यक्तीला सर्वात आधी मनातून खूप बरं आणि हलकं वाटतं. शिवाय यामुळे अनेक समस्या सहज सोडवता येऊ शकतात. जेव्हा तुम्ही एखाद्याला थोडासा वेळ

देता तेव्हा तुम्ही तुमच्या आयुष्यातील मौल्यवान क्षण आणि तुमचं आयुष्यच त्या व्यक्तीला देत असता. एखाद्या महागड्या भेटवस्तूपेक्षा हे गिफ्ट जोडीदारासाठी नेहमीच गरजेचे आहे.

- **छोट्याशा गोष्टींसाठीदेखील जोडीदारांना थँक्स म्हणा :** संसार अथवा वैवाहिक जीवनातील संसार हा दोघांचाही असतो. त्यामुळे एकमेकांसाठी अनेक गोष्टी करणे हे ओघाने आल. मात्र जर या छोट्या छोट्या गोष्टींसाठी जर एकमेकांचे आभार मानले आणि कृतज्ञता व्यक्त केली तर समोरच्या व्यक्तीला ती गोष्ट तुमच्यासाठी आयुष्यभर करीत राहावसे वाटते. स्वयंपाक करणे, बाजारातून सामान आणण्यास मदत करणे, ऑफिसच्या ताणापासून दूर ठेवणारा एखादा सल्ला देणे, मुलाच्या कामात मदत करणे. मात्र कामात तुमच्या लाईफ पार्टनरची मदत मिळाल्यावर त्याला लगेच 'थँक्स' म्हणा कारण याचा चांगला परिणाम तुम्हाला तुमच्या आयुष्यात दूरपर्यंत मिळत राहील.
- **जोडीदाराशी मनमोकळा सुसंवाद साधाः** सुसंवाद ही गोष्ट्व आजकाल हरवत चालली आहे. कारण करिअर आणि वैयक्तिक आनंदाच्या प्रयत्नात माणूस त्याच्या घरातल्या लोकांपासून फार दूर चालला आहे. याचे प्रमुख कारण पूर्वीप्रमाणे आजकाल कुटुंबामध्ये संवाद होत नाहीत. तुम्हाला सुखी आयुष्य सुखात काढावयाचे असेल तर, जोडीदारासोबत दररोज सुसंवाद गरजेचे आहे. प्रत्येक वेळी तुमचा संवाद चांगलाच होईल आणि कोणतेही मतभेद होणार नाहीत असे नाही. मात्र हा वाद दीर्घकाळ न टिकवता पुन्हा तुमची मने एक होतील अशाप्रकारे संवाद साधने आवश्यक आहे. यामुळे एकमेकांशी दररोज थोडावेळ काढून बोलणे गरजेचे आहे. हे लक्षात ठेवा. शिवाय मनातील वाईट गोष्टींचा निचरा झाल्याशिवाय नवीन चांगल्या गोष्टी मनात शिरत नाहीत. म्हणून एकमेकांबद्दल वाटणाऱ्या भावना आणि मतभेद अशा संवादातून सोडवा.
- **लैंगिक उत्साह कायम राखा :** लैंगिक संबंध हे जोडप्याच्या जीवनातील दीर्घकाळ संबंध टिकण्याचे महत्वाचे कारण आहे. तेव्हा लग्नाला कितीही वर्ष होऊ द्या पण, जोडीदारासोबत शारीरिक जवळीक आणि प्रेमातील उत्साह कायम ठेवा. लैंगिक संबंधामुळे आयुष्यातील इतर गोष्टींमधून मिळणारा मानसिक ताणतणाव कमी होतो. यासाठी तुमच्या लाईफ पार्टनरच्या गरजा योग्य वेळी ओळखा आणि एकमेकांना सुखी आणि आनंदी ठेवा.
- **जोडीदाराच्या फँटसी पूर्ण करा :**रोमँटिक आयुष्याबद्दल प्रत्येकाच्या मनात काही ना काहीतरी 'फँटसी' या असतातच. सुखी वैवाहिक जीवन जगण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या लाईफ पार्टनरच्या या 'फँटसी' माहीत असायलाच हव्या. पार्टनरला सुखी ठेवण्यासाठी या 'फँटसी' पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. या

फँटसीबाबत सतत तुमच्या पार्टनरसोबत चर्चा करा. ज्यामुळे तुमच्या वैवाहिक जीवनातील चार्म टिकून राहील. वय कितीही झाले तरी एकमेकांबद्दलची ओढ कायम ठेवण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. सुखी वैवाहिक जीवन जगण्याचा हा आणखी चांगला उपाय आहे.

- **जबाबदारी स्वीकारा :** वैवाहिक आयुष्य हे तुमच्या दोघांचे आहे. त्यामुळे दोघांनी एकमेकांची जबाबदारी स्वतःहून स्वीकारायला हवी. यासाठी तुमच्या लाईफ पार्टनरची सर्व बाबतीत जबाबदारी स्वीकारण्यास काहीच हरकत नाही. लाईफ पार्टनरच्या आयुष्यातील इतर जबाबदाऱ्या जसे की, आईवडिलांची काळजी, कुटुंबातील व्यक्तींचे आजारपण, आर्थिक मदत, भावंडाचे करिअर अथवा लग्न अशा अनेक गोष्टीत सहकार्य करून तुम्ही या जबाबदारी स्वीकारू शकता.
- **एकमेकांना गृहित धरू नका :** वैवाहिक जीवनामध्ये बऱ्याचदा अनेकांना जोडीदाराला गृहित धरण्याची सवय असते. कधीकधी तर लग्नानंतर काही वर्षांनी जोडीदार एकमेकांना आपोआप गृहित धरू लागतात. मात्र हे फार चुकीचे आहे. कारण लाईफ पार्टनर असला तरी प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे वैयक्तिक मत असू शकते आणि संसाराच्या कोणत्याही कामाकरिता जोडीदारअचे मत विचारात घेणे महत्वाचे ठरते. कोणत्याही कामाच्या संबंधात निर्णय घेतांना त्याबाबत जोडीदाराचे मत नीट ऐकून घ्या आणि त्या मताला आपल्या निर्णयामध्ये प्राधान्य द्या.
- **जोडीदाराच्या भावनांचा आदर राखा :** प्रत्येक व्यक्तीच्या मनातील भावना निरनिराळ्या असतात. कोणी फारच भावनिक असेल तर कोणी फारच मजबूत मनाचा असेल. यासाठी तुमच्या जोडीदाराच्या मनातील भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. शिवाय समोरच्या व्यक्तीच्या भावना आणि तुमचे विचार एकसमान असतीलच असे नाही. मात्र ‘व्यक्ती तितक्या वल्ली’ या म्हणीनुसार तुमच्या जोडीदाराच्या भावना तुम्हाला पटल्या नाहीत तरी कमीत कमी त्यांचा आदर नक्कीच राखा.
- **जोडीदाराकडे आपले प्रेम व्यक्त करा :** प्रेम व्यक्त करण्याचा हा एक सोपा आणि प्रभावी मार्ग म्हणजे दररोज एकदा तरी ‘आय लव्ह यु’ म्हणायला विसरू नका. दररोज तुमच्या जोडीदाराला फक्त ‘आय लव्ह यु’ असे म्हणून तुम्ही तुमचं प्रेम व्यक्त करू शकता. ही गोष्ट आपणास कितीही पोरखेळ वाटत असला तरी त्यामुळे तुमचे नाते वर्षांनूवर्ष टिकून राहील. एकमेकांच शारीरिक व मानसिक संबंधामध्ये बॉंडिंग असणे हे मरेपर्यंत नाते टिकविण्याचा सर्वात योग्य मार्ग आहे. तेव्हा दररोज तुमच्या लाईफ पार्टनरला ‘आय लव्ह यु’ म्हणायला विसरू नका.

- **झोपेच्या आधि हे कराः** बऱ्याच केसस्टडीचे विश्लेषण केल्यानंतर असे माझ्या लक्षात आले की, बहुतांशी व्यक्ती झोपतांना नकारात्मक विचार मनात घेवून झोपी जातात आणि हे विचार अंर्तमनात जावून त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशीच्या कामावर दिसून येतो. अशा कुटूंबामध्ये सातत्याने वादविवाद दिसून येतात. त्याऐवजी दररोज झोपी जाण्यापुर्वी पती पत्नी आणि मुलांनी सर्वांनी दिवसभऱ्यामध्ये काय सकारात्मक बाबी केल्या याबाबत एकेकांशी संवाद साधावा. यावेळी तुम्हाला काय सकारात्मक अनुभव आला यावर चर्चा करा आणि उद्या आपण कोणत्या सकारात्मक गोष्टी करणार आहोत यावर चर्चा करा. हे तंत्र प्रत्येकाने रोज रात्री झोपण्यापुर्वी वापरण्यास सुरवात करा. यामुळे संपूर्ण कुटूंबाचा विचार करण्याचा दृष्टीकोण बदलेल आणि संपूर्ण कुटूंबामध्ये आत्मविश्वास वाढल्याचे तुम्हाला जाणवेल. त्यांमुळे कुटूंबातील वादविवाद कमी होवून प्रत्येकाला कामात यश मिळू लागेल.

### संसार सुरु करतांना

संसार म्हटलं की, चढउतार आणि भांडणे, सुखदुःख यांचे मिश्रण. दोन वेगवेगळ्या स्वभावाची आणि पद्धतीची माणसे एकत्र राहातात आणि एकमेकांना समजून घेत आयुष्यभर संसार करतात. सुखाचा संसार करण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी दोघांनीही लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रसिध्द समाजसेविका आणि इन्फोसिसच्या अध्यक्ष नारायमुर्ती यांच्या पत्नी सुधा मूर्ती संसार कसा केला आणि त्यासाठी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे, याबाबत त्यांनी काही मोलाचा सल्ला दिला आहे. नवा संसार थाटणाऱ्या आणि नुकतेच लग्न झालेल्या व्यक्तींनी खरंच या गोष्टी समजून घ्यायला हव्यात. संसार करणे हा काही खेळ नाही. मात्र त्यासाठी एकमेकांना समजून घेत आयुष्य एकत्र घालवणे गरजेचे आहे.

- **एकमेकांना नीट समजून घ्या :** पती पत्नीचे नाते घट्ट होण्यासाठी दोन्ही जोडीदारांनी एकमेकांना समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. बऱ्याचदा नात्यामध्ये एकमेकांच्या चुका सतत पाहिल्या जातात आणि त्याच चुका कशा झाल्या आणि आपण कसे बरोबर हे सांगण्यात येते. त्यामुळे नात्यात फूट पडायला वेळ लागत नाही. चुका या दोघांकडूनही होत असतात आणि त्यामुळे एकमेकांना समजून घेत पुन्हा ही चूक कशी होणार नाही याकडे लक्ष देत संसार करणे अपेक्षित आहे.
- **सवयी बदलायला जाऊ नका :**आपला जोडीदार जसा आहे तसाच त्याचा स्वीकार करा. आपण ज्या व्यक्तीशी लग्न करतो, त्याच्या सवयी आपल्याला आवडत नसतील तरीही त्या व्यक्तीच्या सवयींशी जुळवून घ्या. लहानपणीपासून असणाऱ्या जोडीदारांच्या सवयी बदलायला जाऊ नका. यामुळे खटके उडण्याची

शक्यता असते. समोरच्या व्यक्तीला बदलण्यापेक्षा स्वतःला थोडे बदलून तडजोड केल्याने संसार नक्कीच सुखाचा होतो.

- **संपूर्ण पाठिंबा द्या :** नात्यामध्ये सर्वात जास्त महत्त्वाचा ठरतो तो म्हणजे जोडीदारास पाठिंबा देणे आणि जोडीदाराचा पाठींबा मिळविणे. आपण काहीही करणार असू त्यावेळी आपल्या जोडीदाराचा पाठिंबा असणे अत्यंत महत्त्वाचे आणि सकारात्मक ठरते. जोडीदाराचा पाठिंबा असेल तर जिंकायची ताकद मिळते आणि आपला जोडीदार आपल्यासोबत कायम आहे हा विश्वासही मिळतो. त्यामुळे संसार टिकविण्यासाठी एकमेकांना व्यवस्थित पाठिंबा देणे अत्यंत गरजेचे आहे.
- **आयुष्यभर मित्र होऊन राहाः** पतीपत्नीनी आपल्या नवरा - बायकोच्या नात्यापेक्षा मैत्रीचे नाते अधिक जपावे. तुम्ही जर नवरा - बायको या नात्यापेक्षा एकमेकांचे मित्र म्हणून राहिलात तर संसार करणे अधिक सोपे होते कारण यामध्ये तुम्ही एकमेकांना अधिक सहजरित्या समजून घेवू शकता. या नात्यात तुमचा अहंकार आडवा येत नाही. नाते अधिक घट्ट करण्यासाठी एकमेकांचे मित्र होऊन राहा.
- **मतभेदाबाबत समोर बोला :** दोन व्यक्ती या भिन्न असतात आणि नवरा - बायकोमध्ये मतभेद हे होऊच शकतात कारण प्रत्येक व्यक्तीचे विचार वेगळे असतात. त्यामुळे जेव्हा तुमच्यामध्ये मतभेद होतील तेव्हा त्याचा राग मनात न धरता एकमेकांशी समोर बसून बोला आणि वेळीच याबाबत मोकळेपणाने बोलून ते सोडवा. मनात रागरुसवा धरून ठेवल्याने नाते पटकन बिघडते. त्यामुळे नियमित मोकळेपणाने बोलून गोष्टी सोडविण्याकडे कल ठेवा.

*******

प्रकरण १५ वे

# शेवटी अत्यंत महत्वाचे

*विवाह जोडतांना कांही विशेषत: काही छोट्या बाबी असतात ज्या आपण सगळ्यांना माहित असतात पण, त्याकडे दुर्लक्ष होते व त्यामुळे आपल्या मुलीच्या संसाराचे नुकसान होते. थोड्याशा चुकीमुळे आईवडीलांकडे आनंदाने राहणारी मुलगी लग्न झाल्यानंतर मुलीला अनेक यातना भोगाव्या लागतात. प्रत्येक आईवडीलांना आपली मुलगी सुखाने संसार करावा असे वाटते. जर त्यांनी भावनात्मक होवून एकदम निर्णय न घेता, थोडीजरी काळजी घेतली तर, पुढील आयुष्यामध्ये होणाऱ्या चुका टाळता येतात आणि मुलीच्या आयुष्याचे भविष्यात होणारे नुकसान टाळू शकतो.*

## मुलामुलींची शैक्षणिक पातळी समान ठेवा

मुलामुलींची शैक्षणिक पातळी जास्तीत जास्त समान असावी. अन्यथा मुलगी कमी शिकली असेल तर तिला त्यावरून हिन भावना दिल्या जाते व त्यामुळे तिचा आत्मविश्वास कमी होवून नैराश्यपूर्ण जीवन जगावे लागते.

## आर्थिक पातळी समान असू द्या

जर मुलीचे आईवडील गरीब असेल तर मुलांकडचे लोक मुलींकडचे आईवडीलांचा अपमान करतात व त्रास देतात, त्यामुळे वाद होवून घटस्फोट होवू शकतो. मुलींकडील संपत्तीचा अधिकार हा मुलींचाच असेल व ती संपत्ती पुढील आयुष्यासाठी जमवून ठेवील जेणेकरून भविष्यात वादामुळे काडीमोड झाल्यास किंवा नवऱ्याचा अपघात किंवा बिमारीमुळे मृत्यू झाल्यास तीच्या भावी जिवनात त्याचा उपयोग करता येईल. समाजात पतीचा मृत्यू झाल्यानंतर सासरचे लोक सुनेला जगु देत नाही. तिला घराबाहेर काढतात. म्हणून मुलीने आपली संपत्ती भावनिकतेच्या आहारी जावून नवऱ्याच्या नांवे न करता आपल्या व मुलांच्या भविष्याची तडजोड करून ठेवावी, तसे लग्नाआधी स्पष्ट करून लिहून घ्यावे.

## मुलाचे जॉब प्रोफाईल तपासा

लग्न जोडण्याच्या पहिले मुलगा जे काही नौकरी किंवा व्यवसाय करतो त्याचे कागदोपत्री पूर्ण पडताळणी करा. खालील बाबी तपासा. पगार स्लीप, व्यवसाय असेल

तर गुमास्ता, दुकान स्वतःचे आहे की किरायाचे, त्याचा पुरावा बघणे, बँकेतील चालू खाते आहे की नाही ते बघावे, खात्याचे महिन्याचे अकाउंट स्टेटमेंट, इंकम टॅक्स स्टेटमेंट, इंकम टॅक्स रिटर्न किती भरतो इत्यादी. समजत नसेल तर सी.ए.ची मदत घ्यावी. हे करणे खुप महत्वाचे आहे. लोकं खुप खोटे बोलतात व मुलीच्या आईवडीलांना फसवितात. मुलीला जॉब असेल तर तो मुलीने सोडू नये. हे लग्न करतांना करारनाम्याद्वारे लिहून घ्यावे. तसेच ज्या मुलींना जॉब नसतो त्यांना त्यांच्या इच्छित खर्च करण्यासाठी तिला महिन्याचा पगार ठरवावा. कारण ती दिवसभर सासरी खुप काम करते. तिला पण ईच्छा भावना असतात. लग्नानंतर तिला प्रत्येक गोष्टीसाठी हात पसरावे लागतात. आपण आजच्या युगात बघतो, स्वतःच्या भावना दाबून राहात असल्यामुळे मानसिक व शारिरीक आधाराने स्त्रीया ग्रस्त होत चालल्या आहेत. सून जर जॉब करणारी पाहिजे असेल तर सासुने त्याप्रमाणे निभवून घ्यावे. कारण खाजगी नोकऱ्यांमध्ये कामाच्या पाळी असतात त्यामुळे सून घरी वेळ देवू शकत नसते. तेव्हा लग्नापूर्वीच पैसा पाहिजे की सून जे की तिच्या येण्यामुळे घरपण येते, ते अगोदरच ठरवून घ्यावे. कारण नौकरी करणाऱ्या मुली जास्त वेळ देवू शकत नाही व परंपरा निभवू शकत नाही. त्यामुळे बरेच काडीमोड किंवा भांडणे होतात.

## मुलांचे व्यसन तपासा

सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे दारूचे, तंबाखु व सिगारेट चे व्यसन तुम्हाला माहिती आहे. दारूचे व्यसनामुळे कितीतरी मुलींचे संसार उघड्यावर पडले. नशेत मुलींची/मुलांची हत्या झाली, मुलींनी मुलांसोबत आत्महत्या केली, तसेच नशेमुळे रोजं होणाऱ्या भांडणामुळे लहान मुलांच्या मनावर होणारा परिणाम, त्यामुळे ते सुद्धा मानसिक आजाराने ग्रसीत होतात. त्यांचे आयुष्य खराब होतात.

आईवडीलांच्या सततच्या भांडणामुळे किंवा काडिमोड झाल्यामुळे त्यांची मुले डिप्रेशन (नैराश्य) जातात किंवा त्यांच्यात चिंता, नकारात्मक विचार, भिती यासारखे आजार निर्माण होतात. अशा आजाराने पिडीत असलेले कित्येक मानसिक रोगी माझेकडे येतात. आजच्या या तणावपूर्ण जगात ७० ते ८० टक्के लोक मानसिक रोगी आहेत व कोणत्याही प्रकारचे उपचार घेत नाहीत. कारण त्यांना त्यांची जाणीव नाही. म्हणून हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. यावर मुलामुलीने खुप लक्ष द्यावे. जे लोक व्यसन करतात त्यामुळे घराची, समाजाची प्रगती होत नाही. तसेच त्या व्यसनामुळे भयंकर शारिरीक व मानसिक आजार होतात व त्याचा नाहक त्रास पत्नीला होतो. म्हणून व्यसनाधीन मुलासोबत लग्न करू नये आणि करायचे असेल तर मुलीचे नांवे जमा ठेव किंवा घर तिच्यानावावर करावे. त्यानंतरच लग्न करावे, नाही तर लग्न नाही झाले तरी चालेल. वडिलांचे घरी आनंदाने राहणाऱ्या मुलीच्या आयुष्यात अशा प्रकारचे दुःख वाट्याला येणे ही, आपलीच चूक ठरते. माझ्याकडे येणाऱ्या व्यसनमुक्ती परिवाराला पाहून डोळ्यात अश्रु येतात म्हणून व्यसनवाल्या मुलांसोबत लग्न नाही करण्याची मुलींनी वा मुलीच्या आईवडीलांनी ठाम ठरविले पाहिजे.

''मुलगी अविवाहीत राहीली तरी चालेल पण व्यसनाधिन मुलाला मुलगी देवू नये''

दहा रूपये पावाची भाजी घेतांना आपण किती बघतो. तर स्वतःच्या मुलीसाठी मुलगा बघतांना किती चौकशी करायला पाहिजे.''

## लग्न ठरविण्याकरिता मध्यस्थी असू द्या

सर्वात महत्वाचा भाग म्हणजे लग्नानंतर जर दोघांमध्ये वाद सोडविणारा व्यक्ती कोण असेल ते लग्नाआधी ठरविणे खुप महत्वाचे आहे. कारण वाद झाल्यास मध्यस्थी कोणी नसल्यास मुलगी विशेषतः एकटी पडते व ती कधी कधी मुलांना घेऊन आत्महत्येचे पाऊल उचलते. म्हणून मध्यस्थी हा असलाच पाहिजे. लग्नानंतर वादाचे निर्मुलन करण्यासाठी लग्न जोडतांनाही मध्यस्थ भुमिकेसाठी दोन व्यक्ती मुलाकडून व दोन व्यक्ती मुलींकडून यांचा समावेश असु द्या. कधी कधी आईवडील मरण पावल्यानंतर/गरीब असेल तर/बिमार असेल तर, मुलगी त्रास असतांना सुद्धा ती कोणाला सांगु शकत नाही. ह्यामुळे त्याचे रूपांतर आत्महत्या, हत्या किंवा मानसिक आजार यात होऊ शकते. मध्यस्थीमधे - मानसोपचार तज्ञ, सम्मोहन तज्ञ, पारिवारीक लोक, शेजारी किंवा नातेवाईक असावे.

## लग्नानंतर पटले नाहीतर

लग्नानंतर जेव्हा मुलगा मुलगी एकत्र राहतात त्यानंतर प्रत्येकाच्या आचार-विचार यात बरीच तफावत असल्यास एकमेकांसोबत जिवन काढणे कठीण जाते. त्यामुळे नाही पटत असेल तर भांडण न करता, एकमेकांना न मारता, समजुतीने वेगळे होणे योग्य ठरते. परंतु मुलीच्या बाबतीत लैंगीक संबंध झाल्यामुळे आपला समाज तिला सहज स्विकारत नाही. तेव्हा तिच्या भावी जिवनाच्या उपजिविकेची पूर्ण व्यवस्था करावी.

## लग्नानंतर दुसरे प्रेम झाले तर

हा आयुष्यातील सर्वात नाजुक मुद्दा आहे. कारण लग्नानंतर कधी जिवनात दुसऱ्या व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण होते. त्यात लैंगीक सुख हाच महत्त्वाचा मुद्दा असतो, आणि लग्न झाले म्हणून त्याच्यासोबतच जिवन काढले पाहिजे असे नाही. कधी जिवनसाथी निवडतांना चुक होते. त्यामुळे तो पुरुष किंवा स्त्री दुसऱ्या मानसिक, लैंगीक सुखाकडे वळतो. त्यात काही गैर नाही. असे असेल तर स्पष्ट सांगून वेगळे व्हावे. विश्वासघात करू नये व अंधारात लपुन संबंध ठेवू नये. मध्यस्थीकडे जाऊन सर्व सांगुन सामंजस्याने काडीमोड घ्यावा. एक दुसऱ्यास मारणे, भांडण करणे किंवा मारून टाकणे, आत्महत्या करणे असे प्रकार करू नये. कारण प्रत्येकाला स्वतःचे जिवन जगण्याचा अधिकार आहे. पण हे करण्याचा अधिकार फक्त मुलंबाळं होण्याअगोदरच करावे. त्यानंतर जर असे काही केल्यास तुमच्या स्वतःच्या स्वार्थासाठी मुलांचे आयुष्य अंधकारमय होते. त्यामुळे मुले झाल्यावर असे प्रकार अजिबात करू नये. मुले झाल्यावर आपला स्वतःच्या सुखाचा

त्याग व स्वतःच्या आयुष्याबद्दल विचार करणे सोडून द्यावे व या जिवनाला जितके सावरता येईल तितके सावरावे फक्त तात्पुरत्या लैंगीक सुखाकरीता आपली प्रतिष्ठा खराब करू नये.

- जर तुम्हाला मुल बाळ असतील तर स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलासाठी जगावे. मुलबाळ असतांना घटस्फोट घेवून तुम्हाला वेगळे होण्याचा काहीही अधिकार नाही.
- ज्यांना स्वतःच सुख, आनंद भोगण्याची इच्छा असेल तर त्याने लग्न करू नये आणि जर केलेच तर मुलाबाळांना जन्म देवू नये.
- जर जिवनसाथी प्रामाणिक निघाला नाही तर, मी स्वतःचे जिवन त्याच्यासाठी वाया घालविणार नाही. अर्थात - भांडणार नाही, आत्महत्या करणार नाही, हत्या करणार नाही, मानसिकरित्या खचणार नाही, तो किंवा ती मेली म्हणून पुढील आयुष्य आनंदाने घालविण्यासाठी मनाची तयारी करा.

आपले आयुष्य मोजक्याच दिवसाचे आहे. तुमचा जिवनसाथी फक्त या जिवनापुरता तुमच्यासोबत आहे. त्यामुळे जेवढ्या तुमच्या अपेक्षा पूर्ण होतात तेवढ्यातच समाधान मानावे व पुढील आयुष्य जगावे. कारण मृत्यूनंतर तुम्हाला परत दुसरा जिवनसाथी मिळणार आहे. त्यामुळे तो प्रामाणिक नाही राहीला तर तो पती म्हणून किंवा पत्नी म्हणून मेला असे समजावे व आज आपल्यासोबत एक मित्र राहात आहे असे समजावे.

### तुमच्या मुलांची जबाबदारी कोण घेईल ?

आईवडीलांच्या भांडणामुळे किंवा आईचे किंवा वडीलांचे अकस्मात मृत्यू, भांडणात आईची हत्या झाल्यास वडीलांना शिक्षा होत आणि मुले उघड्यावर पडतात. त्यांना कोणीही विचारत नाही. त्यासाठी लग्नाचे अगोदर मुलाची जबाबदारी कोण सांभाळील, हे ठरविणे महत्वाचे. पण सर्वात महत्त्वाचे आईची हत्या होईल इतपत बाब न जाता मुलीने वेगळे होऊन जावे, जर नवरा चारित्र्यावर शंका करत असेल तर शक्यतोवर वेगळे होणे योग्य ठरते.

### घटस्फोटानंतर निर्माण होणाऱ्या समस्या

- मानसिक समस्या उद्‌भवतात
- मानसिक तणावामुळे शारिरीक व्याधी निर्माण होतात.
- समाजात प्रतिष्ठा राहत नाही.
- मुलांना लोक टोमणे मारतात
- मुलांचा आत्मविश्वास खालावतो

- मुलांवर मानसिक परिणाम होतो.
- मुलांची प्रगती होत नाही.
- पत्नीकडे उत्पन्नाचे साधन नसेल तर जिवन व्यतीत करणे कठीण जाते. त्यातच आत्महत्यासारखे प्रकार होतात.
- एकट्या बाईला पाहुन लोकं फसवतात, लहान मुलांना पळवून नेतात.
- सर्वात महत्वाचे म्हणजे मुले असल्यास आईला किंवा पित्याला वेगळे झाल्यावर काही झाले तर मुलांना कोण सांभाळणार, हा मोठा प्रश्न असतो.
- असे बरेचदा होते आईवडीलांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास दुसरा आधारच नसतो''

**लग्न जुळवितांना खालील प्रश्न जरूर विचारा किंवा सांगा**

१) पगार किती/किती वर्षापासून काम करता/ कंपनीची माहिती मिळवा.

२) झोपण्याची सवय जसे रात्री उशीरा झोपावयाची सवय असेल तर, खुप मोठी अडचण निर्माण होते.

३) मुलांची खाण्यापिण्याची आवड व स्वतला असलेल्या सवयीबद्दल.

४) सासु सासऱ्यांना काय आवडते काय नाही याची माहिती घ्या.

५) खाण्यापिण्याच्या सवयी सांगणे.

६) फिरायला जाण्याची काही आवड असेल तर त्याबद्दलची माहिती मिळवा.

७) स्वयंपाक मुलीला येतो हे पूर्ण माहित करून घेणे, नंतर तुझ्या आईने शिकविले नाही असे टोमने दिले जातात.

८) मुलीसमोर तिच्या आईवडीलांना अपमान न करण्याची हमी.

९) मुलांच्या व्यसनाबद्दल पूर्ण चौकशी करणे.

१०) जर मुलगा व्यवसाय करीत असेल तर, तो व्यवसाय त्या मुलाचे नांवाने आहे का? ते तपासावे. त्याच्या नांवावर असलेले बँक खाते तपासून ५ वर्षाचे बँक स्टेटमेंट बघावे.

११) लग्न जोडतांना विमा काढून पत्नीचे नॉमिनेशन करावे.

१२) कुटूंब संयुक्त असेल तर, त्याबाबतची चौकशी करावी, सासू सासरे कोणाकडे राहतात हे पहिलेच विचारून घ्यावे.

१३) लग्नानंतर एकत्र राहावे लागेल की वेगळे याबाबत चर्चा करावी.

१४) मुलीला जॉब करण्याबाबतची चर्चा करावी. तिला जॉब करायचा असेल आणि तिला स्वत:ची ओळख निर्माण करायची असेल तर त्याबाबत प्रथमच स्पष्ट

करावे अन्यथा लग्न झाल्यानंतर तिला जॉब सोडण्यास सासरकडील लोकांनी प्रवृत्त केल्यास तर, मुलीना डिप्रेशन होऊ शकते.

१५) लग्नानंतर मुलांबाळाच्या नियोजबाबत मुलांचे काय विचार आहे. याबाबत चर्चा करावी.

१६) जर मुलांच्या आयुष्यात काही बरेवाईट झाले तर, त्यानंतर मुलीचे व मुलांबाळांचे पालन पोषण कोण करणार याबाबत स्पष्टता असावी.

१७) पत्नी आणि मुलांच्या सुरक्षतेबाबत मुलांचे विचार जाणून घ्यावे.

१८) कोणतेही शारीरिक आणि मानसिक आजार असेल तर, शक्यतोवर लग्न टाळा.

१९) लग्नानंतर जोपर्यंत जोडीदाराबद्दल पूर्ण विश्वास किंवा खात्री पटत नाही तोपर्यंत अपत्याला जन्म देण्याचे टाळा

वरील सर्व मुद्यावर लग्नाअगोदरच विचार करावा जेणे करुन लग्नानंतर मुलीच्या आयुष्यात काहीही घटना घडल्यास तर, तिला आर्थिक आणि भावनिक सुरक्षितता मिळावी. या पुस्तकात ज्या बाबी सांगीतल्या आहेत त्या सगळ्या बाबी स्टॅम्प पेपरवर लिहून शक्य असेल तर करारनामा बनवून घ्यावा. भावी जीवनात कांही वाद झाल्यास त्याचा खुप फायदा होईल.

## सुखी जिवनाकरिता

मानवी जिवनातील सर्व समस्याचे मूळ म्हणजे व्यक्ती व्यक्तीमध्ये निर्माण होणारे वैचारिक वाद असून वैचारिक भिन्नता हे त्यामागचे कारण आहे. मग असे वाद पती-पत्नीमध्ये असो किंवा नातेवाईक किंवा मित्रांमध्ये असो. जर अशी व्यक्ती समविचारी असेल, तर ते नाते कायमस्वरुपी टिकते. यावर एकच उपाय म्हणजे समविचारी व्यक्तीची निवड करणे किंवा प्रत्येक व्यक्तीच्या विचारातील समानता शोधणे किंवा त्यांच्यातील चांगल्या विचाराशी जुळवून घेणे. जेणेकरून वाद टाळता येतील आणि संबंध टिकून राहतील. आपले पारिवारीक संबंधांना जुळवून घेण्याकरिता आणि अशा संमस्या दूर करण्याकरिता संमोहन शास्त्र व एन.एल.पी. शास्त्र शिकावे किंवा आत्मसात करावे ज्यामुळे आपणास नाती कशी हाताळावित किंवा टिकवून ठेवण्याकरिताकाय प्रयत्न करावेत याची माहिती मिळते.

जर आपणास हे शास्त्र शिकायचे असेल तर, याबाबत अधिक माहिती मिळविण्याकरिता माझ्या यु-ट्यूब चॅनल, वेबसाईट व गुगल प्रोफाईलला भेट द्या.

**‘समृध्द जिवनाचा आधार म्हणजे, सम्मोहन व एन.एल.पी शास्त्र’**

*******

## खालील बाबी लक्षात ठेवा

''दहा रूपये पावाची भाजी घेतांना आपण किती बघतो. तर स्वतःच्या मुलीसाठी मुलगा बघतांना किती चौकशी करायला पाहिजे.''

''सुनेला पगार काळाची गरज''

''सुना आणता की कामवाली बाई'

''लग्नापूर्वी प्रेमसंबंध माहिती झाले तर लग्न करू नये''

''अल्पवयात प्रेम म्हणजे दुःखमय जीवनाचा आरंभ''

''जर तुम्हाला अपत्य असेल तर स्वतःच्या सुखाचा त्याग करून आपल्या अपत्यासाठी जगावे, घटस्फोट घेवू नये. त्यामुळे मुलांचे खुप नुकसान होते''

''ज्याला स्वतःसाठी जगण्याची इच्छा असेल त्यांनी लग्न करू नये, केलेच तर अपत्यांना जन्म देवू नये''

''जर तुमचा जीवनसाथी प्रामाणिक नाही निघाला तर आपले महत्वपूर्ण जीवन एका व्यक्तीसाठी वाया घालवू नये. अर्थात भांडणार नाही, आत्महत्या करणार नाही, हत्या करणार नाही, मानसिकरित्या खचनार नाही, पती किंवा पत्नी म्हणून तो तुमच्यासाठी मृत समजावा, त्याला मित्र किंवा मैत्रिण समजावे, मित्राने बाहेर काही संबंध ठेवले तर, आपल्याला काहीही फरक पडत नसते, तसे हे कठीण आहे. परंतु तुम्हाला तुमचे जीवन तुमच्या मुलांबाळांसोबत आनंदाने जगायचे आहे.''

''चूकी त्याची सजा आपण कां भोगावी''

‘‘जिवनाचा काळ काही वर्षाचा आहे. तुमचा जिवनसाथी फक्त या जिवनापुरता तुमच्यासोबत आहे. त्यामुळे जेवढ्या तुमच्या अपेक्षा पूर्ण होतात तेवढ्यातच समाधान मानावे व आयुष्य जगावे. कारण मृत्यूनंतर तुम्हाला परत दुसरा जिवनसाथी मिळणार आहे. त्यामुळे तो प्रामाणिक नाही राहीला तर तो पती म्हणून किंवा पत्नी म्हणून मेला असे समजावे व आज आपल्यासोबत एक मित्र राहात आहे असे समजावे.’’

‘‘लग्नाअगोदर प्रेमसंबंध असेल तर ते कधीच सांगू नये. ते तिथेच संपवून समोर जावे. जर तुम्ही सांगीतले तर, वैवाहिक जीवन कधीच सफलं होत नाही. जर तुम्ही त्या प्रेमभावनेतून निघाले नसाल तर लग्न करू नये.

‘‘लग्नापूर्वी तुम्ही तुमचे जीवन १०० % जगू शकता.

लग्नानंतर ते ५0% होते,

अपत्य झाल्यावर 0% होते,

म्हणून आईवडील बनल्यानंतर स्वतःचे सुखदुःख सोडून, मानापमान त्यागून स्वतःच्या मुलांबाळांसाठी जगावे.’’

‘‘सावत्र आई किंवा सावत्र वडील हे मुलांच्या डिप्रेशनचे एक कारण आहे’’

‘‘दुसरे लग्न म्हणजे तुमच्या अपत्याचे जीवन अंधकारमय करणे होय’’


‘‘लग्न केले म्हणजे तुम्ही मालक बनत नाही, त्यामुळे तुम्हाला पत्नीला मारण्याचा अधिकार नाही.’’

# लेखकाचा परिचय

## डॉ. विनोद अ. मुने

(मानसोपचार तज्ज्ञ व संमोहन उपचार तज्ज्ञ)

संस्थापक अध्यक्ष :- हिप्नोसिस हिलींग फाऊंडेशन, एक्यूपंक्चर थेरपिस्ट आणि इलेक्ट्रो होमिओपॅथी सल्लागार



Book Unveiled
by Shri Nitinji Gadkari
Union Minister of Road Transport and Highways of India

डॉ. मुने सर मानसोपचार तज्ज्ञ असून त्यांनी गेली १२ वर्षापासून हजारो रुग्णांना संमोहन चिकित्सेचे सहाय्याने औषधीशिवाय मानसिक आजारातून बरे केले आहेत. याशिवाय हिप्नोसिस हिलिंग फांऊडेशनच्या अंतर्गत त्यांचे संपूर्ण भारतभर कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत पाच हजारचे वर लोकांना वैद्यकीय संमोहनाचे प्रशिक्षण दिले आहे. नागपूरला त्यांचे इंडियन हिप्नोसिस प्रशिक्षण केंद्र असून या संस्थेच्या माध्यमातून हिप्नोसिस कोर्सेस शिकविले जातात. याशिवाय डॉ.मुने सर निसर्गोपचार तज्ज्ञ आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञ असून त्यासंबंधी मार्गदर्शन करतात.

---


**मानसिक उपचार व प्रशिक्षण केंद्र नागपूर**

५५/१०१, पहिला माळा, सिध्दीविनायक अपार्टमेंट, शताब्धी चौक, नागपूर-४४००२७

email: hhfnagpur@gmail.com

utube : dr.vinod mune

website : www. drvinodmune.com

9890478286





₹ 250